# मराठी कादंबऱ्यांची माध्यमांतरे [१९६०-२०२२]

# (Marathi Kadambaryanchi Madhyamantare [1960-2022])

**एम्.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**


**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

**दिव्या दिवाकर बर्वे**

हजेरी क्र. 22P0190003

ABC ID 177024259483

पी. आर क्र. 201802530

मार्गदर्शक

चिन्मय मधू घैसास

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# MARATHI KADAMBARYANCHI MADHYAMANTARE [1960-2022]

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**
**MA in Marathi**

## MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Languages & Literature
**Goa University**

by

**Divya Diwakar Barve**

Seat No: 22P0190003
ABC ID: 177024259483
PR No : 201802530

Under the supervision of
Chinmay Madhu Ghaisas
(Assistant Professor)
**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**
**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report titled, "**मराठी कादंबऱ्यांची माध्यमांतरे [१९६०-२०२२]** " is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of **Asst. Prof. Chinmay Madhu Ghaisas** and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Signature and Name of Student

Seat no:22P0190003

Date: 16-04-2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the desertation report "**मराठी कादंबऱ्यांची माध्यमांतरे (१९६०-२०२२)**" is a bonafide work carried out by my **Miss Divya Diwakar Barve** under my supervision in partial Fulfillment of the requirements for the award of the degree of Master of Arts in the discipline Marathi at the Shenoi Goembab School of Languages and Literature, Goa University.

Signature and Name of Supervising Teacher

Date: 16-04-2024

School stamp

Signature of Dean of the school

Date: 16-04-2024

Place: Goa University

# मनोगत

गोवा विद्यापीठांतर्गत मराठी विषयाच्या एम्.ए. मराठीच्या पदवीकरिता प्रबंधिका म्हणून “मराठी कादंबऱ्यांची माध्यमांतरे [१९६०-२०२२]” हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

विषयाची निवड करत असताना मनात खूप गोंधळ निर्माण होत होता आणि अनेक विषय डोळ्यापुढे आले होते. सर्वप्रथम कोणता विषय निवडावा याबद्दल माझी सखी शर्वरी भावे हिच्याशी विचारविनिमय करून काही विषय नमूद करून घेतले. त्यात माझी आवड आणि कोणत्या विषयान वर अचूक  पद्धतीने मांडणी करू शकते याचा विचार केला आणि मग माझे मार्गदर्शक चिन्मय सर यांच्यापुढे या विषयांचा प्रस्ताव मांडला त्यांनी अजून काही विषय सुचवले आणि त्या दोन्ही सूचनांचा विचार करून विषयांचा शोध घेतला आणि कोणता विषय निवडावा हे ठरवलं.

त्यात माध्यमांतर विषय घ्यायचा हे निश्चित झालं पण कोणत्या साहित्यकृतीचे माध्यमांतर घ्यायचे यासाठी वेगवेगळ्या साहित्यकृतीतून झालेली माध्यमांतरे यांची यादी तयार केली आणि मग कोणती पुस्तके आणि चित्रपट उपलब्ध होऊ शकतील हे पाहिले आणि शेवटी मराठी कादंबऱ्यांची माध्यमांतरे असा विषय ठरवला खरा पण कालखंड कोणता ठरवावा हा विचार आला तेव्हा थोडे गोंधळले पण विषय थोड्या विस्तृतपणे मांडत येईल म्हणून [१९६०-२०२२] हा कालखंड निवडून त्या अनुषंगाने पुस्तकांची जुळवाजुळव चित्रपटांची उपलब्धता यांचा शोध प्रवास सुरू झाला . यात माझा दादा अनुप आणि ताई अनघा यांनी कादंबऱ्या उपलब्ध करून दिल्या. त्याच बरोबर विद्यापीठाचे ग्रंथालय आणि कृष्णदास शामा गोवा राज्य केंद्रीय पुस्तकालयाची ही खूप मोठ्या प्रमाणात मदत झाली यांची मी ऋणी आहे.

विषयाची निवड झाली. कादंबऱ्या गोळा केल्या चित्रपट पहायला सुरवात केली. प्रकरणांची मांडणी, विभागणी झाली आणि प्रत्यक्ष प्रबंधिका कशी लिहावी कशा पद्धतीने विषय मांडवा कोणते मुद्दे कसे मांडावे यासाठी पंचधारा 'माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांकची' फार मोठी मदत झाली. त्यातील आमच्या शिक्षकांनी लिहिलेले संशोधन प्रपत्र आणि त्यांच्या संदर्भातून मी उत्तम प्रकारे विषयायची मांडणी करू शकले.

माझ्या या शैक्षणिक वाटचालीत मला लाभलेल्या सर्व गुरुजनांचा माझ्या या संशोधन प्रबंधात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वाटा नक्कीच आहे, त्या करता मी सगळ्याची ऋणी आहे. माझे मार्गदर्शक प्रा. चिन्मय मधू घैसास सर यांनी मला विषयाच्या निवडीपासून ते विषयाची मांडणी कशी करावी, कशा पद्धतीने लिखाण करावे, प्रत्येक टप्प्यावर माझे उत्तम मार्गदर्शन केले आणि त्यांच्यामुळेच मी माझे काम पूर्ण आत्मविश्वासाने आणि तटस्थपणे करू शकले. प्रत्येक गोष्टींची पूर्व सूचना देऊन काम केले वेळोवेळी कायमच मदत केली. टप्याटप्याने आणि वेळेच्या आधी काम पूर्ण कसे करावे, तसेच वेगवेगळ्या आयामातून विषयाची मांडणी कशी करावी अशा अनेक गोष्टी सोप्या पद्धतीने करण्यासाठी ते नेहमी मार्गदर्शन करायचे यासाठी मी त्यांची मनापासून ऋणी आहे. खरंतर त्यांचा माझ्यावरचा विश्वास आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली केलेले काम यामुळे मी हा विषय उत्तम प्रकारे मांडू शकले.

सरते शेवटी माझे सगळे मित्रमंडळी ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मला मदत केली. त्यांनी दिलेल्या धीरामुळे आणि त्यांच्या पाठिंब्यामुळे हे करणे शक्य झाले तुमचे मनापासून आभार.

त्याचबरोबर मला वेळोवेळी मदत करणारे माझे मार्गदर्शक चिन्मय सर आणि माझे आई वडील आणि सर्व शिक्षकांचे पण खूप खूप आभार.

# प्रस्तावना

मराठी कादंबऱ्यांची माध्यमांतरे (१९६०-२०२२) असा या शोध प्रबंधिकेचा विषय आहे. प्रस्तुत प्रबंधिकेद्वारे (१९६०-२०२२) या कालखंडात झालेल्या माध्यमांतरीत चित्रपटांचा तौलनिक अभ्यास केला जाणार आहे.

कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचारित्र, हे साहित्यप्रकार शब्द माध्यमाने येतात यात महत्त्वाचे म्हणजे कथानक आणि भाषा त्याचबरोबर त्यात व्यक्तीच्या जीवनातील घटना विचार पद्धती व्यक्तीतील संघर्ष अशा वेगवेगळ्या विषयांची उत्कृष्ट मांडणी असते.

कथानकातील पात्रांची निर्मिती लेखक करत असतो तसेच भाषा संवाद वातावरण निर्मिती यांच्या साहाय्याने आपल्यापुढे ते चित्र उभे राहते आणि याच कथानकांना एक जिवंतपणा येतो जेव्हा त्याचे प्रकारांतर किंवा माध्यमांतर होते.

साहित्य व चित्रपट या दोन्ही माध्यमातून मानवी जीवन मूल्यांची जोपासना होत असते पण संस्कृती संवर्धनाचे कार्य हे चित्रपट व मालिकेच्या माध्यमातून प्रामुख्याने प्रेक्षकांचे मनोरंजन करत असते. तर अशाच साहित्यातील शब्द माध्यमाची कलाकृती चित्रपटातील दृश्यमाध्यमाद्वारे कशा पद्धतीने पोहोचते या अनुषंगाच्या विषयावर या प्रबंधामध्ये सविस्तर मांडणी प्रकरणांच्या माध्यमातून केली गेली आहे.

प्रकरण १ सर्वप्रथम प्रकारानंतर माध्यमांतर संकल्पना व स्वरूप

प्रकरण २ कादंबरी व चित्रपट दोहोंच्या आकृतीबंधांचा अभ्यास

प्रकरण ३ निवडलेली कादंबरी आणि माध्यमांतरीत चित्रपट यांचे स्वतंत्र विश्लेषण

प्रकरण ४ निवडलेल्या कादंबऱ्यांचे झालेले चित्रपटातील माध्यममांतर यांचा तुलनात्मक अभ्यास.

त्याचप्रमाणे शोधप्रस्तावात नमूद केलेल्या संशोधन कार्यामागची उद्दिष्टे संशोधनकार्यामागील गृहीतकांची मांडणी आणि संशोधनपद्धती उदा. तुलनात्मक अभ्यास पद्धती, चिकित्सात्मक अभ्यास पद्धती, व वर्णनात्मक अभ्यास पद्धती या अनुषंगाने यांची सविस्तर चर्चा पूर्ण प्रबंधात केलेली आहे. एक साहित्यप्रकार व एक कलाप्रकार यांचा जोड विचार एका वेगळ्या अनुषंगाने या प्रबंधाद्वारे मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र . | प्रकरण | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १. | प्रकरण १: प्रकारांतर आणि माध्यमांतर स्वरूप व संकल्पना | 01-08 |
| २. | प्रकरण २: कादंबरी व चित्रपट: दोहोंच्या आकृतीबंधांचा अभ्यास | 09-24 |
| ३. | प्रकरण ३ : निवडलेली कादंबरी आणि माध्यमांतरीत चित्रपट यांचे स्वतंत्र विश्लेषण | 25-60 |
| ४. | प्रकरण ४ : निवडलेल्या कादंबऱ्यांचे झालेले चित्रपटातील माध्यमांतर यांचा तुलनात्मक अभ्यास | 61-78 |
| ५. | प्रकरण ५ : समारोप, निष्कर्ष, संदर्भ, परिशिष्ट | 79-91 |

# <u>प्रकरण १ : प्रकारांतर माध्यमांतर स्वरूप व संकल्पना</u>

१.१ प्रस्तावना…………………………………………………………………………………… 02

१.२ प्रकारांतर संकल्पना……………………………………………………………………………02

१.३ माध्यमांतर संकल्पना…………………………………………………………………………03

१.३ माध्यमांतर संकल्पना…………………………………………………………………………04

१.४ साहित्य व माध्यम……………………………………………………………………03-04

१.५ शब्द माध्यम ते दृश्य माध्यम……………………………………………………………04-05

१.६ कादंबरीचे माध्यमांतर………………………………………………………………05-06

१.७ समारोप ……………………………………………………………………………………06

१.८ निष्कर्ष ……………………………………………………………………………………06-07

१.९ संदर्भ सूची...........................................................................................07-08

## प्रकरण १ : प्रकारांतर माध्यमांतर स्वरूप व संकल्पना

### १.१ प्रस्तावना

‘मराठीमध्ये साहित्य ही संकल्पना व्यापक अर्थाने वापरली जाते. कारण साहित्य म्हणत असताना सर्व प्रकारच्या ललित वाङ्मयाचा समावेश यामध्ये होत असतो. ज्यात चित्र, शिल्प, संगीत, नाट्य, नृत्य अशा वेगवेगळ्या कलांचा समावेश असतो. त्याचबरोबर साहित्य हे देखील एक कलाच आहे आणि शब्द हे त्याचे माध्यम आहे. साहित्य हे रंग, रूप, रस, गंध व ध्वनी या सर्व संवेदना समर्थरित्या व्यक्त करू शकते.’[1] ‘मराठी साहित्य अत्यंत समृद्ध आहे ज्यात कथा, कादंबरी, नाटक, निबंध, कविता, चरित्र, आत्मचरित्र, लघुनिबंध, प्रवासवर्णन हे वाङमय प्रकार आढळतात. याच बरोबर अजून एक साहित्यप्रकार यामध्ये येतो तो म्हणजे प्रकारांतर माध्यमांतर.’[2]

### १.२ प्रकारांतर संकल्पना

‘वाङमय कृतीची प्रकारांतराची प्रदीर्घ अशी परंपरा आपल्याकडे दिसून येते. ज्याची सुरुवात 'रामायण महाभारतातील' महाकाव्यापासून चालत आलेली आहे. ज्यात पौराणिक ग्रंथांचे काव्य, कथा, नृत्य, चित्र, नाट्य असे अनेक अविष्कार दिसून येतात. आत्ताच्या विज्ञान युगात दृकश्राव्य माध्यम हे प्रभावी ठरलेले आहे. ज्यात

चित्रपट, दूरदर्शन, नाटक, मालिका या माध्यमांचे सामर्थ्य, मर्यादा लक्षात घेऊनच नवीन आविष्कार नवसर्जनात्मक पद्धतीने प्रकारांतर या संकल्पने द्वारे मांडले गेलेले आहेत.'[3] 'मराठी साहित्याचे वेगवेगळ्या माध्यमातून आजवर प्रकारांतर अनेक अंगांनी झालेले आहे पण त्यातल्या काहीमूळ कलाकृतींपेक्षा लोकप्रिय व श्रेष्ठ देखील झालेल्या आहेत.[५] जसं की "कादंबरीवरून नाटक","कथेवरून कादंबरी", त्यानंतर "कथा कादंबरीवर आधारित मालिका","कथा कादंबरीवर आधारित नाटक, चित्रपट" व्यक्तिचित्रणावर आधारित नाटक", "कथेपासून चित्रपट", "कादंबरीवरून चित्रपट, नाटक वा एकपात्री प्रयोग", "काव्यातून नाटकाची रचना", कथाकथन करणे, असे वेगवेगळे प्रकार मराठीत झालेले आहेत.[३] मूळ कथेच्या वा कादंबरीच्या गाभ्यामध्ये अनेक वेगवेगळ्या शक्यता रुजलेल्या असतात त्यांना शोधून वाचून बाहेर काढून आविष्कृत करणे हे प्रकारांतराचे मोठे आव्हान आहे.'[4]

## १.३ माध्यमांतर संकल्पना

'माध्यम क्रांतीच्या काळात साहित्याच्या भाषेसंदर्भात चर्चा होताना माध्यम हे 'मीडियम' ज्ञानासंदर्भात सूक्ष्म आणि स्थूल घटकांचा विचार पुढे आला. संप्रेक्षणाची माध्यमे, प्रसारमाध्यमे, दृकश्राव्य माध्यमांच्या तांत्रिक विकासाबरोबर माध्यम ही परिभाषिक संकल्पना मूळ धरू लागली. साधन आणि माध्यम यातील स्पष्टता माध्यमांतर या संकल्पनेचा विस्तार करण्यास पूरक ठरलेली आहे. एकाच आशय सूत्राचे तंत्र बदलून भिन्न कलांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने सादरीकरण होते.'[5] कलांतर, रूपांतर, माध्यमांतर यामध्ये मूळ कृतीतील आशय लक्ष कृतीत प्रकटतो असे गृहीतक पाहायला मिळते. पण मूळचा आशय लक्ष्य माध्यमात जाण्याने केवळ माध्यमांतराची एक प्रक्रिया पूर्ण होते.

'साहित्यकृतीच्या माध्यमांतरामध्ये कथेला अधिक महत्त्व आहे." "कारण दिग्दर्शकाने मूळ कथेचा सिनेमा किंवा मालिकेमध्ये माध्यमांतर करताना साहित्यिकाच्या आशयाशी एकनिष्ठ राहणे अभिप्रेत असले तरी साहित्यकृतीच्या मूळ संरचनेला तडा जाता कामा नये. दिग्दर्शक हा सिनेमा, नाटक, मालिका, लघुपट, माहितीपट या माध्यमांमध्ये 'संघनायकाची' भूमिका पार पाडत असतो.' [6] 'कारण माध्यमांतरामध्ये व्यावसायिकता ही महत्त्वाची असली तरी मूळ आशयाशी प्रतारणा माध्यमांतराला बाधक ठरू शकते. माध्यमांतरामध्ये सांघिक वृत्ती महत्त्वाची असते.[7] कथा, पटकथा, संवाद या अनुषंगाने तयार झालेला स्क्रीन प्ले कलाकारांची निवड, आऊटडोअर

इनडोअर शूटिंग, कॅमेरावर्क, कॅमेराचे तंत्र, वेशभूषा, रंगभूषा, गीत, पार्श्व गायन, संकलन, संगीत, दृश्याचा विशेष प्रभाव  आदीच्या मध्यमातून निर्मिती होत असते.’[7]

१.४ साहित्य व माध्यम

‘माध्यम व साहित्य यांचा निकटचा संबंध आहे. मराठी भाषेच्या संदर्भात विचार करत असताना मराठीमधील माध्यम आणि साहित्य यांच्या माध्यमांतराशी एक महत्त्वाचा धागा दिसून येतो.’[8] “एखाद्या भाषिक समूहाला त्याच्या सांस्कृतिक विश्वाची एक विशिष्ट अस्मिता नियंत्रित केली जाते व त्यासाठीच उपलब्ध माध्यमांचा वापर करण्याची त्यांची तयारी असते” [9]

“माध्यम म्हणजे मीडिया याला प्रथम पसंतीचा प्रकार म्हणून मानला गेला आहे. पण माध्यमांचे पदर हे एकमेकांशी जोडलेले असल्यामुळे त्यातील सूक्ष्मता ओळखून त्याप्रमाणे सादरीकरणाला महत्त्व दिले जाते म्हणूनच माध्यम तज्ञ हे एका प्रकारचे संस्कृती वाहक ठरले आहेत म्हणूनच माध्यमांच्या परिभाषेशी साहित्याचा अनुबंध सातत्याने जोडला गेलेला आहे.”[10]

१.५  शब्द माध्यम ते दृश्य माध्यम

‘कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र यांसारखे वाङमय प्रकार शब्द माध्यमाच्या साच्यात बसतात त्यातील 'शब्द' हे फार महत्त्वाचे माध्यम असते कारण या माध्यमाचे मूलभूत तत्व हे भाषा असते.” “शब्दमाध्यमाच्या वाचनातून येणारा अनुभव हा वाचकाच्या मनात त्यांचं वय, अनुभव, त्यांचा व्यवसाय वगैरेंपेक्षा त्यांच्या मनावर त्याचा परिणाम होऊन चित्र उमटवत असतो.’[11] “वाचताना मनात तयार होणारी एक प्रतिमा ही फार महत्त्वाची असते. जो आशय व कथा ही कथानकातून शब्द माध्यमाच्या आधारे व्यक्त केली जाते ते दृश्य माध्यमातून चित्रपटाच्या द्वारे व्यक्त केली जाते.”[12]

‘साहित्यप्रकाराच्या आशयाचे दृश्यमाध्यमात रूपांतर करत असताना त्या साहित्यकृतीच्या आशयाची व कथानकाची योग्य विभागणी केली जाते. साहित्यकृतीमध्ये दडलेल्या कथांचे अंग एक-एक कृती एक-एक टप्प्यांद्वारे मांडली जाते या कृतींचे दृश्य रुपात प्रसंगाच्या रूपाने सादरीकरण केले जाते ते नाट्यमय कृतीमय व

मालिका या दृश्याच्या माध्यमातून पूरक शब्दात प्रसंगांच्याद्वारे योजनाबद्ध पद्धतीने मांडले जाते. नाटकाची निर्मिती देखील नाट्यमय व कृतीमय अशा प्रसंगांमधून मांडली जाते. पण नाटककार हा कथा निवेदनासाठी संवाद आणि प्रसंग यांचा वापर करतो. कॅमेरा मध्ये चित्रित केलेल्या दृश्यांचे समीप दृश्य, अति समीपदृश्य, दूरदृष्टी व अति दूरदृष्टी असे चार प्रकार असतात.’[13]

‘या वेगवेगळ्या दृश्यात प्रकारांद्वारे आणि कॅमेऱ्याच्या प्रभावी हालचालींमधून दिग्दर्शकाला हवे तसे हवे त्यावेळी व हवे तेवढे दृश्य दाखवणे शक्य होते. लांब बसलेल्या प्रेक्षकाला अगदी सूक्ष्म हालचाल व अति अमिप समीप योजनेमुळे पाहणे शक्य होते पण कोणतेही दृश्य प्रभावीरीत्या कोणत्याही वेळी दाखवणे शक्य होते उदा. प्रलय, आग, वादळ व ज्वालामुखी.’ [14]

‘शब्द व दृश्य माध्यम यामध्ये 'कथात्म' रचना आणि वास्तवतेचा आभास हे प्रमुख साम्य आहे. शब्द माध्यमात लेखक त्यांच्या विचारसरणी हेतू यांच्याशी जुळणाऱ्या तंत्रांचा वापर करतो व त्याचा नेमका परिणाम साधला जाईल अशा रीतीने कथानकाची रचना करतो.’ [15] ‘यात गुंतागुंत निरघाठ उकल हे रहस्य कायम ठेवत शेवटी या सगळ्याचा उलगडा इत्यादी गोष्टींचा समावेश करतो. आपले कथाकथन खरे वाटावे यासाठी वास्तवतेचा आभास हा शब्द माध्यमात शब्दांचा आधार घेऊन तर दृश्य माध्यमात दृश्य व संवादांचा आधार घेऊन निर्माण केला जातो.’ [16]

‘शब्द माध्यमांमधून दृश्य माध्यमात जेव्हा कलाकृती रूपांतरीत होते त्यावेळी त्याच्यातील माध्यमांच्या बदलामुळे रचनेत बदल होतात. या दोन्ही माध्यमांमधून दिसणाऱ्या फरकांमुळे दोन्ही माध्यमे व यांची बलस्थानेही लक्षात येतात शब्द माध्यमातून वाचकांच्या मनात एक प्रतिमा तयार होते ही प्रतिमा आपण पूर्वी पाहिलेली असते पण यासाठी वाचकाच्या ठिकाणी कल्पनाशक्ती असणे ही तेवढीच गरजेची आहे ज्यामुळे कथेचा एखादा भाग वाचकाच्या व्यक्तिमत्त्वानुसार त्याच्या मनात भरतो आपल्या व्यक्तिमत्वानुसार साहित्यकृतीचा अनुभव स्वतंत्र वाचकाला मिळतो व्यक्तिमत्वानुसार साहित्यकृती अनुभवण्याचे ही स्वातंत्र्य दृश्यमाध्यमात पाहणाऱ्याला उरत नाही दिग्दर्शकाला जे दिसते जाणवते तेच पाहणाऱ्याला पाहावे लागते.’ [17]

## १.६ कादंबरीचे माध्यमांतर

'साहित्यकृतीच्या माध्यमांतराची बीजे त्या-त्या साहित्यकृतीमध्ये लपलेली असतात. साहित्यकृतीचे माध्यमांतर हा विविधांगी दृष्टिकोनातून महत्त्वाचा विषय आहे.' 'कथा, कविता, नाटक, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन इ. साहित्यप्रकारांतून समाजजीवनाचे चित्रण केले जाते. साहित्यकृती ही कथनपर असल्यामुळे तिच्यामध्ये इतर माध्यमांमध्ये माध्यमांतरित होण्याच्या शक्यता निर्माण होतात.'[18] 'आकाशवाणी, सिनेमा, मालिका, माहितीपट या माध्यमांतून माध्यमांतर होताना आशयाची नक्कल अभिप्रेत नसते. साहित्यिकाला किंवा दिग्दर्शकाला आपापल्या माध्यमातून प्रेक्षकांना काही तरी सांगायचे असते.' 'साहित्यिक 'शब्द' या माध्यमातून आपले विचार, भावना शब्दबद्ध करत असतो तर दिग्दर्शक 'कॅमेरा'च्या माध्यमातून दृक्-श्राव्यतेने रसिकांना हुबेहुब चित्रण दाखवत असतो. साहित्यकृती वाचताना म्हणजेच कादंबरी किंवा कथा वाचताना वाचकाच्या नजरेसमोर प्रसंगांची मालिका तयार होते.'[19]

'सिनेमा पाहताना दिग्दर्शकाच्या कॅमेऱ्यातून जे चित्रण केलेले असेल तेच पाहावे लागते. साहित्यकृतीच्या माध्यमांतरामध्ये 'कथेला' अधिक महत्त्व आहे. दिग्दर्शकाने मूळ कथेचे सिनेमा किंवा मालिकेमध्ये माध्यमांतर करताना साहित्यिकाच्या आशयाशी एकनिष्ठ राहणे अपेक्षित असले तरी साहित्यकृतीच्या मूळ संरचनेला तडा जाता कामा नये. दिग्दर्शक हा सिनेमा, नाटक, मालिका, लघुपट, माहितीपट या माध्यमांमध्ये 'संघनायका'ची भूमिका पार पाडत असतो.' [20]

'माध्यमांतरामध्ये व्यावसायिकता महत्त्वाची असली तरी मूळ आशयाशी प्रतारणा माध्यमांतराला बाधक ठरते. माध्यमांतरामध्ये टीम वर्क महत्त्वाचा असतो. कथा, पटकथा, संवाद या अनुषंगाने तयार झालेला स्क्रीन प्ले कलावंताची निवड, आऊटडोअर, इनडोअर शूटिंग, कॅमेरावर्क, वेशभूषा, रंगभूषा, गीत, गायक, संकलन, संगीत, इफेक्ट्स आदीच्या मध्यमातून निर्मिती होते.' [21]

## १.७ समारोप

तर एकंदरीत या प्रकरणात प्रकारांतर माध्यमांतराची संकल्पना, शब्दमाध्यम ते दृश्यमाध्यम त्यामध्ये होणारे बदल, कादंबऱ्यांची माध्यमांतरे, शब्द व माध्यम यांच्यातिल निकटचा संबंध अशा अनेक बाबींचा विचार सविस्तर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.८ निष्कर्ष

१. प्रकारांतर माध्यमांतर स्वरूप व संकल्पना हा एक नवीन साहित्यप्रकार आहे.

२. या विषयाची नेमकेपणाने अचूक शब्दात मांडणी व त्याबद्दल अभ्यास करायला खूप वर्षांनी सुरुवात झाली.

३. प्रकारांतर माध्यमांतररामुळे चित्रपट सृष्टीचा दर्जा वाढलेला आहे.

४. माध्यमांतर केल्यामुळे साहित्यकृतीच्या आशयाचा दर्जा देखील उंचावला आहे.

५. केवळ एकाच प्रकारच्या साहित्यकृतीचे माध्यमांतर न होता वेगवेगळ्या प्रकारच्या साहित्यकृतींची माध्यमांतरे झालेली आहे.

६. साठोत्तरी कालखंड , नव्वदोत्तरी कालखंड ,व विसावे शतक अशा कालखंडामध्ये माध्यमांतराची विभागणी केली गेलेली आहे.

७. प्रत्येक कालखंडानुरूप विषयांचे वेगळेपण आढळून येते.

८. साठोत्तरी कालखंडात माध्यमांतर फार कमी प्रमाणात झालेली दिसून येतात तशीच नवोदत्तरी कालखंडात माध्यमांतराचा स्तर थोडा उंचावलेला दिसून येतो व पुढे एकविसाव्या शतकात माध्यमांतरे वेगवेगळ्या विषयांची आणि फार मोठ्या प्रमाणात झालेली आढळतात.

९. साहित्यकृतीचे प्रकारानंतर हे केवळ कादंबरीतून नाटक कथेतून नाटक असे थोडक्यात स्वरूपात झालेले आहे पण माध्यमांतर म्हणत असताना कथेचा चित्रपट किंवा कादंबरीचा चित्रपट, नाटकाचा चित्रपट, चरित्र-आत्मचरित्र, यांचा चित्रपट काही चरित्रांच्या मालिका देखील झालेल्या आहेत तसेच काही कादंबऱ्यांचे वेब सिरीज मध्ये देखील रूपांतर झालेले आहे.

१०. साहित्य प्रकाराचे माध्यम बदलल्यामुळे तोच विषय वेगळ्या पद्धतीने प्रकारांतर व माध्यमांतर या अंतर्गत मांडला जाऊ शकतो.

११. कादंबरीच्या आशयावरील चित्रपटात येणारे संवाद पात्रांचे व्यक्तिमत्व आणि त्या माध्यमातून त्याला एक वेगळी उंची देणारे संगीत अशा गोष्टी दिसून येतात.

## १.९ संदर्भ सूची


1. साहित्य प्रकारांतर,समीक्षा आणि सिद्धांत ,तेवडे शेरयु,वाटाणे राजेंद्र,ठाकरे कोमल ,संपा, विजय प्रकाशन,प्रथम आवृत्ती २०१८ {१,२,३,४}
2. साहित्यकृतीचे माध्यमांतर, संपा. थोरात राजेंद्र, संस्कृती प्रकाशन, पुणे.{५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१}
3. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड ,संशोधन विषय: " मराठी कादंबरीवर आधारित मराठी चित्रपटांचा तौलणित अभ्यास" (१९७०-२०१५)
4. साहित्य प्रकारानंतर समीक्षा आणि सिद्धांत: संपा तायवाडे शरायू , वाटाणे राजेंद्र आणि ठाकरे कोमल, सचिन जगदीश उपाध्याय, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी, नागपूर.
5. https://marathivishwakosh.org/2689/
6. https://www.aksharnama.com/client/kala_sanskruti_detail/17

# प्रकरण २ कादंबरी व चित्रपट : दोहोंच्या आकृतीबंधाचा अभ्यास


२.१

प्रस्तावना……………………………………………………………………………………11

२.२ कादंबरीचे

स्वरूप………………………………………………………………………11

२.३ कादंबरीच्या विविध व्याख्या……………………………………………………………11-12

२.४ कादंबरीचे घटक……………………………………………………………………12

२.४.१ कथानक……………………………………………………………………………12-13

२.४.२ पात्रचित्रण……………………………………………………………………………13

२.४.३ संवाद………………………………………………………………………………13

२.४.४ वातावरण……………………………………………………………………………14

२.४.५ भाषाशैली……………………………………………………………………………14

२.४.६ निवेदन……………………………………………………………………………14-15

२.५ कादंबरीचे प्रकार………………………………………………………………………15

२.५ .१ सामाजिक कादंबरी………………………………………………………………15-16

२.५.२ ऐतिहासिक कादंबरी…………………………………………………………………16

२.५.३ प्रादेशिक कादंबरी……………………………………………………………………16

२.५.४ चरित्रात्मक कादंबरी………………………………………………………………17

२.५.५ आत्मकथनात्मक कादंबरी…………………………………………………………17

२.५.६ विज्ञान कादंबरी……………………………………………………………………….18

२.६ प्रस्तावना ……………………………………………………………………………19

२.७ व्याख्या: चित्रपट ……………………………………………………………………19

२.८ चित्रपट तंत्राच्या वर्गीकरणाचे निकषांच्या आधारवारील पुढील प्रकार……………………20

२.९ चित्रपटनिर्मितीच्या हेतूवर आधारित मुख्य दोन प्रकार……………………………………20

२.१० ललित चित्रपटांच्या काही मुख्य विधा/विदा ………………………………………21

२.११ समारोप ………………………………………………………………………………22

२.१२ निष्कर्ष …………………………………………………………………………22-23-24

२.१३ संदर्भ …………………………………………………………………………………24

# प्रकरण २ : कादंबरी व चित्रपट : दोहोंच्या आकृतीबंधाचा अभ्यास

## २.१ प्रस्तावना

मराठी साहित्यातील कादंबरी या साहित्यप्रकाराचा तसेच चित्रपट या कला प्रकारच्या आकृतीबंधाचा सविस्तर विचार इथे केला जाणार आहे. ज्यात कादंबरीचे प्रकार,कादंबरीचे घटक तसेच चित्रपटाचे घटक, प्रकार इत्यादी बाबी सविस्तरपणे मांडल्या जातील.

## २.२ कादंबरीचे स्वरूप

‘कविता, कथा, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन इत्यादी प्रकारांबरोबर कादंबरी हा महत्वपूर्ण साहित्य प्रकार आहे. इतर कोणत्याही वाङ्मय प्रकारापेक्षा कादंबरीचे स्वरूप निश्चितच वेगळे आहे. ‘अधिक लांबीच्या काल्पनिक कथा असलेल्या गद्य लेखनास कादंबरी असे म्हणतात’. मराठी भाषेतील कादंबऱ्यांनी मराठी साहित्याचा ठेवा समृद्ध केला आहे.'कादंबरी' हा शब्द भारतात सातव्या शतकात होऊन गेलेल्या बाणभट्ट नामक कवीने लिहिलेल्या ‘कादंबरी’ या नावावरून आला आहे. 'The Tales of Genji' ही इंग्रजीतली पहिली कादंबरी ११व्या शतकात लिहिली गेली आहे. कादंबरी हा प्रदीर्घ कथा आशय असलेला साहित्यप्रकार आहे. ‘कादंबरी’ ही कथनत्मक स्वरुपाची असल्याने कादंबरीकार त्यातील व्यक्तिरेखांविषयी सांगत असतो. 'कादंबरी' या शब्दाचा 'कल्पित कथा' असा शाब्दिक अर्थ होतो’.

## २.३ कादंबरीच्या विविध व्याख्या

1. “कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरुप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरणनिर्मिली, शैली इत्यादी घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय”[1] - रा. ग. जाधव

2. “कादबरी हा शब्द आपला पण कल्पना परकीय म्हणावी लागेल. कादंबरी साहित्य परंपरेतील कथनरूप वाङ्मय प्रकार आहे मुख्यतह: पाश्चिमात्य संकल्पनेतून या प्रकाराला अधिक चालना मिळाली.”[2]- प्रा. न. ग. जोन

3. "कादंबरी म्हणजे कथात्मक लिखित गद्याचा ब-यापैकी दीर्घ म्हणता येईल असा लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंगवून टाकणारा रचनाबंध होय."[3] - कैथरीन सिव्हर

४. "सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पारांची स्वभावचित्रे व काही अंशी तदवलंबित जीवित घटना बांधे गौष्टरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जीवीतातील मुलामुलीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा नदयवाडमय विभाग म्हणजे कादंबरी."[4] - प्र.वा. बापट, ना. वा गोडबोले.

२.४ कादंबरीचे घटक

२.४.१ कथानक

२.४.२ पात्रचित्रण

२.४.३ संवाद

२.४.४ वातावरण

२.४.५ भाषाशैली

२.४.६ निवेदन

२.४.१ कथानक

कथानकाशिवाय कादंबरी आकाराला येऊ शकत नाही. कादंबरी ही कथात्म स्वरूपाची असते. कादंबरी मानवी जीवनाच्या भोवतालच्या स्थितिगतीचा वेध घेऊन चित्रण करते. ''कथानक' हा कादंबरीचा प्राण आहे.' कादंबरीचे एक मुख्य साधन किंवा घटक म्हणून कथानकाला स्थान आहे. विशिष्ट घटनांची मालिका, शृंखला नीटपणे बांधून ठेवणारे तत्व कथानकात असते.

कथानकाला इंग्रजीत 'प्लॉट' म्हणतात. कथानक हा कादंबरीचा गाभा आहे. कथानक आकर्षक, सुंदर असेल तर साधारण वाचकाला कथानकाची गोडी लागून शेवटपर्यंत कादंबरी वाचली जाते. कथानकात अनेक घटना

प्रसंगाची साखळी असते. कादंबरीतील कथानकात केवळ कालानुक्रमे घटनांचे कथन असत नाही तर त्या मधील कार्यकारण भावाचा दुवा देखील स्पष्ट केलेला असतो. कथानकात उत्कंठा निर्माण करण्यासाठी विषयांची मांडणी, विविध घटनांची जोड नीट साधणे आवश्यक आहे. पात्रे, प्रसंग यांच्या क्रिया - प्रतिक्रियानुसार कथानकात आकर्षण निर्माण होते.

२.४.२ पात्रचित्रण

कादंबरीत ज्यांच्यामुळे घटना घडतात त्यांना व्यक्ती किंवा पात्रे म्हणतात. कथानकातील घटनांशी ज्यांचा संबंध असतो त्यांना पात्रे म्हणतात. पात्रांशिवाय कथानक अपूर्ण राहते. कारण मानवी जीवनातील विविध व्यक्तींच्या संबंधातून कथानकला आकार येतो. कादंबरीत येणाऱ्या व्यक्ती ह्या व्यक्ती न राहता व्यक्तिरेखा बनतात. व्यक्तिरेखांसाठी पात्र, व्यक्तिचित्रण, व्यक्तिदर्शन असेही शब्द वापरले जातात.

कादंबरीकाराला अवतीभोवती अनेक व्यक्ती भेटतात. त्यातून तो आपल्या कादंबरी निर्मितीसाठी पात्रांची निवड करतो. कादंबरीत मानवी स्वभावाचे अनेक नमुने साकार होत असतात. व्यक्ती-व्यक्तींच्या स्वभावातून संघर्ष घटना प्रसंग घडतात. त्यातून कथानकाला गती प्राप्त होते. कथानक वाचनप्रिय होण्यासाठी कादंबरीकार पात्रांना विशिष्ट पद्धतीने रेखाटतो. कथानकात व्यक्तिरेखेमुळे जिवंतपणा  प्राप्त होतो. ‘माणसांच्या मनातील भावना, विचार आणि मनोवृतींचा लेखक आपल्या कल्पनापूर्ण वास्तवतेचा निकष लावून व्यक्तिरेखा चित्रित करत असतो, त्यातून कादंबरीचे स्वरूप अधिक स्पष्ट होते’.

२.४.३ संवाद

कादंबरीची संहिता भाषेने तयार होत असते. कादंबरीची भाषा ही कल्पित विश्वाची भाषा असते. प्रत्येक कादंबरीसाठी विशिष्ट पद्धतीच्या भाषेचा वापर केला जातो. ती भाषा कथानक, पात्रांनुसार निश्चित केली जाते. कादंबरीसाठी बहुतेक गद्य भाषाच वापरली जाते. संवादांच्या माध्यमातून आपल्याला कथा पोहोचते. कथेच्या आणि प्रसंगाच्या अनुषंगाने संवादात बदल करून अचूक वाक्यरचना आणि नेमके व्याकरण व कमीतकमी शब्दात आशय हा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे  काम  संवादाद्वारे होत असते.

२.४.४ वातावरण

कादंबरीचे कथानक विशिष्ट स्थल-कालात घडते. कथानकाला, व्यक्तिरेखांना विशिष्ट जीवन प्रसंगांची पार्श्वभूमी असते. वर्णनामुळे कादंबरीला आकार येतो. स्थल, काल निरपेक्ष वातावरण देखील लक्षणीय ठरते. एका विशिष्ट भौगोलिक तसेच सामाजिक, सांस्कृतिक परिसरात ती कादंबरी घडत असते. एका विशिष्ट प्रदेशात, विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर घटना, प्रसंग घडत असतात आणि त्या संबंधित पात्रे तिथे वावरत असतात. कादंबरीतील पात्र, घटना, प्रसंग, नाट्य, संघर्ष यासाठी वातावरण महत्वाचे असते. प्रत्येक कथानकानुसार वातावरण बदलत असते आणि ते उत्तम रित्या अचूक प्रतिमा प्रतिकांच्या माध्यमातून वातावरण निर्मितीच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोचवले जाते.

२.४.५ भाषाशैली

शब्दातूनच कादंबरी तयार होते. शब्द हे भाषेचे शरीर आहे. मानवी भावभावनांचे प्रकटीकरण भाषेतून होते. ‘शब्दांच्या माध्यमातून विचार व भावना व्यक्त करणे हे भाषेचे कार्य होय.’ शैली या शब्दाने मिळालेले विशिष्ट वळण असा अर्थ सूचित होतो. प्रत्येक लेखकाच्या भाषाशैलीवर वेळ, काळ, परिस्थितीचा जसा प्रभाव पडतो त्याचप्रमाणे लेखकाच्या शैलीवर त्याच्या व्यक्तिमत्वाचाही प्रभाव पडतो म्हणूनच शैलीवरुन लेखकाच्या व्यक्तिमत्वाची कल्पना येते.

‘ग्रंथकाराच्या मनाचे प्रतिबिंब त्याच्या लेखनात कसे पडते हे वा. म. जोशी यांच्या रागिणी आणि 'सुशिलेचा देव' या कादंबरीतून दिसून येते. हरिभाऊ आपटे यांच्या 'वज्राघात' सारख्या ऐतिहासिक कादंबरीच्या पहिल्याच प्रसंगात त्याची काव्यात्मक भाषाशैली मन मोहून टाकते’.

२.४.६ निवेदन

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार आहे. कादंबरीचे कथानक हे निवेदन ह्या प्रस्तुतीकरण पद्धतीद्वारे सांगावे लागते. निवेदन करण्यासाठी कधी प्रथम पुरुषी (मी, आम्ही) निवेदक असतो तर कधी तृतीय पुरुषी (तो. ती, ते) निवेदक असतो. निवेदन हे कथानकातील सर्व घटना, प्रसंगाना धरून येते म्हणून त्यात वर्णन असते. पात्रा-

पात्रात संभाषण असते तर कधी एकाच पात्राचे संभाषण असते. निवेदनात घटना, प्रसंगांवरची भाष्येही केली जातात. प्रथम पुरुषी निवेदन, तृतीय पुरुषी निवेदन, पत्र, दैनंदिनी या माध्यमांद्वारे निवेदन केले जाते. प्रथम पुरुषी निवेदनात चिंतनाला अधिक वाव असते.

२.५ कादंबरीचे प्रकार

२.५.१ सामाजिक कादंबरी

२.५.२ ऐतिहासिक कादंबरी

२.५.३ प्रादेशिक कादंबरी

२.५.४ चरित्रात्मक कादंबरी

२.५.५ विज्ञान कादंबरी

२.५.६ आत्मकथनात्मक कादंबर

२.५.१ सामाजिक कादंबरी

आपल्या भोवतालच्या परिचित विश्वाचे प्रतिबिंब सामाजिक कादंबरीमध्ये आढळते आपल्यासारखीच माणसे असणा-या वास्तवाचे चित्रण या कादंबरीमध्ये केले जाते. विविध पात्रे यांच्या कृती आणि ठराविक कालखंड या कादंब-यामधून रंगवलेला असतो. आपल्या डोळ्यासमोर सहजपणे येतील अशी दृश्ये, प्रसंग सामाजिक कादंबरीमध्ये येतात.

भिन्न स्वभावाची माणसे असलेला हा समाज आहे. समाजातील माणसे विशिष्ट संस्कृतीतील असतात. परिवर्तनातील गतिशीलतेवर लक्ष केंद्रित करणे हे सामाजिक कादंबरीचे महत्वाचे वैशिष्ट आहे. काळानुसार बदलत जाणा-या सांस्कृतिक आणि आर्थिक परिवर्तनाचे मानवी जीवनावर कसे परिणाम होतात याचे चित्रण सामाजिक कादंबरी करते.

माणसाचे दैनंदिन जीवन सामाजिक कादंबरीने मांडलेले आहे उदा. ह. ना. आपटे, वि. स. खांडेकर, श्री. ना. पेंडसे, गो. नि. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव यांच्या सामाजिक कादंब-यामधून हे सर्व चित्रण आलेलं आहे. सामाजिक कादंबरी बदलत्या काळाचे, काळानुसार बदलणा-या मानवी वृत्ती, प्रवृत्तींचे आणि मूल्यव्यवस्थेचे चित्रण करणारी आहे असे म्हणणे योग्य ठरते.

२.५.२. ऐतिहासिक कादंबरी

कादंबरी हा साहित्यप्रकार इतिहासाशी संवाद साधतो तेव्हा ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती होते. भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचे चित्रण करणारी कादंबरी म्हणजेच ऐतिहासिक कादंबरी. ऐतिहासिक कादंबरी ही इतिहासाच्या आधारे लिहिलेली असते. इतिहासकालीन जुनी कागदपत्रे, ग्रंथ यांचा आधार घेऊन स्थळ, पात्रे, घटना यांचा वापर ऐतिहासिक कादंबरीत केलेला असतो, इतिहास म्हणजे घडलेल्या गोष्टींची कालानुक्रमे केलेली नोंद असते.

परंतु ऐतिहासिक कादंबरीत कादंबरीकार स्थळ, पात्रे, प्रसंग, घटना जसाच्यातशा क्रमवार घेत नाहीत. प्रसंगी काल्पनिक, पात्रांची निर्मिती करून ऐतिहासिक व्यक्तिमत्वांना संजीवनी देण्याचे काम करतो, इतिहासकालीन वास्तवाची जिवंत अनुभुती देण्यासाठी कादंबरीकार ऐतिहासिक काळातील भाषा, पोशाख किंवा वेशभूषा, आचार-विचार, परिसर इत्यादी तपशीलांचा जाणीवपूर्वक वापर करतो.

२.५.३ . प्रादेशिक कादंबरी

सामान्यतः प्रादेशिक कादंबरी ही ग्रामीण वास्तवाचे चित्रण करते, एखाद्या प्रदेशातील जीवन, संस्कृती, आचार-विचार, जीवनशैली आणि भाषा यांचा वापर ज्यात केलेला असतो तिला प्रादेशिक कादंबरी असे म्हणतात. प्रदेशाचे चित्रण करत असताना त्या प्रदेशातील निसर्ग आणि विशिष्ट संस्कृती यांच्यावर लेखकांनी अधिक भर दिलेला असतो. प्रादेशिक कादंब-यामुळे नागरी ग्रामीण संस्कृतीची सर-मिसळ असल्ल गावठी बाजपणा, ग्रामीण जीवनपध्दती त्या-त्या प्रदेशातील भौगोलिक वैशिष्टे तेथील मागासलेपण व सर्वसामान्यपणे लोकसंस्कृतीचे चित्रण असते, प्रदेशातील ग्रामविभागाचे समूहदर्शन तेथे घडते. निसर्ग परिसर व संस्कृती यावर ती भर देते.

### २.५.४. चरित्रात्मक कादंबरी

'विशिष्ट समाज वास्तवात जगणारी व्यक्ती आणि तिचे चरित्र हाच चरित्रात्मक कादंबरीचा कणा आहे. लहानपणापासून प्रौढ वयापर्यंत व्यक्तीची होत असलेली जडण-घडण मांडणारी कादंबरी म्हणजेच चरित्रात्मक कादंबरी होय'. ही कादंबरी लिहिताना लेखकाला एकाच वेळी संशोधन आणि सृजन या दोन पातळ्यावर काम करावे लागते. चरित्रात्मक कादंबरीत पात्रे, घटना, सामाजिक परिस्थिती इत्यादी सर्व चित्रण प्रत्यक्ष पाहिलेले असावे लागते. या कादंबरीचा केंद्रबिंदू हा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे चरित्रात्मक असावा लागतो.

उदा. मराठीतील बहुतेक पौराणिक व ऐतिहासिक कादंबऱ्या व्यक्तिप्रधान आहेत. उदा. 'मोगरा फुलला', 'तुका आकाशा ऐवढा' या संत चरित्रपर कादंबऱ्या आहेत. १९६७ मध्ये गोपाळराव जोशी आणि आनंदीबाई जोशी यांच्या जीवनकथेवरील 'आनंदी- गोपाळ ही कादंबरी प्रसिध्द झाल्यानंतर अनेक चरित्रपर कांदबऱ्या लिहिल्या गेल्या

### २.५.५. आत्मकथनात्मक कादंबरी

'आत्मकथन म्हणजे लेखक स्वतःच स्वतःचे मनोगत किंवा आपले आत्मनिष्ठ अनुभव कथन करतो ते आत्मकथन होय'. ह्या प्रकाराच्या लेखनात 'मी' शी संबंधातील अनुभव केंद्रस्थानी असतात. मराठी साहित्यात सामाजिकतेचे ज्ञान मोठ्या प्रमाणात रुजवण्यात दलित साहित्याचा फार मोठा वाटा आहे. दलित साहित्यात आणि आत्मकथनांची अतिशय वाढ झाली आहे.

दलितातील विविध जाती-जमातीच्या लोकांनी सामाजिक दृष्टिकोन ठेवून दलित आत्मकथने लिहिली. आंनद यादव यांनी लिहिलेल्या 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती या कादंबऱ्यांच्या संदर्भात 'आत्मकथनात्मक कादंबरी हा शब्दप्रयोग वापरता येतो. 'आत्मचरित्र आणि कादंबरी याच्यामागे एक पुसटशी रेषा आहे. यालाच आत्मकथनात्मक कादंबरी म्हणणे योग्य आहे'. उदा. दया पवार यांच 'बलुतं' ही आत्मकथात्मक कादंबरी आहे.

२.५.६. विज्ञान कादंबरी

‘विज्ञान साहित्य म्हणजे विज्ञान जाणिवांचे साहित्य होय असे मत म. सु. पगारे यांनी 'मराठी विज्ञान साहित्य' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत व्यक्त केले आहे’. ‘विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा माणसावर होणाऱ्या परिणांचे चित्रण करणारी वाङमय शाखा म्हणजेच विज्ञान साहित्य होय’. विज्ञानामुळे प्रगट झालेल्या मानवाचे जीवन तंत्रज्ञानामुळे त्यात घडून येणारे बदल यांत्रिक आव्हानाला सामारे जाणारे वैज्ञानिक इत्यादीचे चित्रण व ललितरम्य भाषेत सादर केले जाते. विज्ञान कादंबरीत वैज्ञानिक पुरावा आणि बुध्दिबळ अंदाज यांच्या आधाराने भावी काळात विज्ञान कसे विकसित होईल कोणते शोध लागतील त्याचा मानवी जीवनावर कोणता परिणाम होईल काय घडू शकेल याचे संभाव्य चित्र विज्ञान साहित्य आपल्यासमोर ठेवते.

मराठीतील पहिली विज्ञान कादंबरी ही रुपांतरीत आहे. त्यानंतर मराठीत नाथमाधव, ना. के. बेहरे, नारायण धारप, निरंजन घाटे यांच्या 'युगंधर', 'कालयंत्राची करामत जयंत नारळीकर यांच्या 'वामन परत न आला', अंतराळातील स्फोट, 'व्हायरस', अरुण साधू यांची 'स्फोट', तसेच अरुण हेबळेकर यांची 'जोनास आर्क' या महत्वाच्या विज्ञान कादंबऱ्या आहेत.

२.६ प्रस्तावना चित्रपट

आधुनिक काळात चित्रपट हे एक प्रभावी माध्यम बनलेले आहे. नवीन दशकात २००० पासून चित्रपटाचे स्वरुप झपाट्याने बदलले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या लाटेत इंग्रजी चित्रपटांप्रमाणेच भारतीय भाषेतील चित्रपटही बदलत आहेत. हिंदी भाषेतील चित्रपटांप्रमाणेच मराठी भाषेतील चित्रपटांच्या निर्मितीमध्येही अनेक नवे नवे प्रयोग केले जात आहेत. तथापी मराठी चित्रपटांची निर्मिती ही तेलगू आणि तामिळ भाषांतील चित्रपटांच्या तुलनेत अधिक अडचणीग्रस्त झाल्याचे दिसून येते. यामुळेच मराठी चित्रपटांच्या निर्मितीमधील समस्यांचा शोध घेणे व त्यावरील उपाय सूचित करणे हा या संशोधनाचा हेतू आहे. मराठी चित्रपटांमधून कथानक, सादरीकरण आणि निर्मितीतंत्र या तिन्ही क्षेत्रात लक्षात येण्याजोगे बदल झाले आहेत.

"चित्रपट हे कलात्मकता आणि तंत्रज्ञान यांचा संगम असलेले माध्यम असून लोकरंजन व लोकशिक्षणाचं प्रभावी माध्यम आहे. चित्रसंवाद व अभिनयाच्या सहाय्यानं कथानक सांगणं ही जशी दृश्यकला आहे तशी श्राव्यकलाही आहे मनोरंजन, उद्बोधन, स्वप्नरंजन, प्रचार, आत्माविष्कार, जीवनभाष्य इ. हेतू या चित्रपट माध्यमाच्या द्वारे प्रभावीपणे मांडता येतात व पाहता देखील येतात."

२.७ व्याख्या: चित्रपट

‘चित्रपट हे कलात्मकता व तंत्रज्ञान यांचा संगम असलेले सर्जनशील असे बहुजन-माध्यम असून लोकरंजनाचे व लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन आहे. पडद्यावरील हालत्याचालत्या प्रतिमांतून जीवनाचे दर्शन घडविणारी ही गुंतागुंतीची कला छायाचित्रण आणि इतर तांत्रिक कौशल्य यांचे अपत्य होय. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून चित्रपटकलेचा विकास सातत्याने होत आला आहे.’ [5]

## २.८  चित्रपट तंत्राच्या  वर्गीकरणाचे निकषांच्या आधारवारील पुढील प्रकार :

२.८.१. मूक किंवा दृक्-श्राव्य चित्रपट : यामध्ये ध्वनिवापराचे उपप्रकार आहेत.... ज्यात  मोनो, स्टीरिओ, डॉल्बी, सराउंड साउंड इत्यादी.

२.८.२. कृष्णधवल किंवा रंगीत:  यात रंगतंत्र, रंगांचे पोत यांवर आधारित प्रकार येतात ज्यामध्ये टेक्निकलर, ईस्टमनकलर इत्यादी.

२.८.३. चित्रचौकटीच्या आकारावर आधारित प्रकार  ३५/७५ मिमी., सिनेमास्कोप, आयमॅक्स इत्यादी.

२.८.४. चित्रणपद्धती – अभिनेत्यांचे जिवंत चित्रण, सचेतनीकरण (ॲनिमेशन) किंवा दोहोंचे मिश्रण.

२.८.५. चित्रीकरण आणि प्रक्षेपणपद्धतींवर आधारित –  द्विमिती, त्रिमिती इत्यादी.

२.८.६. चित्रपटांची लांबी – पूर्ण लांबीचा कथापट  (८० मिनिटांपेक्षा जास्त ) किंवा लघुपट, लघुकथापटांचा गुच्छ इत्यादी.

२.८.७. अपेक्षित प्रेक्षकाधारित प्रकार –  बालकांसाठी, कुमारांसाठी, सर्वांसाठी, प्रौढांसाठी इत्यादी.

## २.९  चित्रपटनिर्मितीच्या हेतूवर आधारित मुख्य दोन प्रकार :

२.९.१. माहितीपट (nonfiction) – नोंदपट किंवा दस्तऐवजीकरण करणारे चित्रपट उदा. शैक्षणिक चित्रपट, प्रचारपट इत्यादी.

२.९.२. कल्पित (fiction) किंवा ललित चित्रपट – उदा. कलात्मक, व्यावसायिक-करमणूकप्रधान किंवा मध्यममार्गी इत्यादी.

२.१० ललित चित्रपटांच्या काही मुख्य विधा/विदा

२.१०.१ देमार (ॲक्शन) – शक्ती-शौर्यप्रदर्शन, घटनांचा वेग, संकलनाद्वारे वेग, चांगल्या-वाईटाचा संघर्ष. अशा गोष्टींचा समावेश या यामध्ये होतो.

२.१०.२. साहसपट (ॲडव्हेंचर) – पर्वत, समुद्र, जंगल, वाळवंट इत्यादींवरच्या साहसी मोहिमा अशा गोष्टींचा समावेश यामध्ये होतो.

२.१०.३. विनोदपट (कॉमेडी) – प्रसंगाधिष्ठित, शारीरिक हालचालींवर आधारित, विसंगत व्यक्तिमत्त्वांच्या एकत्र येण्याने सातत्याने होणारी हास्यनिर्मिती अशा गोष्टींचा समावेश यामध्ये होतो.

२.१०.४. गुन्हेगारीपट-टोळीपट (क्राइम-गँगस्टर) – गुन्हा घडणे आणि गुन्हेगाराचा शोध हे आशयसूत्र धरून गुन्हा सिद्ध होणे, गुन्हेगारांना शिक्षा होणे, त्यांचा नायनाट करणे, बदला घेणे इत्यादी उपप्रकार हाताळले जातात अशा गोष्टींचा समावेश यामध्ये होतो.

२.१०.५. नाट्यपट (ड्रामा) – ही सगळ्यांत जास्त वापरली जाणारी विधा आहे. संविधानकाला धरून मांडणी करताना जीवनव्यवहारांना धरून येणारी सविस्तर व्यक्तिचित्रणे, त्यांचे नातेसंबंध-आंतरक्रिया, घडणाऱ्या बऱ्यावाईट घटना यांना किंवा चरित्रकथनाला महत्त्व दिलेले असते. वातावरण बरेचसे वास्तवदर्शी असते. विशेष परिणामासाठी (स्पेशल इफेक्ट) तंत्रज्ञानाचा वापर मर्यादित असतो.

२.१०.६. ऐतिहासिक/भव्य चित्रपट (एपिक) – यामधे ऐतिहासिक, पौराणिक घटना किंवा व्यक्तिरेखा कथेच्या केंद्रस्थानी असतात. स्थलकालाचा विस्तार मोठा असतो. निर्मिती भव्य स्वरूपाची आणि चित्रपटांची लांबीही.

२.१०.७.युद्धपट – ऐतिहासिक युद्ध, काल्पनिक देशांमधील युद्ध किंवा युद्धाची योग्ययोग्यता हे आशयसूत्र केंद्रस्थानी असते. कथाविस्तारात युद्धाचे सविस्तर चित्रण वापरलेले असते.

२.१०.८. भयपट – यामध्ये आशयसूत्र कोणतेही असले, तरी प्रेक्षकांवर भीतीचा मनोकायिक परिणाम घडविण्यासाठी विशिष्ट कथनशैली, वातावरणनिर्मिती आणि चित्रपटीय तंत्रे वापरलेली असतात.

२.१०.९.संगीतिका – बहुतांश वेळा मुख्य पात्रांपैकी काही पात्रे गायन, वादन, नृत्य यांत पारंगत असतात. त्यांच्या जीवनातील नाट्य रोचकपणे दर्शविण्यासाठी, कथा-विस्तारासाठी गायन, वादन, नृत्य यांना महत्त्वाचे आणि मुबलक स्थान दिलेले असते.

२.१०.१०. पाश्चात्त्य-हॉलिवुडमधील विधा /विदा- जगभर पसरलेली, अजूनही जिवंत असलेली खूप जुनी विधा/विदा यामध्ये धूळभरली अन्यायग्रस्त गावे, भव्य आसमंत, चांगल्या-वाइटाचा संघर्ष (मूळ विधेत/विदेत काउबॉइज-अमेरिकन इंडियन्स यांच्यातला संघर्ष), नव्या भूभागाचा-साधनसंपत्तीचा शोध इत्यादी आशय असतो..

## २.११ समारोप

तर अशा पद्धतीने या प्रकरणात कादंबरी व चित्रपट यांचा आकृतिबंद विस्तृतपणे मंडला आहे ज्यात कादंबरीची व्याख्या, कादंबरीचे प्रकार, घटक इत्यादी गोष्टींची सविस्तर चर्चा केली गेली. त्याचबरोबर चित्रपटाची व्याख्या आणि चित्रपट या कलाप्रकाराचे विविध उपप्रकार आणि त्याची तंत्रे यांची सविस्तर मांडणी केली आहे.

## २.१२ निष्कर्ष

1. कादंबरी हा साहित्यप्रकार वेगवेगळ्या घटकांच्या माध्यमातून वाचकांसमोर येतो.
2. कादंबरीच्या वेगवेगळ्या प्रकारांमुळे कादंबरी या साहित्य प्रकाराला एक वेगळी उंची येते.
3. कादंबरीचा प्रत्येक घटक हा अतिशय महत्वाचा आहे.
4. थोडा लांबलचक पद्धतीने मांडणारे कथानक असा हा साहित्यप्रकार आहे.
5. या साहित्यप्रकारामध्ये आपण कथा विस्तृतपणे मांडू शकतो.
6. दीर्घकाळ चालणार हा साहित्य प्रकार आहे.

7. विस्तृत मांडणी सूत्रामुळे या साहित्य प्रकारचा अभ्यास हा खूप वेगवेगळ्या परिप्रेक्षातून आणि वेगवेगळ्या आयामातून उत्तम रित्या करता येतो. काही प्रमाणात आधीपेक्षा आताच्या काळात कादंबरी लेखनाच्या स्वरूपात बदल झालेले दिसून येतात.

8. कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये प्रतिमा प्रतीकांचा वापर, वेगळे आशयसूत्र, मांडणी स्वरूप व एकंदरीत निवेदन, वातावरण आणि भाषा यात नवीन पद्धती हातळलेल्या दिसून येतात जेणेकरून वाचकांचे लक्ष्य वेधून घेता येईल.

9. चित्रपट हा शब्द माध्यमातून व्यक्त होत असतो.

10. चित्रपटाचा महत्त्वाचा गाभा हा चित्रपटाचे कथानक पात्र व दिग्दर्शन असते.

11. चित्रपटातील गीते ही चित्रपटाला एक वेगळीच उंची देऊन जातात.

12. माध्यमांतरीत चित्रपट करत असताना मूळ साहित्यकृतीचा आशय तसाच ठेवून त्याचे माध्यम बदलून प्रेक्षकांसमोर प्रस्तुत करणे हे मोठे कार्य आहे.

13. चित्रपटातील प्रत्येक पात्र हे तेवढेच महत्त्वाचे असते भले तो नायक नायिका वा इतर गौण पात्रही तेवढेच महत्त्वाचे असतात.

14. चित्रपट हे माध्यम फार जुन्या काळापासून जरी प्रसिद्ध असले तरी आताच्या काळात चित्रपटाचा दर्जा फार वाढलेला आहे. केवळ मराठी, हिंदी, इंग्रजीत नव्हे तर इतर भाषांमधील देखील चित्रपट तेवढेच लोकप्रिय होत आहेत.

15. चित्रपटाचे चित्रीकरण दिग्दर्शन संवाद लेखन व इतर बाबिंमुळे चित्रपटाला दर्जा मिळतो तसेच त्या चित्रपटासाठी निवडलेले योग्य कलाकार आणि त्यांनी केलेलं काम हे देखील तेवढेच महत्त्वाचं असतं.

16. माध्यमांतर करत असताना दिग्दर्शकाला मूळ साहित्य कृतीतून काही गोष्टी गाळणे ग्राह्य आहे पण त्याचा एकंदरीत कथानकावर फारसा परिणाम होणार नाही याची देखील काळजी घ्यावी लागते.

17. चित्रपटासाठी निवडलेल्या जागा, त्यांचे योग्य रीतीने केलेले चित्रीकरण व तो चित्रपट बनवण्यासाठी गुंतवलेला पैसा व तो चित्रपट लोकांना आवडेल याचीही खबरदारी घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

18. आधीच्या काळापेक्षा आताच्या काळात चित्रपटांच्या विषयांची मांडणी फार बदललेली आहे केवळ ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक किंवा एका विशिष्ट व्यक्तीसापेक्ष काही लोकांच्या जाणीवांवर आधारित उदा. दलीत, ग्रामीण, स्त्री, महानगरीय इत्यादी अशा वेगवेगळ्या विषयांवरील चित्रपट हे एकविसाव्या शतकापर्यंत झालेले आहेत त्यामुळे विषयांचे वेगळेपण हे चित्रपटाचा वाढता क्रम असे म्हणायला हरकत नाही.

२.१३ संदर्भ


1. गोमंतकीय मराठी वाङमयचा इतिहास [खंड १ ],संपादक ; डॉ. वि. बा . प्रभुदेसाई , प्रकाशक गोमंतक मराठी अकादमी ,पणजी गोवा ,प्रथम आवृत्ती २००३
2. गोमंतकीय मराठी वाङमयचा इतिहास [खंड २ ],संपादक ; डॉ. नाडकर्णी सोमनाथ कोमरपंथ , प्रकाशक गोमंतक मराठी अकादमी ,पणजी गोवा ,प्रथम २०आवृत्ती
3. मराठी वाङमय प्रकार स्वरूप, संकल्पना व वाटचाल , संपादक ; डॉ. द. के. गंधार , प्रकाशक ; सुमती लांडे ,शब्दालय प्रकाशन ; प्रथम जा आवृत्ती २०१७
4. https://vishwakosh.marathi.gov.in/20441/
5. https://brainly.in/question/7925324
6. FINAL-CHITRAPAT-PRAVAHACHA-ITIHS-JAGTIK-ANI-BHARATIY.Pdf

## प्रकरण ३ निवडलेली कादंबरी आणि माध्यमांततीत चित्रपट यांचे स्वतंत्र विश्लेषण.

३.१ प्रस्तावना ……………………………………………………………………………28

३.२ निवडक कादंबयऱ्याची आणि मध्यमांतरीत चित्रपटांची सविस्तर मांडणी…………………28

३.२.१ जैत रे जैत कादंबरी……………………………………………………………………28

३.२.२ जैत रे जैत चित्रपट…………………………………………………………………29-30

३.२.३ कादंबरी सिंहासन……………………………………………………………………30-31

३.२.४ चित्रपट सिंहासन………………………………………………………………………31

३.२.५ गारंबीचा बापू कादंबरी ……………………………………………………31-32-33

३.२.६ गारंबीचा बापू चित्रपट ………………………………………………………………33-34

३.२.७ कादंबरी बनगरवाडी…………………………………………………………………34-35

२.२.८ चित्रपट बनगरवाडी……………………………………………………………………36

३.२.९ कादंबरी रिटा……………………………………………………………………………37

३.२.१० रिटा वेलिणकर चित्रपट ……………………………………………………37-38-39

३.२.११ चौंडक, भंडारभोंग कादंबरी व दर्शन कथासंग्रह ………………………………………40

३.२.१२ जोगवा चित्रपट…………………………………………………………………………41

३.२.१३ निशाणी डावा अंगठा कादंबरी …………………………………………………………42

३.२.१४ निशाणी डावा अंगठा चित्रपट ………………………………………………………42-43

३.२.१५  नटरंग कादंबरी……………………………………………………………………43

३.२.१६ चित्रपट नटरंग……………………………………………………………………43-44

३.२.१७  श्री पार्टनर कादंबरी ………………………………………………………………44

३.२.१८ श्री पार्टनर चित्रपट……………………………………………………………45-46

३.२.१९  शाळा कादंबरी……………………………………………………………………46-47

३.२.२० शाळा चित्रपट……………………………………………………………………47-48

३.२.२१ दुनियादारी कादंबरी……………………………………………………………48

३.२.२२ दुनियादारी चित्रपट ……………………………………………………………48-49

३.२.२३ ७२ मैल एक प्रवास कादंबरी …………………………………………………49-50

३.२.२४  ७२ मैल एक प्रवास चित्रपट ……………………………………………………50-51

३.२.२५ दशक्रिया  कादंबरी ………………………………………………………………51

३.२.२६ दशक्रिया चित्रपट ………………………………………………………………51-52

३.२.२७ कादंबरी आनंदी गोपाळ………………………………………………………52-53

३.२.२८ आनंदी गोपाळ चित्रपट…………………………………………………………53-54

३.२.२९ समांतर कांदबरी…………………………………………………………………54-55

३.२.३०  समांतर वेब सिरीज ……………………………………………………………55-56-57

३.२.३१ चंद्रमुखी कादंबरी……………………………………………………………………57

३.२.३२ चंद्रमुखी चित्रपट……………………………………………………………….57-58

३.३ समारोप ………………………………………………………………………….59

३.४ निष्कर्ष ………………………………………………………………………….59

३.५ संदर्भ ………………………………………………………………………….59-60

## प्रकरण ३ : निवडलेली कादंबरी आणि माध्यमांतरीत चित्रपट यांचे स्वतंत्र विश्लेषण

### ३.१ प्रस्तावना

या प्रकरणात निवडलेल्या कादंबऱ्या आणि माध्यमांतरीत चित्रपट यांचे स्वतंत्र विश्लेषण या प्रकरणा अंतर्गत केले गेले आहे. प्रत्येक कादंबरीचे कथानक, वातावरणनिर्मिती, भाषाशैली, संवाद, पात्रे, यांचा थोडक्यात आढावा व त्यावर झालेले चित्रपटांचे माध्यमांतर यांची सविस्तर चर्चा केली गेली आहे.

### ३.२ निवडक कादंबऱ्याची आणि मध्यमांतरीत चित्रपटांची सविस्तर मांडणी

#### ३.२.१ जैत रे जैत कादंबरी

गो.नी.दांडेकरांची "जैत रे जैत" ही एक अनोखी वेगळ्या धाटणीची कलाकृती. ठाकर लोकांचा जीवनप्रवास त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच बरोबर त्यांच्या प्रतिभेचं तसचं त्यांच्या कलेचं एक सुंदर दर्शन त्यांनी मांडलं आहे. यात अगदी जेमतेम चार मुख्य पात्रे आली आहेत. यातील नायक नाग्या भगत हा एक कलावंत आहे. त्याची पत्नी, प्रेयसी चिंधी त्यावर जीवापाड प्रेम करीत असते, त्याच्यावर जीव उधळून टाकत असते.

बापाने शिकवलेली आणि अंगात जन्मतः असलेली कला नाग्या अगदी सुंदररित्या लोकांसमोर मांडत असतो त्याची देवावर फार भक्ती आणि श्रद्धा आहे. लिंगोबाच्या डोंगरकड्यावर लटकलेल्या एका मधमाश्याच्या पोळ्यातील राणी माशीने त्याचा डोळा फोडल्याने तो फार दुखावला जातो त्याच्या श्रद्धेला एकदम धक्का बसतो, आणि म्हणून राणी माशीला हुसकावून लावण्याचा घाट घालतो.

उत्कट प्रेमकथा आणि त्याचबरोबर सुंदर निसर्ग आणि माणूस यातील एक गोड नाते उलगडण्याचा प्रयत्न करणारी ही "जैत रे जैत" कादंबरी. गो.नी दांडेकरांच्या शब्दसामर्थ्याचा आणि कल्पक बुद्धीचे उदाहरण असलेली ही एक आगळीवेगळी कलाकृती. मनाला भुरळ घालणारी कथा तसेच गरीब, सामाजिक जाणिवेची एक छोटीशी झलक दाखवणारी ही कथा."जैत रे जैत" म्हणजे झालेला विजय असे म्हटले जाते. तसेच त्या जैताचा क्षण येण्यासाठी केलेले सगळे कष्ट लागलेली मेहेनत आणि कथेची उत्तम मांडणी ही कथेची जमेची बाजू आहे.

३.२.२ जैत रे जैत  चित्रपट

जैत रे जैत या कादंबरीवर आधारित जैत रे जैत हा चित्रपट  या चित्रपटामध्ये मुख्य पात्र नाग्या त्याचे आई-वडील चिंगी तिचे वडील तिचा नवरा भुत्या आणि तीन-चार सूत्रधार व इतर गावातील लोक. जुन्या काळातील आणि एका लांब गावी वसलेल्या गावाची ही वेगळ्या ढंगाची कथा दिग्दर्शकाने केवळ संवादांच्या माध्यमातून मांडली नाही तर या चित्रपटात जवळजवळ दहा ते बारा गीते आढळतात त्यातली बरीचशी गीते  कथानक पुढे नेतात. नाग्याचा लहानपणापासूनचा पुण्यवंत होण्याचा प्रवास या चित्रपटातून दाखवला आहे.

लिंगोबाच्या देऊळ डोंगरावर असलेल्या मधमाश्याच्या पोळ्यातील राणी माशीला मारणं आणि पुण्यवंत होणं  हे त्याचं लहानपणापासूनच स्वप्न आणि तिथपर्यंत जाण्यासाठी चे त्याचे मार्ग या चित्रपटाच्या माध्यमातून दाखवले आहेत ज्यात पुण्यवंत होण्यासाठी मांस खाणं बंद करणं इपर्यंत. या चित्रपटातील मूळ नायिका चिंगी ही अत्यंत हिम्मती, जिद्दी, निभिड आणि कष्टाळू स्त्री असते आपल्या नवऱ्याने आपला केलेला छळ आणि त्यामुळे तिला न मिळणारे सुख यामुळे ती नाग्याच्या प्रेमात पडते पण नाग्या तिला स्वीकारत नाही कारण तिचं आधीच लग्न झालेलं असतं पण नाग्याशी संसार करायला मिळावा किंवा नाग्याश्यी संबंध जोडायला मिळावा म्हणून ती कष्ट करून आपल्या नवऱ्याला पैसे देऊन त्याच्याशी काडीमोड घेते.

कथानक पुढे जात असताना नाग्या हा त्या गावातील अत्यंत उत्तमरीत्या ढोल वाजवणारा ढोल्या म्हणून प्रसिद्ध असतो आणि  नाग्याच्या वडिलांच्या अचानक मृत्यूनंतर जेव्हा नाग्यावर कष्ट करून खाण्याची वेळ येते त्याचवेळी तो लाकूड तोडायला गेलेला असताना मधमाशांचे पोळे चुकून फुटते आणि त्यातील सगळ्या मधमाशा या नाग्याला चावायला येतात आणि त्याच्या पूर्ण अंगाचा चावा घेतात आणि त्याचा एक डोळा देखील फोडून टाकतात त्यावेळी चिंधी त्याच्याशी जवळीक साधते व आपण आता कोणाचीही “बाईल” नाही असं सांगून त्याच्याशी संबंध जोडते त्याची सेवा करते त्याला मदत करते पण नाग्याच्या आईला याचं म्हणणं मान्य नसतं पण तिच्या मैत्रिणीने समजावल्यानंतर त्यांना ते पटतं आणि काही महिन्यांनी त्यांचं लग्न लावून देतात पण या राणीमाशीला जाळून टाकणं हे त्याचं स्वप्न चिंगीच्या मदतीने व गावकऱ्यांच्या विरोधात जाऊन नाग्या पूर्ण करतो पण शेवटी राणी माशी उडून जाते व त्याच्या बायकोचा म्हणजेच चिंधीचा जीव घेते. या चित्रपटांमध्ये सूत्रधार फार

महत्त्वाची भूमिका साकारतात म्हणजे प्रत्येक ठिकाणी गाण्याच्या स्वरूपात म्हणा किंवा प्रत्येक घटनेकडे त्यांचा सहभाग दिसून येतो मग ते नाग्याच्या विरोधात असो वा त्याच्या बाजूने.

या गावातील लोकांची भाषा तिकडचं वातावरण तिकडचा प्रदेश आणि चित्रीकरण हे खरंतर मनाला फार भावणारं आहे. यामधून त्या काळाच्या परिस्थितीची आणि त्या काळच्या संस्कृतीची जाणीव दिग्दर्शकाने उत्तमरीत्या मांडलेली आहे. प्रत्येक पात्राच्या तोंडी असणारी ती गावरान भाषा काही कडे हिंदीचा प्रभाव देखील त्या भाषेमध्ये दिसून येतो त्याचबरोबर प्रत्येक पात्राचा पेहराव त्यांची वेशभूषा आणि एकंदरीत चित्रपटाचे कथानक आणि वातावरण निर्मिती यामधून कुठेच मन विचलित होत नाही त्यामध्ये अनेक गाणी असल्यामुळे एका वेगळ्या पद्धतीने तो चित्रपट आत्मसात करता येतो. अशाप्रकारे अत्यंत साध्या सोप्या रीतीने कमीत कमी शब्दात उत्तमरीत्या दिग्दर्शित केलेला असा जैत रे जैत चित्रपट आहे.

३.२.३ कादंबरी सिंहासन

सिंहासन ही दिगू टिपणीस या ध्येयवादी पत्रकाराच्या नजरेतून पुढे जाणारी कादंबरी आहे. वृत्तपत्राचा पन्नाशीला आलेला हा एक साधा वार्ताहर असतो स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी आपला सहभाग नोंदवला आहेच पण स्वतंत्र चळवळीतील आशावाद, ध्येयवाद, आदर्शवाद या सगळ्यांना डोळ्यांसमोर पाहत असतो रात्री खूप उशिरा झोपण्याची सवय असल्यामुळे डीगु टिपणीस सकाळी सकाळी अर्जुन मोरे नावाच्या एका तरुण आमदाराला आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याची बातमी पोहोचवतो आणि तीथूनच एका सत्ता संघर्षाच्या खेळाला सुरुवात होते.

सिंहासन ही कादंबरी राजकीय विषयावर आधारित आहे असं म्हटलं जातं त्याचप्रमाणे ती केवळ सत्ता संघर्षाच्या प्रक्रियेविषयीची आपले निरीक्षण नोंदवत नाही तर यातील घटनाक्रम हा एक वरवर दिसणारा वृत्तपत्रीय मथळ्यांप्रमाणे विश्लेषणातून व्यक्त व्हावा अशा प्रकारचे लेखन अरुण साधू यांनी सत्ताकारण्याच्या प्रक्रियेची मांडणी या कादंबरीतून केली आहे.

सिंहासन या कादंबरीतून साखर सम्राटांचे उत्कृष्ट चित्र लेखकाने रेखाटले आहे. रावसाहेब टोपले हे शुगरलॉबीचे प्रतिनिधित्व करणारे एक मुख्यमंत्री, जिवाजीराव शिंदे यांचे नातेवाईक मुख्यमंत्रीपदाच्या सत्ता संघर्षात

ते जिवाजीरावांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहतात खरे पण आपली ताकद दाखवून हवे ते पदरात पाडून देखील घेतात. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या मंत्रिमंडळात सहभागी होण्याची ऑफर देखील नाकारून त्यांचा दबाव गट तयार करतात व सत्तेवर नियंत्रण ठेवण्याचाही निर्णय घेतात त्याचबरोबर या कादंबरीतून शह, कटसह, शक्ती प्रदर्शन डावपेच तर कुठे लॉगिन अशा अनेक प्रकारांनी सुरुवात होते पण या सर्व खेळातून सत्ता करण्याचा किंवा सत्ता संघर्षाचा एक नवा पट आपल्यासमोर लेखक उभा करतातच. मानवी वर्तनाचे हितसंबंधांचे, संधी साधूपणाचे ,महत्त्वकांक्षांचे संबंधांचे ,नीती अनितीच्या असंख्य धाग्यामधून सिंहासन ही कादंबरी सिद्ध होताना आपल्याला दिसून येते.

३.२.४ चित्रपट सिंहासन

अरुण साधू लिखित सिंहासन या कादंबरीवर आधारित सिंहासन हा चित्रपट. सिंहासन या चित्रपटातून १९७० च्या दशकात सुरू असणाऱ्या महाराष्ट्रातील सत्ता संघर्षात त्याचबरोबर मुंबई महानगरातील संघटित अशा गुन्हेगारीतेचे चित्रण करण्याचा केवळ या चित्रपटांमधून चित्रित केलेले मुंबईतील संघटित गुन्हेगारी अस्थाव्यस्थ वाढत जाणारे शहर आणि कामगारांची होणारी पिळवणूक व संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात घडणारी स्थित्यंतरे तसेच चळवळीतून निर्माण होणारे अथवा होऊ पाहणारे संघटित राजकारणी सरकार या सर्वांचे चित्रण त्याचबरोबर राजकारणाचे बळी आणि सत्ताकारण्यातील जीवघेणी स्पर्धा ही या चित्रपटातून दर्शविलेली आपल्याला दिसून येते .

सिंहासन मधील स्वातंत्र्यसैनिक आणि सत्ता संघर्षात ज्यांना जिवाजीराव शिंदेंनी मंत्रीपद स्वीकारण्यासाठी विनंती केली तसेच त्यांना आमिष दाखवलं आणि त्याच शिंदेंचे व्यक्तिमत्व अगदी विस्तृतपणे दिग्दर्शकाने उत्तमरीत्या मांडलं आहे. एका ध्येयवादी सत्ता संघर्षाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि त्याचप्रमाणे मूल्यहीनतेकडे झुकलेल्या राजकारणामुळे भोगावी लागणारी उदासीनता ही या चित्रपटातून व्यक्त केली आहे.

३.२.५ गारंबीचा बापू कादंबरी

श्री. ना. पेंडसे लिखित ‘गारंबीचा बापू’ ही साठच्या दशकात प्रकाशित झालेली कादंबरी ज्यात कोकणातील पारंपरिक, कर्मठ वातावरण आणि अफाट कर्तृत्ववान असलेला बापू आणि राधासारखी विलक्षण प्रेयसी आपल्याही नशिबी यावी असं चित्र ‘गारंबीचा बापू’ या कादंबरीतून लेखकाने मांडलं आहे. हर्णेच्या परिसरातलं गारंबी हे छोटेसं गाव.

इथल्या यशोदा आणि विठोबाच्या दारिद्र्य़ात पिचणाऱ्या घरात बापूचा जन्म झाला. विठोबा हा निरुपद्रवी आणि सरळमार्गी चालणारा माणूस. परिस्थितीनं पार वाकून गेलेला. अण्णा खोतांच्या घरी पाणक्या म्हणून काम करणारा विठोबा आणि यशोधाही कामानिमित्त अण्णा खोतांच्या घरात ये जा करायची. अठराविश्व दारिद्र्य़ात जन्मलेल्या बापूचं मात्र आपल्या ब्राह्मण असण्यापेक्षा गुरवांच्या वस्तीत जास्त उठणं बसणं असायचं.

त्यामुळे समस्त ब्राह्मणांचा त्याच्यावर फार राग होता. विशेषत: अण्णा खोतांचा! तशात गुरव आणि ब्राह्मणांत उभा दावा होता आणि हे साहजिकच ब्राह्मण बापूचं गुरववाडय़ातलं उठणं-बसणं, त्यांच्याकडे खाणं- पिणं ब्राह्मणांना खुपणाराचं होतं.अशात गुरवांच्या यमीला दिवस गेल्याचं समजल्यावर प्रकरण बापूवर शेकलं. बापूला वेसण घालण्यासाठी अण्णा खोतांनीच हे कांड रचलं होतं.

काटय़ाने काटा काढावा तसा गुरवांना बापूच्या विरोधात फितवून त्याला आयुष्यातून उठवायचा अण्णांचाच हा डाव होता. आणि याउपर साळसूदपणे पंचायतीत दंड भरून बापूला सोडवण्याचं केलेलं नाटकही त्याच्या रचलेल्या डावाचाच भाग होता. बापू अण्णांना पुरेपूर ओळखून होता. पण कात्रीत सापडल्याने तोही हतबल झाला होतो. दंड भरल्यानं ‘त्या’ आळातून सुटका झाली असली तरी त्याच्यावरचा डाग गेला नव्हता हे बापूला माहित होतं.

सतराशे साठ भागनडी करूनही गावात उघड माथ्याने फिरणाऱ्या भ्रष्ट माणसांचा वीट येऊन बापू पुलावरच्या रावजीच्या हॉटेलात नोकरी स्वीकारतो आणि गाव सोडतो. अस्थम्यानं आजारी झालेल्या रावजीला बापूच्या रूपात परीस सापडतो. बापूच्या मित्रमंडळींच्या येण्याजाण्याने त्याच्या हॉटेलला बरकतच होत होती. रावजीची बायको राधालाही बापूचं नितळ माणूसपण भुरळ घालतं होतं. विजोड रावजीच्या संसारात परिस्थितीनं आणून टाकलेल्या राधाला बापूचं पौरुष साद घालतं होतं. बापूही या बुद्धिमतीकडे आकर्षित होत होता.

गारंबीत त्यांच्यातील जवळिकीची चर्चा सुरू होतीच. पण परस्परांबद्दल कितीही आकर्षण असलं तरी त्यांनी आपल्या मर्यादांचा भंग केला नव्हता. बापूच्या मावशीच्या कानावर ही बातमी जाते आणि ती बापूला जाब विचारायला रावजीच्या हॉटेलमधे येते. बापू खरं काय आहे ते तिला सांगतो. तरीही तिची समजूत पटत नाही.

असल्या उनाड गप्पांना आपल्या लेखी कुठलंही स्थान नाही असं बापू तिला निक्षून सांगतो. पण विठोबाच्या आकस्मात मृत्यूनं मात्र बापू हादरतो. त्याला दिलेलं वचन त्याला आठवतं. भरपूर पैसा कमवून विठोबाला सुखात ठेवायचं वचन! रावजीच्या हॉटेलात राहून हे वचन पूर्ण करता येणार नव्हतं म्हणून तो जड अंत:करणानं राधा आणि रावजीच्या हॉटेलचा निरोप घेतो. आणि मुसा काजीकडे पडेल ती कामं करून व्यापाराचं तंत्र अवगत करतो आणि एके दिवशी स्वत:चा व्यापार सुरू करून गडगंज पैसा कमवायला लागतो याच दरम्यान रावजीचा मृत्यू होतो.

बापू राधाला पत्नी म्हणून स्वीकारतो पण वयानं ती त्याच्यापेक्षा मोठी असली आणि विधीवत लग्न केलेलं नसलं तरीही मनानं ते पती-पत्नी झालेले असतातच. बापू गावात शाळा, दवाखाना सुरु करतो. अनेक अडल्या नडलेल्यांना चांगल्या मनाने मदत करतो. त्यामुळे राधा-बापूचं हे लोकविलक्षण नातं गावाला मंजूर नसतं तरीदेखील गावकरी त्याकडे दुर्लक्ष करतात. अण्णा खोताला याचा फार त्रास होतो. आता बापूला गावचा सरपंच होण्याचे वेध लागतात.

अण्णांच्या नाकावर टिच्चून त्याला संपवण्यासाठी सरपंच व्हाव लागणार होतं. राधा परोपरीनं त्याला समजावण्याचा प्रयत्न करते पण तो तिचं मुळीच ऐकत नाही तो  हट्टाला पेटतो. साम-दाम – दंड – भेद अशा कुठल्याही मार्गानं त्याला सरपंचपद काबीज करायचंच असतं. अण्णांचा सूड घेण्यासाठी! कारण आपल्या आईचे आणि अण्णां. खोताचे अनैतिक संबंध त्याला आयुष्यभर छळत असतात. विठोबाच्या मृत्यूतही अण्णांचाच हात असावा असा त्याला संशय होता आणि या साऱ्याचा हिशेब त्याला चुकता करायचा म्हणून सरपंच होऊन त्याला अण्णा  खोताला द्यायची असते पण अण्णा खोत स्वतःच काही दिवसांनी गाव सोडून जातो. जिद्दी हिंमती धाडसी बापू ची ही कथा लेखकाने उत्तमरीत्या मांडलेली आहे.

### ३.२.६ गारंबीचा बापू चित्रपट

श्री.ना.पेंडसे लिखित गारंबीचा बापू या कादंबरीवर आधारित गारंबीचा बापू हा चित्रपट आपल्या भेटीला आला यामधून गारंबी या गावी राहणारा बापू याची ही कथा आहे जो अत्यंत उनाड तसंच जिद्दी, हिमती, कष्टाळू आणि स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी कितीही धडपड करणारा आपल्या वडिलांवर, गावावर आणि स्वतःच्या मावशीवर प्रेम असलेला तसेच  अन्याय अत्याचार सहन न करणारा आणि गावात सगळ्यांच्या आवडीचा.

अशा या बापूची ही कथा दिग्दर्शकाने उत्तमरीत्या मांडलेली आहे स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वतःच्या बुद्धीचा वापर करून कितीही कष्टा करावे पडले तरी कष्ट करून खूप पैसे कमवण्याची जिद्द असलेला हा बापू/ ब्राह्मण घरातला असून सुद्धा त्याला स्वतःच्या जातीपेक्षा इतर जातीतील लोकांचा जास्त जिव्हाळा होता राधा वरचं त्याचं प्रेम तिच्याशी असलेले संबंध आणि त्या संबंधांना एक दिलेलं नाव आणि त्याच्या संबंधांसाठी त्याच्या विरोधात असलेल्या गावालाही एकट्याने सामोरा जाणारा हिम्मती बापू याची ही कथा आहे.

ग्रामीण जीवनातील शेती व्यवसाय तिथे असलेल्या खोताचा दरारा गावातील वातावरण एकंदरीत तिकडचा निसर्ग याचे उत्तम चित्रण तसेच त्या गावातील लोकांची भाषा स्वभाव चावडी आणि गावातील कुठल्याही छोट्या-मोठ्या गोष्टींचा निर्णय हा गावकरी मिळून घेतात ही परंपरा चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शकांनी अजून उत्तमरीत्या प्रेक्षकांसमोर मांडलेली आहे. आपल्या गावाचा विकास व्हावा आपल्या गावातील प्रत्येकाला त्याच्या त्याच्या नावाचा हिस्सा मिळावा त्याच्यावर कुठलाही अत्याचार अन्याय होऊ नये यासाठी झुकलेल्या बापूला गावकरी गारंबीचा बापू म्हणून ओळखतात. तर अशी ही बापू या पात्राच्या भोवती फिरणारी कादंबरी आणि त्याचे केलेले चित्रपटातील माध्यमांतर.

### ३.२.७ कादंबरी बनगरवाडी

बनगरवाडी' ही प्रादेशिक कादंबरी. प्रदेशाशिवाय या कांदबरीला 'कादंबरीपण'च प्राप्त होत नाही. कारण माणदेशातल्या या विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट लोकांचे (धनगरांचे) जीवन हा या कादंबरीचा प्राणभूत असा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ह्या प्रदेशाचे वर्णन लेखकाने अतिशय तपशीलवार केले आहे. त्यामुळे पात्राइतकेच त्यांचा परिसरही बोलका आणि सजीव झाला आहे. बनगरवाडी ही व्यंकटेश माडगूळकरांची १९५५ साली 'प्रसिद्ध' झालेली कादंबरी. संस्थानकाळातील राजवटीच्या अनेक खुणा या कादंबरीत व्यक्त झालेल्या आहेत.

राजाराम सौंदणीकर हा ध्येयवादी तरुण शिक्षक बनगरवाडी या गावात नव्याने रुजू होतो. या गावातील शाळा बंद पडलेली असते. या गावातील बहुतांशी धनगरांची मुले ही दिवसभर मेंढरांच्या मागे असतात. त्यामुळे शाळा बंद पडते.  त्यातच दादू बाल्या  मास्तरला दम देतो. गावात नीट राहायचं. गावातल्या गोष्टीत भाग घ्यायचा नाही. पूर्वीच्या मास्तरला मार कसा दिला ते देखिल तो सांगतो. त्याच्या भीतीचे सावट मास्तरांच्या मनावर होते. बाळा कारभारी मात्र त्याला धीर देतो. गावातल्या सर्व लोकांना चावडीत बोलावून घेतो. उद्यापासून मुलांना शाळेत पाठवून द्या म्हणून सांगतो. “आमच्या पोरांनी शाळा शिकून काय करायचं? त्यास्नी मेंढरामागनंच जावावं लागंल न्हवं. लिहायला, वाचायला शिकल्यावर त्यांना हिशोब करता येईल. चांगले व्यवहारज्ञान मिळेल”, असे मास्तराने म्हटल्यावर त्याचे म्हणणे कारभारी उचलून धरतो. गावातल्या लोकांना समजावून सांगतो. त्याचा गावावर वचक होता. कारभाऱ्याचा शब्द गावातले लोक मानत होते. हळूहळू मुले शाळेत आली. मास्तर त्यांना चिकाटीने शिकवीत होते. कारभाऱ्याने त्याला एक घर दिले. त्या छोटया घरात मास्तर राहात होते.

राजाराम सौंदणीकर हा तरुण मास्तर गावात शाळा चांगली चालवितो. बनगरवाडीतील माणसांशी त्याचे चांगले संबंध निर्माण होतात. गावातील मुलांना, लोकांना चांगले वळण लागावे म्हणून तो प्रयत्न करतो. गावातील लोक त्यांच्या शब्दाला मान देतात. गावकऱ्यांसाठी गावाच्या मदतीने तालीम बांधण्याचे काम सौंदणीकर मास्तर मनावर घेतात.

त्यासाठी कारभारी आणि पंचमंडळी त्याच्यापाठीशी उभी राहतात. गावातील लोकांकडून हरतऱ्हेने मदत घेतली जाते. कोणी विरोध केला तर कारभारी त्याचा विरोध मोडून काढतो. बाळा बनगर झाडं देण्यासाठी गावाला विरोध करतो तर गावातील सर्व लोक त्याच्यावर बहिष्कार टाकतात. तालमीचे बांधकाम सर्व गाव झटून करते. त्याचे उद्घाटन संस्थानच्या राजाच्या हस्ते होते. तो दिमाखदार सोहळा गावाच्या दृष्टीने अतिशय कौतुकाचा ठरतो.

तरुण मुलांना व्यायामासाठी चांगला आखाडा बनतो. इतर खेळही खेळले जातात. खेळाचे सर्व साहित्य सुरक्षितपणे ठेवले जाते. बनगरवाडी आणि तिच्या आसपासच्या प्रदेशावर मोठा दुष्काळ पडतो. मृगापासून पाऊस पडत नाही. शेतात कोणतेच पीक पेरले जात नाही. दुष्काळाचे सावट अधिक गडद होत जाते. पाण्याविना माणसे तडफडू लागतात. गावातील माणसे पोट भरण्यासाठी गाव सोडून बाहेर पडतात. मेंढरे आजाराने मृत्युमुखी पडतात. बनगरवाडीची शाळा, तालीम ओसड पडते. बनगरवाडीची दुष्काळाने दुर्दशा होते. गावात कुठं तरी कुणाच्या

तरी घरात म्हातारी माणसं राहतात. बाकी सगळं गाव ओस पडतं. शाळेत मुले नाहीत म्हणून सौंदणीकर मास्तरची बदली दुसऱ्या गावात होते.

२.२.८ चित्रपट बनगरवाडी

व्यंकटेश माडगूळकर लिखित बनगरवाडी या कादंबरीवर आधारित बनगरवाडी हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटची सुरुवात होते एका तरुण शालेय शिक्षकाच्या भूमिकेच्या आगमनाने. हा शिक्षक एकटाच एक निर्जन भाग ओलांडून बनगरवाडी गावी येतो . जेव्हा तो बनगरवाडीत पोहोचतो तेव्हा त्याला  समजत की ह्या गावातील सर्व शाळा बंद झाल्या आहेत आणि गावातील गावकरी आपल्या मुलांना शाळेत पाठवायला तयार होत नाहीत. त्या गावचा कारभारी (गावप्रमुख) यांच्या पाठिंब्याने तो गावकऱ्यांना आपल्या मुलांना शाळेत पाठवण्यासाठीचे महत्व पटवून देतो. पुढचे काही महिने तो शाळा देखिल चालवतो आणि गावातील निरक्षर, गरजू मुलांची मदत देखिल करतो, ज्यामुळे तो कधीकधी स्वतःच अडचणीत येतो.

लवकरच तो गावकऱ्यांना समाजाच्या सहभागातून व्यायामशाळा उभारण्यासाठीचे महत्व पटवून देतो. तो राज्याचा राजा पंतप्रतिनिधी यांना उद्घाटनासाठी देखिल आमंत्रित करतो. पुढे गावप्रमुखाच्या आकस्मिक मृत्यूने गाव आणि शिक्षकाला धक्का बसतो. त्यानंतर त्या गावामधे प्रदीर्घकाळ दुष्काळ पडतो. शिक्षक सरकारकडून मदत मिळविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतच असतात. त्यासाठी तो परिस्थितीची गंभीरता सांगणारी पत्रे सुधा वारंवार सरकारला लिहितो, पण त्याला प्रतिसाद काही मिळत नाही. दुष्काळामुळे बनगरवाडीच्या लोकांना गाव सोडून जावं लागतं. ज्यामुळे शाळेतला शिक्षक एकटाच पडतो जेथे विद्यार्थीच नसतात. असा हा बनगरवाडी या कादंबरीवर आधारित बनगरवाडी हा चित्रपट.

शिक्षणाचे महत्त्व गावातील लोकांना पटवून देणारे एक उत्तम उदाहरण या चित्रपटाच्या माध्यमातून दाखवले आहे. त्याचबरोबर एकंदरीत गावातील वातावरण तिकडचा निसर्ग हे देखील दिग्दर्शकाने उत्तमरीत्या दाखवलेला आहे. बनगरवाडी हा चित्रपट त्या गावावर आधारित नसून तर त्या गावात आलेल्या शिक्षकाला केंद्रस्थानी घेऊन लेखकाने लिहिलेला आहे असं म्हणणं वावगं ठरणार नाही. ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणारा उत्तम दर्जाचा हा चित्रपट आहे.

३.२.९ कादंबरी रिटा

रिटा वेलिणकर या पात्राभोवती सुरू असलेला भावनांच्या कल्लोळांभोवती फिरणारी कथा या कादंबरीतून मांडली आहे. साळवी नावाच्या वैवाहित बॉसबरोबर तिचे असलेले विवाहबाह्य संबंध तसेच लहानपणापासून आंग्लाळलेल्या पालकांसोबत राहून तिची झालेली जीवाची घुसमट, चार बहिणींमध्ये थोरली मुलगी असल्यामुळे आलेले 'मोठे'पण त्याचबरोबर कालांतराने आलेले कर्तेपण या सगळ्या संस्कारातून, पार्श्वभूमीतून उभी राहिलेली रिटा जेव्हा आपले अंतरंगाचे पैलू उलगडवून दाखवू लागते तेव्हा तिचा राग, लोभ, किळस, आनंद, उद्वेग असे विविध प्रकार जाणवत असले तरी मुख्यतः आपल्याला दिसते ते त्याच्या मुळाशी असलेले तिचं दु:ख.रीटा ही तत्कालीनच काय तर हल्लीच्या समाजातही भुवया उंचावणारी ठरावी अशी पात्र. तिचे तत्त्वज्ञान, तिच्या वाट्याला आलेले दु:ख, तिचे साळवीवरचे प्रेम आणि त्याच्यातील 'पूरूषावर'चा राग आणि त्याच्या 'गृहस्थ' असण्याचे आकर्षण आणि असुया या साऱ्यांचा मेळ लहान सहान प्रसंगांतून आणि चपखल वाक्यांतून व अचूक पात्र योजनेतून साजेशा वातावरणनिर्मितीतून लेखिकाने उत्तम पद्धतीने मांडलेला आहे .

केवळ रिटाच नव्हे तर सरस्वती आणि संगीता या पात्रांची योजना त्यांच्या स्वतंत्र तरीही समांतर कहाण्या, त्यांच्यातले एकमेकींना सुखावणारे तसेच दुखावणारे आणि असुयेने, प्रेमाने, रागाने भरलेले प्रसंग यातून कमी प्रसंगामधूनही तीन्ही व्यक्तीरेखा छानरित्या खुलताना दिसतायत. नुसत्या खुलत नाहि तर एका शाश्वत दु:खाचे तीन चेहरे आपल्या डोळ्यांसमोर भासतात.

३.२.१० रिटा वेलिणकर चित्रपट

रिटा या कादंबरीवरून रिटा वेलींकर हा चित्रपट रिटा या स्त्री पात्राच्या आयुष्यातील घडामोडी वर आधारित आहे रिटा ही एक ख्रिश्चन कुटुंबातील मोठी मुलगी. लहानपणापासूनच त्यांच्या घरची परिस्थिती फार बिकट होती तरीही त्या परिस्थितीत तिने आपलं शिक्षण पूर्ण केलं व त्यानंतर एका कंपनीमध्ये कामही सुरू केले. रीटाला दोन लहान बहिणी होत्या त्यांचे शिक्षण व त्यांच्या एकंदरीत खर्चासाठी ती पुढे शिकली नाही. घरची

परिस्थिती बिकट आणि त्याचबरोबर तिचा मानसिक छळ करणारी तिची आई अशा परिस्थितीत देखील तिने हिंमत न हरता स्वतःच्या हिमतीवर काम करायला सुरुवात केली. अत्यंत साधी व सरळ अशी ही रीटा.

तिच्या सगळ्यात लहान बहिणीचा तिला फार पाठिंबा होता सगळ्यात लहान असल्यामुळे ती आपल्या शेवटच्या बहिणीकडे खूप जोडलेली होती. स्वतःच्या मुलीप्रमाणे तिने तिच्या छोट्या बहिणीचा सांभाळ केला. रिटा व तिच्या मधल्या बहिणीशी एवढं काही पटत नव्हतं. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ती ज्या कंपनीमध्ये काम करू लागली तिकडचे जे मॅनेजर [व्यवस्थापक] होते त्यांना रीटाबद्दल आपुलकी, जिव्हाळा, माया वाटू लागली व ते तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत होते.

या गोष्टी सुरुवातीला रिटाला आवडत नव्हत्या पण तिचं काम बघून तिच्या मॅनेजरने तिचं प्रमोशन केलं आणि तिच्याशी संबंध वाढवले. ते मॅनेजर विवाहित होते त्यांना दोन मुलं देखील होती. हळूहळू रिटालाही त्यांचा सहवास आवडू लागला त्यांच्याबरोबर फिरणं  वेळ घालवण त्यांच्याशी बोलणं या सगळ्या गोष्टी तिला हव्याहव्याशा वाटू लागलय. रीटाचे मॅनेजर आपल्या घरी रीटाबद्दल फार कौतुकाने बोलत असत तिच्या कामाबद्दल तिच्या निष्ठेबद्दल त्यामुळे तीची इमेज मॅनेजरच्या घरी फार चांगली होती तिचं अधून मधून येणे जाणंवायच. जसे दिवस निघत गेले मॅनेजर आणि रिटा यांच्यामधील जवळीक वाढत गेली व ते फिजिकली अटॅच झाले.

एकमेकांपासून दूर राहणं एकमेकांचा सहवास न मिळणं या गोष्टीचा रिटाला त्रास होऊ लागला.त्या मॅनेजरने आपल्याच बरोबर राहावं अशी तिची फार इच्छा होती पण काही महिन्यांनी मॅनेजरच्या घरी त्यांच्या अनैतिक संबंधांबद्दल कळलं आणि तिचं मॅनेजरला भेटणं त्याच्या बायकोने बंद केले. रिटाच्या घरी सुद्धा ही बातमी कळल्यानंतर रिटा ते घर सोडून निघून आली व तिने स्वतःचा असा फ्लॅट घेतला जेणेकरून तिला व मॅनेजरला आपला असा वेळ घालवता येईल पण नियतीच्या मनात तसं नव्हतच मुळी. मॅनेजरचं तीच्यापासून लांब जाणं त्याचा सहवास न मिळणे यामुळे तिला फार त्रास होऊ लागला समाजाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि तिला मारणारे टोमणे यामुळे तिचे शरीर आणि मन हे फार थकून गेलं होतं.

एका वैवाहिक पुरुषाबरोबर राहणारी रीटा अशी तिची समाजात ओळख झाली होती पण रिटाला या नात्याबद्दल काही गैर वाटत नव्हतं कारण आपल्याला ज्या माणसाबद्दल आपुलकी वाटते जिव्हाळा वाटतो आपलेपणा वाटतो तो माणूस वैवाहिक असेना किंवा अविवाहित पण आपल्या मनात त्याचं स्थान काय आहे आणि त्याला आपल्याबद्दल काय वाटतं हे तिच्यासाठी फार महत्त्वाचा होते.

एके दिवशी याचं विषयावर चर्चा करत असताना तिला काही गोष्टी कळल्या ज्या तिने कधी इमॅजिन पण केला नव्हत्या. यामुळे तिला पॅनिक अटॅक आला आणि ती अचानक बेशुद्ध झाली स्वतःच्या स्वतःच बडबडायला लागली तिच्या डोक्यावर देखील परिणाम झालेला होता आणि लगेचच तिला मनोरुग्णालयात नेले गेलं.

त्यानंतर या सगळ्या वाईट प्रसंगी तिची लहान बहिण तिच्यासोबत कायम होती तिचा तिला नेहमीच पाठिंबा असायचा. काही काळाने रीटा बरी होत गेली आणि स्वतःचे आयुष्य एकटीने आनंदाने जगायला शिकली मनात असलेली भीती मनात असलेला विश्वास किंवा स्वतःला होणारा त्रास या सगळ्याच्या पलीकडचे तिचे जग झालं होते. स्वतःकडे बघण्याचा दृष्टिकोन तिचा पार बदलून गेला होता.

या चित्रपटात दाखवलेली रीटा आणि तिने केलेलं काम हे खरंतर अप्रतिम आहे कारण काही गोष्टी अशा या चित्रपटात दाखवलेल्या आहेत की त्या पडद्यावर त्या इमोशन्सनी किंवा त्या योग्य पद्धतीने प्रस्तुत होणं आणि ते चित्रीकरण करून प्रेक्षकांना भावना किंवा प्रेक्षकांच्या नजरेस पडून ते आश्चर्यचकित व्हावे असा अभिनय पल्लवी सामंत उत्तम रित्या पार पाडला आहे. खरंतर हा चित्रपट पाहत असताना काही गोष्टींबाबत प्रश्न पडतात पण लेखकाने ज्या पद्धतीने या कथेची मांडणी केली त्याच पद्धतीने किंवा त्यापेक्षा काही प्रमाणात जास्त उत्तमरीत्या दिग्दर्शकाने तो चित्रीकरण करून प्रेक्षकांसमोर उत्तमरीत्या मांडला आहे.

रिटा वेलिंगकर या कादंबरीच्या कथानकावरून रीटा वेलींकर हा प्रदर्शित झालेला चित्रपट यामध्ये स्त्री एकटी असताना स्त्रीला समाजात मिळणारी प्रस्थापित पुरुष सत्तेकडून बंधनातून बाहेर पडताना कोण कोणत्या समस्यांना सामोरे जावं लागतं याविषयीचे चित्र कादंबरीच्या आधारे दिग्दर्शिका रेणुका शहाणे यांनी उत्तमरीत्या मांडलेला आहे पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्री वावरत असताना ती तिच्या अस्तित्वाचा कशा पद्धतीने विचार करू शकते याचे चित्र रिटा वेलिंगकर या चित्रपटाच्या माध्यमातून मांडल गेलेल आहे. रिटा वेलींकर हा चित्रपट स्त्रीची अभिव्यक्ती स्त्रीचे स्वातंत्र्य वृद्धिंगत करणारा असा एका प्रस्थापित व्यवस्थेला छेद पाडणारा सिनेमा असं म्हणायला हरकत नाही.

३.२.११ चौंडक भंडारभोंग कादंबरी व दर्शन कथासंग्रह

चौंडक

चौंडक या “आपल्या समाजातील देव-धर्म, अनिष्ट रूढीपरंपरांचा बळी म्हणजे देवदासी. "जागतीण देवाची, मालकी गावाची" ही आपल्या बोलीतील म्हण तिच्या जगण्याचं सार सांगते. देवाच्या नावावर समाजातील राक्षसी वृत्तींनी निर्माण केलेल्या प्रथेच्या बळी ठरलेल्या देवदासी स्त्रियांची होरपळ 'चौंडकं’ या कादंबरीच्या माध्यमातून देवदासीच्या जगण्यातील दु:ख आणि तिच्या समस्यांचा वेध सुली या पात्राच्या व्यक्तिरेखेतून एक ठसठशीत वेदना आपल्या लेखनातून लेखकाने मांडली आहे.

भंडारभोंग कादंबरी

प्रसिद्ध साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी भंडारभोग या कादंबरितून  एक देवदासी  देवीला वाहिलेले जोगते यांच्याशी निगडीत कथा आपल्या लेखनातून प्रेक्षकांसमोर मांडली.  या कादंबरीमधून  रुढीपरंपरेचे चित्रण,  बळी ठरलेल्या जोगत्यांच्या जीवनाची झालेली अस्वस्थ अवस्था आणि त्यांना करावा लागणारा त्यांच्या आयुष्यातील खडतर प्रवास या कादंबरीमधून अगदी विस्तारीतपणे मांडलेला आहे. धर्म, जाती, रुढी-परंपरा, संस्कृती, प्रदेश, बोली यासंबंधी एक वेगळा जीवनानुभव मांडणारी ही साहित्यकृती. एखाद्या पुरुषाला देवाच्या नावे सोडून देणे आणि त्या पुरुषाने आयुष्यभर वेश्येपेक्षा वाईट पद्धतीचे जीवन जगणे ही कल्पनेपलिकडचे जोगत्यांना जगावे लागणारे जीवन कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्रप्रदेशच्या सीमेवर देखील पाहायला मिळते. या कादंबरीची भाषा, मांडलेले कथानक ही सर्वकाही वेगळं आणि अस्वस्थ करणार आहे. त्या समाजापासून तुटलेल माणूसपण नाकारलेल्या जोगत्यांच्या आयुष्याची  झालेली फरफट भंडारभोग कादंबरीच्या माध्यमातून तीव्रपणे मांडले आहे.

३.२.१२ जोगवा चित्रपट

चारुता सागर यांच्या दर्शन व राजन गवस यांच्या भंडारभोग व चौंडक या कादंबऱ्यांवर आधारित जोगवा हा अत्यंत लोकप्रिय चित्रपट. या चित्रपटांमध्ये मुख्य पात्र साकारणारे कलाकार यांच्या उत्तम अभिनयाने या चित्रपटाला एक वेगळाच दर्जा मिळालेला आहे. उत्तम अभिनय व उत्तम दिग्दर्शन यासाठी २००९ साली जोगवा या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. लोकसमजुती व लोककला यांच्या आधारे जोगता आणि जोगतीणीच्या जीवनावर आधारलेला जोगवा हा चित्रपट. या कथानकातील दोन पात्रांवर हा चित्रपट उभारलेला आहे ती म्हणजे तायाप्पा आणि सुली. मुलीला जट आल्यावर सुरू झालेल्या संघर्षाच्या प्रवासाचे चित्र जोगवा या चित्रपटाच्या आधारे केला आहे.

जट आल्यानंतर त्या समाजाकडून मिळालेली जोगतीणीला वागणूक, भोगावे लागणारे त्रास, सहन करावे लागणारे दुःख, तिच्या व्यथा-वेदना या सगळ्या गोष्टी उत्तमरीत्या या चित्रपटा द्वारे चित्रित केलेले आहेत. त्याचप्रमाणे जोगतिणीच नेमकं कार्य काय तिचं समाजात असलेलं स्थान व जोगतीणीं बद्दलची लोकांची मानसिकता याचही चित्रण या चित्रपटाद्वारे पाहायला मिळतं. जोगतीण व जोगत्या या दोघांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत यांचं दर्शन या चित्रपटाद्वारे दिग्दर्शकाने खूप छान पद्धतीने मांडलेले आहे.

तायाप्पा या मुख्यनायकाला समाजाकडून मिळालेली वागणूक त्याच्या मनाची झालेली अवस्था त्याला सहन करावी लागणारी हतबलता व मानसिक छळ या विषयावर मार्मिकतेने या चित्रपटात भाष्य केले आहे. तसेच चित्रपटाच्या शेवटी अशा पद्धतीच्या चालीरीती बंद व्हाव्या असाही संदेश दिलेला आहे. जोगवा या चित्रपटात तीन कलाकृतींचा मिश्रण करून चित्रपटाची रचना केलेली आहे. सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत नायक व नायिका यांचा संघर्षाचा प्रवास चित्रण केलेला आहे. त्याचबरोबर लोककलाकार, लोकरुढी, लोकसमजुती, लोककला, लोकश्रद्धा व लोकजीवन यांचा पुरेपूर वापर करून लेखकाने चित्रपटाचे चित्रीकरण केलेले आहे.

या चित्रपटांमधून ग्रामीण भागातील ज्या देवीला वाहिलेल्या जोगत्या असतात त्यांचं भयावह जीवन दिग्दर्शकांनी भंडारभोग या कादंबरीतून निवडून चित्रित केलं व देवाच्या नावावर असलेल्या समाजातील राक्षसी वृत्तींमधून निर्माण केलेल्या प्रथांचा बळी ठरलेल्या देवदासी स्त्रियांची होरपळ चौंडक या कादंबरीतून राजन गवस यांनी उत्तम रित्या मांडली. माणसातील माणूसपण अचूकपणे मांडणारा असा हा जोगवा चित्रपट .

३.२.१३ निशाणी डावा अंगठा कादंबरी

एक सामाजिक व्यवस्था आणि शिक्षण व्यवस्था या विषयावर आधारित रमेश इंगळे लिखित निशाणी डावा अंगठा ही कादंबरी. भारत सरकारद्वारे प्रौढ साक्षरता या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते प्रत्येक गावातील अशिक्षित किंवा पुरेसे शिक्षण न मिळालेल्या लोकांसाठी या योजनेची विभागणी केली गेली होती पण गावातील कोणी शिकूच नये त्यांनी अशिक्षितच राहावे अशी त्या गावच्या प्रत्येकाची इच्छा होती गरिबांना गरीबच ठेवावे अशा वृत्तीच्या कथानकाची की कादंबरी आहे.

त्या गावातील वातावरण एकंदरीत तिकडची भाषा, परिस्थिती, संवाद यांच्या माध्यमातून शिक्षणाचा अभाव असल्यामुळे तिकडची विदारक परिस्थिती कादंबरीच्या माध्यमातून वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न लेखकाने नक्कीच केलेला आहे तर अशी शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक जीवन आणि सरकारने दिलेल्या कामाची माणसं स्वतःचं काम टाळून कसे पैसेखाऊपणा करतात याचे उत्तम उदाहरण या कादंबरीच्या माध्यमातून वाचकांसमोर पोहोचलेले आहे.

३.२.१४ निशाणी डावा अंगठा चित्रपट

रमेश इंगळे  यांच्या कादंबरीवर आधारीत निशाणी डावा अंगठा हा चित्रपट  भारत सरकारच्या सर्व शिक्षा अभियानाच्या प्रौढ साक्षरता या कार्यक्रमाचा खुलासा करणारा शिक्षण व्यवस्थेवर आधारित हा चित्रपट आहे. महाराष्ट्रातील सावरगाव या गावी, प्रौढ साक्षरता नावाचा एक कार्यक्रम सुरू करण्यासाठी सहा पुरुष शिक्षक आणि महिला शिक्षकांच्या प्रयत्नांना अनेक अडथळे येत होते पण त्यांचा दृढनिश्चय असून देखील अनिच्छुक असणारे लोक पण सहभागी झाले आणि शिक्षक असे दोघेही प्रगतीच्या मार्गात उभे राहिले आणि घेतलेल्या उपक्रमाच्या यशाला धोका निर्माण होतो पण शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकांच्या कल्पक हस्तक्षेपाने आणि ग्रामस्थांच्या दयाळू पाठिंब्याने एक योजना तयार करतात.

सर्जनशील समस्या सोडवण्याचे कौशल्य असलेले स्वयंसेवक एकत्रयेतट आणि  एक चुकीचे प्रौढ साक्षरता वर्ग आयोजित करण्यासाठी एक योजना अखतात, ज्यामध्ये डमी विद्यार्थ्यांबरोबर वर्ग पूर्ण होतो आणि

गुपचूपपणे साक्षर गावकरी शिक्षकांचा मुखवटा धारण करुन येतात. कथानक जसे पुढे उलगडत जाते, तसे गाव आनंदाचे आणि बुद्धीचे एक मंच बनत जाते आणि साक्षरतेच्या महत्त्वावर एक मार्मिक सामाजिक संदेश देत असताना परिस्थितीची मूर्खपणा या कादंबरीतून दर्शवला जातो.

३.२.१५ नटरंग कादंबरी

नटरंग ही एका कलावंताच्या - तमासगिराच्या आयुष्याची शोकांतिक कादंबरी आहे. गुणा हा कादंबरीचा नायक आहे. जो कलेचा भुकेला आहे. कलेवर प्रेम करणारा कलेच्या वेडापायी काहीही करू पाहणारा नायक आणि त्याच्या आयुष्याची होणारी होरपळ 'नटरंग' या कादंबरीत रेखाटली आहे. नायकाच्या अनुभवाचे विविधांगी पदर यामधे आलेले आहेत. एका बाजूला त्याच्या जगण्यातलं दारिद्र्य आणि दुसऱ्या बाजूला कलेवरची त्याची निष्ठा या कात्रीतलं गुणाचं जगणं आणि त्यातून त्याच्या पदरी येणारा संघर्ष आणि परवड ही 'नटरंग' मध्ये प्रतिबिंबीत होताना दिसून येते. नटरंग या कादंबरीमध्ये एका कलावंताची शोकान्तिका मनाला पिळून टाकणारी आहे.

कादंबरीचा रचनाबंध हा अतिशय रेखीवपणे मांडणी गेला आहे. लेखकाने नटरंग या कादंबरीतून तमाशात नाचणाऱ्या कलावंतांचे जीवनानुभव चित्रित करत असताना तमाशा कलेतील वेगळी जीवनशैली दर्शवलेली दिसून येते. डॉ. आनंद यादव लिखित तमाशा मधील कलावंताच्या नशिबी आलेले अनुभव प्रकट करणारी ही कादंबरी.

३.२.१६ चित्रपट नटरंग

गुणवंतराव कागलकर उर्फ 'गुणा' या पात्राच्या भोवती फिरणाऱ्या कथनकावरील हा चित्रपट यात मुख्य पात्र साकारणारे अतुल कुलकर्णी हे एक गरीब गावातील मजूर असतो पण तरीही तो तमाशाचा ध्यास जोपासतो जो महाराष्ट्रातला एक लोकप्रिय नाट्य लोककला प्रकार आहे. अनपेक्षित परिस्थितींमुळे गुणाला मजुराची नोकरी गमवावी लागते पण अशा परिस्थितीत तो न खचता त्याने त्याचा मित्र आणि गुरू पांडोबा सोबत थिएटर कंपनी स्थापन केली. गुणाला खात्री होती की त्याच्या टोळीत एक महिला नर्तक असल्याशिवाय तो उतरू शकणार नाही. मग अथक परिश्रमातून शोध घेतल्यानंतर पांडोबाला त्याची माजी प्रेयसी यमुनाबाईची मुलगी नयना सापडते जी

कंपनीसाठी नाच्य, फॅन्सी पात्र करणार या एक अटीवर नाचायला तयार होते. षंढ निषिद्ध असल्यामुळे कोणीही ही भूमिका स्वीकारण्यास तयार नसल्याने गुणा हे पात्र साकारण्याची जबाबदारी स्वत:वर घेतो.

मग कलेची आवड असल्यामुळे तो भूमिका करण्याचे आव्हान स्वीकातो. त्याच्या कुटुंबाचा पाठिंबा नसतानाही, गुणा भूमिका योग्य करण्यासाठी कठोर परिश्रम करून त्याचे नाटक फार कमी वेळेत यशस्वी होते. पण हे केवळ त्यांच्या परिश्रमामुळेच शक्य होते. हे नाटक दोन स्थानिक राजकारण्यांमधील सत्तासंघर्षात अडकते जे आपल्या यशाचा राजकीय लाभ घेण्यासाठी वापर करू पाहतात. त्याच दरम्यान, गुणाच्या वडिलांचा मृत्यू होतो आणि त्याची पत्नी आणि त्याचा मुलगा इतर गावकऱ्यांकडून छळाला बळी पडतात. त्या गावातील प्रतिस्पर्धी राजकीय टोळ्या गुणाच्या नाटकावर कंपनीवर हल्ला करतात आणि त्याचे रंगमंच पेटवून देतात.

गुणा हा नपुंसकलिंगी असल्याचा आणि सामूहिक बलात्कार केल्याचा त्याच्यावर आरोप घालतात. त्याच्या कुटुंबाने नाकारले असूनही आणि त्याच्या मित्रांनी नाउमेद दाखवली असूनही, गुणा त्याचे स्टेज करिअर सुरूच ठेवतो, जिथे त्याला फक्त नैना सामील असते. गुणा आणि नैना यांचे पुढे लग्न होते आणि त्यांच्या नाटकांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कीर्ती  मिळते.

३.२.१७ पार्टनर कादंबरी

श्री पार्टनर" ही कादंबरी एक विचारात्मक तसेच सामाजिक आणि भावनात्मक पद्धतीने मांडलेली कथा आहे. या कादंबरीत, प्रमुख पात्र हे ‘श्री पार्टनर’ व त्याच्या जीवनात घडलेला संघर्ष, प्रेम, आणि समस्यांचे सामने यांच्यावर आधारीत आहे. श्री पार्टनरचे प्रेरणादायक वातावरण, साहित्यिकशैली, आणि समृद्ध चरित्र हे फार कौतुकास्पद आहे कादंबरीतील पात्र 'श्री पार्टनर' आपल्याला त्याच्या व्यक्तिगत आणि आत्मिक विकासात साथी मिळवतोच पण त्याचं जीवन साहित्यिकपणे आणि विचारात्मकपणे शोधायचे कार्य देखील दृष्टीस पडते.

या कादंबरीचं मुखपृष्ठ अतिशय बोलकं असून त्यातून कादंबरीचा समग्र विषय सोप्या चित्रातून मांडला जातो. यात राजा आणि राणीचे एकमेकांच्या विरुद्ध दिशांना असलेले चेहरे असलेला एक पत्ता दाखवला असून तो मध्यभागी बऱ्यापैकी फाटलेला दाखवला आहे.

३.२.१८ श्री पार्टनर (चित्रपट)

श्री पार्टनर हा चित्रपट एका मूळ ‘पार्टनर’ या कादंबरीवरून लिहिलेला आहे. यामध्ये महत्त्वाची पात्रे म्हणजे ‘श्री’ जो या चित्रपटाचा नायक आहे व ‘पार्टनर’ हा त्याचा मित्र आहे. श्री पार्टनर याचे दोन अर्थ निघू शकतात ते म्हणजे त्या चित्रपटाचा नायक श्री व त्याचा जिवलग व जवळचा मित्र पार्टनर व दुसरा अर्थ म्हणजे श्री व त्याची बायको किरण ही त्याची पार्टनर या अर्थाने. ‘श्री पार्टनर’ हा जो चित्रपट आहे तो एका कौटुंबिक विषयावरील चित्रपट आहे. ज्यामध्ये वाचनापूर्ती किंवा कुटुंब पुढे नेण्यासाठीची धडपड, प्रेम, विवाह ,आपुलकी, जिव्हाळा या सगळ्या विषयावर आधारलेला हा चित्रपट आहे. त्याचबरोबर श्री हा खरतर काहीच करू शकत नाही असं त्यांच्या घरच्यांचं म्हणणं आहे. कारण त्याचा भाऊ अप्रतात्म आहे.

त्यामुळे सगळे घरातले त्याचीच काळजी घेतात आणि त्यामुळे श्रीला त्यांनी एका बाजूलाच काढल्यासारखं केलं आहे. पण असं म्हणतात की आपल्या वाईट प्रसंगी, आपल्याला समजवणारा, आपल्याला समजून घेणारा एक दिशा मिळवून देणार एक असा माणूस आपल्या आयुष्यात येतो आणि आपले आयुष्याच् बदलून टाकतो. तसंच श्रीच्या आयुष्यात पार्टनर आला व त्याणे त्याला जगायला शिकवलं तसंच त्याचा आयुष्यही बदलून टाकला. त्यामुळे श्रीच्या ह्या पार्टनर हा जो त्याचा मित्र आहे त्याच्यावर मनापासून प्रेम आहे व त्याच्याबद्दल मनापासून मनात खूप आदरही आहे आणि जेव्हा श्री आपली सगळी स्वप्न पूर्ण करतो त्याला एक सुंदर मुलगी मिळते तो तिच्या प्रेमात पडतो आणि तिच्या प्रेमाखातर आणि पार्टनरच्या आशीर्वादाबरोबरच त्याला त्याच स्वप्न पूर्ण करण्यासाठीची दिशा मिळते आणि तो त्यांच्या घरच्या परिस्थितीपेक्षा उत्तम परिस्थितीमध्ये राहायला लागतो.

यामध्ये कौटुंबिक वाद सुद्धा आपल्याला दिसून येतात. कारण श्रीची बायको ‘किरण’ तिला त्या कौटुंबिक वादामधून हे समजून येतं की ज्या स्त्रीला त्यांच्या घरातले म्हणजे त्याचे आई, भाऊ, जाऊ हे सगळे आपल्या नवऱ्याला कधीच मान देत नव्हते कारण त्याच्याकडे तिचा पैसा अडकला किंवा पैसा लगता होता पण त्याच्याकडे अक्कल नव्हती असं त्यांना वाटायचं आणि जेव्हा तो स्वतःच्या पायावर उभा राहिला स्वतः घर घेतलं तेव्हा त्याचा उदो उदो होऊ लागला. असं म्हणतात की गरिबीत असणारा माणसाला किंमत नसते आणि तोच माणूस जेव्हा श्रीमंत होतो तेव्हा त्याचा उदो उदो होतो आणि याच आशयाचा हा खरंतर चित्रपट आहे आणि याच्यावरून जेव्हा किरण आणि याचा लग्न होतं तेव्हा श्रीची आई त्याच्याकडे खूप लाडीगोडी लावते. त्याच्याकडून काही वस्तू घेते आणि त्याच्याबद्दलचा तिच्या मनात एक आदर निर्माण होतो. पण यावरून त्यांच्या दोघांमध्ये खूप भांडणं होतात

पण असा एक प्रसंग येतो की जेव्हा किरण ज्या कंपनीत कामाला असते तिकडचा जो तिचा मित्र असतो त्याचा मोठा अपघात होतो आणि जेव्हा त्याची बायको डॉक्टरांना सांगते की शेवटचं मला त्याला काहीतरी सांगायचं आणि जाते मी सांगितलं नाही तर ते मला आयुष्यभर खायला उठेल. त्यावरून किरणला कळतं की आपण जर आपल्या नवऱ्याबरोबर अबोला धरला आणि समजा त्याला आपल्या मनातलय गोष्टी त्याच दिवशी नाही सांगितल्या तर आपल्यालाही असं खायला उठेल कारण त्याच दिवशी त्यांच भांडण झालेलं असतं आणि श्रीला एक सवय असते की आपल्या वैयक्तिक गोष्टी तो पत्राद्वारे लिहून पार्टनरला पाठवत असतो.

असं म्हणतात की आपल्या वैयक्तिक आणि पर्सनल गोष्टी असतात त्या कोणालाही सांगू नये पण श्रीला त्याच्याकडून काही सल्ले मिळत होते त्यामुळे तो पार्टनरला फार जपत होता. पार्टनर बद्दल जर सांगायचं झालं तर तो एक स्वच्छंदी आणि एक मुक्त असा माणूस होता त्याला स्वतःचा स्वाभिमान होता त्याचबरोबर त्याला कुठल्याही बंधनात अडकून राहायचा नव्हतं. तो मुलींबरोबर संबंध ठेवायचा त्यांच्यबरोबर त्याची वासनापूर्ती पूर्ण कारायची होती पण त्यां मुलीना कुठल्याही बंधनात अडकून ठेवायचं नव्हत .याच गोष्टीवरून पार्टनरला वाटायचं की आपल्यासारखाच ‘श्री’ वाईट वळणाला जाईल पण त्याने त्याला त्या वाईट वळणाला कधीच जाऊ दिलं नाही. तर त्याने ‘किरण’ बरोबर त्याला संसार थाटण्यासाठी मदत केली किंवा त्याच्या आयुष्य पुढे सुरळीत व्हाव व त्याच्या आयुष्यातली स्वप्न पूर्ण व्हावी यासाठी त्यांनी खूप कबाडकष्ट केले आणि त्याला त्याची स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुभा दिली व ‘श्री आणि पार्टनर’ यांच्या नात्याचं उत्तम उदाहरण या चित्रपटात दाखवलेला आहे.

### ३.२.१९ शाळा कादंबरी

मिलिंद बोकील लिखित ‘शाळा’ ही कादंबरी एक सामाजिक तसेच शिक्षण-संस्कृतीवर आधारित विचारात्मक कादंबरी आहे. या कादंबरीची ओघवती भाषा आणि शालेय मुला-मुलींचा मनोव्यापार उलगडण्याचा प्रयत्न या कादंबरीतून केलेला आहे. त्या काळचे अभ्यासाचे विषय, परीक्षा, शिक्षक, मुलं-मुली, आई-वडील, प्रत्येकाच्या वयानुरूप भाव-भावना हे सर्व विश्व हळूहळू उलगडत जाते आणि नकळत वाचकही त्या विश्वाचा एक भाग बनतो. शाळेच्या बंद दारांआड आणि भिंतीच्या आतही पक्षांसारखी मुक्त शाळा भरत होती , त्या शाळांना वर्ग नव्हत, ना भिंती, ना फळा, तर कधी कधी शिक्षकही नसायचे, ही शाळा कोणीती, या शाळेतले शिक्षण कसे

असतातयाचे उत्तम उदाहरण म्हणजे ही कादंबरी आहे. या कादंबरीत शाळेच्या वातावरणातील विविध पैलू, प्रवासाचा संघर्ष, आणि शिक्षण-संस्कृतीसंबंधित आग्रहाचं प्रदर्शन होताना दिसून येतं.

पात्रांचा विकास, त्यांच्या मार्गदर्शनातील प्रकट होणारे संघर्ष आणि त्यांच्या या संघर्षातून सुरचित कथेतून एक सकारात्मक दृष्टिकोन लेखकाने प्रदर्शित केला आहे. कादंबरीतील प्रमुख पात्रांच्या जीवनातील कडू गोड आठवणी, शिक्षकांचं आणि विद्यार्थ्यांचं नातं, विविध समस्यांचं सामना करणं, हे उत्तम रित्या दाखवलं आहे. कथेतील काही मुख्य विषय म्हणजे शिक्षा, समाज, प्रेम, विद्यार्थी-शिक्षक नातं, आणि विद्यार्थिनींचं स्वयंशिक्षणाचं महत्त्व हे आहे. त्यातले विचार वाचकांना शिक्षणाने देता येतात. समाजात एक सातत्याने बदल घडवण्याच्या दृष्टीने "शाळा" ही विचारशील कादंबरी आहे.

३.२.२० शाळा चित्रपट

जानेवारी २०१२ मध्ये प्रदर्शित झालेला 'शाळा' हा मराठीतील मिलिंद बोकील लिखित शाळा या कादंबरीवर आधारित एक खूप प्रभावी मराठी चित्रपट आहे. सुजय डहाके यांनी या चित्रपट दिग्दर्शित केला आहे. भारतीय लोकशाहिमधील आणीबाणीच्या काळातील किशोरवयीन मुलांच्या नजरेत येणारा हा ‘शाळा’ ही मुकुंद व त्याच्या मित्रांची ९ वीत शिकणाऱ्या मुलाची कथा. ते न चुकता अभ्यासासाठी आणि गप्पांसाठी भेटत असत जिथून ते त्यांच्या शाळेतील सवांगड्याना आणि विशेषतः मुलींना पाहत असतं आणि त्यांना नेहमी चिडवत असतं.

मुकुंदचा शिरोडकर नावाच्या मुलीवर खूप प्रेम होतं आणि ही कथा मुख्यतः शिरोडकर नावाच्या मुलिभोवती आणि मुकुंदभोवती फिरते. मुकुंद रोज वर्गात तिच्याकडे बघत होता पण तरीही तो अभ्यासात चांगला हुशार होता. मुकुंद आणि ती मुलगी पुढे चांगले मित्र बनतात आणि तो तिला गुप्त मार्गाने प्रभावित करण्याचा प्रयत्न करत असतोच.

१९७० च्या दशकातील भारतातील आणीबाणीची ही कथा आहे. ‘शिरोडकर’[म्हणजे ती मुलगी] देखील नंतर त्याला पसंत करायला लागते पण जेव्हा मुकुंद त्याच्या मित्राला मदत करत असताना दोषी आढळतो तेव्हा काही गोष्टी चुकीच्या घडतात आणि जेव्हा त्याचे मित्र त्या मुलीला एक प्रश्न विचारला की तुला देखील मुकुंद आवडतो आवडतो का? शिरोडकरांसमोर मुकुंदची छबी खराब होते. पुढे मुकुंदचा एक मित्र ९वीच्या परीक्षेत नापास

होतो त्याच्या घरी दुःखाचा कळस येतो. दुसरा मित्र गाव सोडून जातो आणि वडिलांची बदली झाल्यामुळे शिरोडकर तिच्या कुटुंबासह दूर जाते. एकंदर या चित्रपटातून प्रेम कथा शिक्षण आणि गावातील संस्कृती याचा उत्तम दर्शन आपल्याला घडतं. या चित्रपटाची भाषा एकदम साधी सोपी आणि समजणारी आहे.

३.२.२१ दुनियादारी कादंबरी

१९८२ पासून कॉलेजमध्ये असणाऱ्या आणि कॉलेजमधून बाहेर पडलेल्या सर्वांनाच आपलंसं करणारी सुहास शिरवळकर यांची ही दुनियादारी आहे. पुण्याच्या एस्.पी कॉलेजमधील घटनाप्रसंग, व्यक्ती, काल्पनिक आणि सत्याची अप्रतिम सरमिसळ असलेलं हे कथानक आहे. कोणत्याही कॉलेजमध्ये, कोणत्याही घरात, अथवा कोणाच्याही अवती भवती घडणारी ही दुनियादारीची कथा लेखकाने उत्तमरित्या मांडली आहे. मैत्री, शत्रुत्व, आनंद, दुःख, हेवेदावे, मत्सर अशा अनेक भावनांचा येथे कल्लोळ झालेला आहे.

दोन पिढ्यामधील नातेसंबंध, त्यांच्यामधले भावनिक अंतर याचाही वेध या कादंबरीच्या माध्यमातून मांडला आहे. म्हणूनचजोपर्यंत दोस्ती-यारी, दुष्मनी, आनंद, दुःख, प्रेम-मत्सर. या भावना मानवी मनात अनंत टिकून आहेत आणि त्याचबरोबर जोपर्यंत दोन पिढ्यांमध्ये मानसिक अंतर धरून आहे, तो पर्यंत ही काल्पनिक त्याचप्रमाणे प्रातिनिधिक असलेली काल्पनिक कथा आहे. दोन पिढ्या, आणि त्यांच्यातील नातेसंबंध,भावनिक अंतर याचाही मांडणी या कादंबरीतून आलेला आहे. या कादंबरीची भाषा सरळ सोपी व सुटसुटीत वाक्यांमध्ये फार छान पद्धतीने लेखकाने केली आहे.

३.२.२२ दुनियादारी चित्रपट

दुनियादारी हा चित्रपट कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलांचा व त्यांच्या होस्टेल लाईफ मध्ये घडलेल्या आयुष्यावर आधारित आहे. दुनियादारी या चित्रपटात श्रेयस हे मुख्य पात्र आहे. दुनियादारी मध्ये मित्र-मैत्रिणींचा असलेला सहवास, महाविद्यालयीन आयुष्यात घालवलेले त्यांच्याबरोबरचे क्षण, एकमेकांवर असणारा विश्वास एकमेकांवरचे प्रेम एकमेकांना सांभाळून घेणे, चांगल्या वाईट प्रसंगी त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणे व मैत्रीचे उत्तम उदाहरण असलेला हा चित्रपट २०१३ साली प्रदर्शित झाला. या चित्रपटातील पुरुष पात्र व स्त्रीपात्र यांचं

प्रत्येकाचं असं एक महत्त्वाचं स्थान आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात असलेले समस्या किंवा प्रत्येकाच्या आयुष्यातील चांगल्या वाईट घटना यांचा मेळ त्याचबरोबर त्या सगळ्यामधून आपलं प्रेम, आपली मैत्री जपणं आणि यांची सांगड या दुनियादारी चित्रपटातून उत्तमरीत्या दिग्दर्शकाने दाखवली आहे. दुनियादारी या चित्रपटातील अनेक गाणी हिट झाली.

या चित्रपटातील प्रत्येक गाण्याचे शब्द त्यामधील भाव आणि प्रेक्षकांना खेळवून ठेवतात तसेच कथानकात काहीही बदल न करता उत्तमरीत्या सादर केलेली ही सर्व गाणी मनाला भावणारी आहेत. या चित्रपटातील मुख्य पात्रांबरोबरच जी गौणपात्र दाखवलेले आहेत त्यांचासुद्धा आपल्या पद्धतीने एक ठसा उमटवलेला दिसून येतो 'श्रेयस' त्याचे मित्र किंवा दिग्याच्या बायकोचे आई-वडील किंवा इतर जी छोटी छोटी पात्रे आहेत तर त्यांची सुद्धा त्या चित्रपटांमध्ये एक स्वतःची छबी दाखवण्याच काम हे दिग्दर्शकांनी केलेलं आहे.

श्रेयस या पात्राभोवती फिरणारा हा दुनियादारी चित्रपट अत्यंत मनोरंजक तसेच भावूक करणारा व प्रत्येकाच्या मनात ठसा उमटवणारा असा अप्रतिम चित्रपट आहे. दिग्दर्शकाने मूळ कादंबरीच्या आधारावर माध्यमांतरीत केलेला हा चित्रपट असला तरी कथेचा आशय तोच ठेवून आपल्याकडे असलेल्या कौशल्यांचा वापर करून थोडेफार बदल करून दिग्दर्शकाने हा चित्रपट एक वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला आहे. २०२३ साली या चित्रपटाला दहा वर्षे पूर्ण झाली आहेत.

### ३.२.२३ ७२ मैल एक प्रवास कादंबरी

अशोक व्हटकर लिखित ७२ मैल एक प्रवास ही कादंबरी. या कादंबरीची कथा एका तरुण मुलाची साताऱ्यातील त्याच्या बोर्डिंग स्कूलमधून पळून जाण्याचा निर्णय घेतो या सत्यघटनेवर आधारित आहे. आणि इथपासूनचा त्याचा ७२ मैलाचा प्रवास त्या प्रवासात आलेले चढ-उतार भोगावी लागणारी संकटे या सगळ्यांचे वर्णन लेखकाने उत्तम रित्या या कादंबरीच्या माध्यमातून केलं आहे. ज्यात गुंडांचा पाठलाग करून मद्यधुंद जुगारींनी त्याला लुटले, तसेच तो कोल्हापूर जिल्ह्यातील त्याच्या गावाकडे प्रवास सुरू करतो इथपासून ते त्याला त्याच्या प्रवासात मिळालेली राधाक्का आई, तिची मुलं, त्यांचा संघर्ष आणि त्यांच्याबरोबर केलेला प्रवास. जे लोक आल्हाददायक वाटतात आणि त्याला आपल्याबरोबर सायकल चालवायला आमंत्रण देतात ते त्याचे आडनाव,

उच्चवर्णीयांनी त्याची केलेली मारहाण या संकटातून त्याला वाचवणारी राधाक्का जी तिच्या आजारी तान्हुल्या मुलासह आणि इतर तीन मुलांना घेऊन सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील शीगावला जात होती.

राधाक्का ही या कादंबरीतील केंद्रस्थानी असलेली पात्र आहे तिच्या वाट्याला आलेलं दुःख तिनी भोगलेले त्रास तिच्या नवऱ्याने तिला टाकून दिलेलं आणि उन्हातानात आपल्या तान्ह्या मुलांबरोबर ती वणवण फिरत असते आणि त्याचवेळी तिला लेखक भेटतात त्यांच्या मधलं नातं, त्यांच्यामधील संबंध आणि एकंदरीत कादंबरीत आलेले त्यांच्याबरोबरचे प्रसंग हे उत्तमरीत्या लेखकाने आपल्या कादंबरीतून मांडलेले आहेत. अशोक व्हटकर म्हणजेच लेखक आपल्या प्रवासाबरोबर पुढे सरकतो आणि गरिबीची खरी व्यथा जाणून घेतो तसा प्रवास सुरूच आहे.पण या प्रवासात अभय, सूर्यदा आणि त्याचा भाऊ राणू यांना आपला जीव गमवावा लागतो. अंतर्मुख मुलाचा हा प्रवास त्याला प्रौढ बनवतो आणि मग हा मुलगा स्वतः शिकून लेखक बनतो आणि स्वतःच्या प्रवासाची कथा लिहितो. अशी लेखकाने स्वतःच्या आयुष्यावर लिहिलेली आत्मकथनात्मक ७२ मैल एक प्रवास ही कादंबरी.

३.२.२४ ७२ मैल एक प्रवास चित्रपट

अशोक व्हटकर लिखित ७२ मैल एक प्रवास आत्मकथनात्मक कादंबरी आणि यावर आधारित ७२ मैल एक प्रवास हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला या चित्रपटाच्या माध्यमातून लेखकाच्या आयुष्यात घडलेल्या सत्यघटनेवरील प्रसंगावर आधारित ही कादंबरी चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शकांनी उत्तमरीत्या मांडलेली आहे त्यांच्या आयुष्यातील ७२ मैलाचा प्रवास आणि त्या प्रवासात मिळालेली राधाक्का तिची मुलं आणि प्रवासात घडलेल्या घटना, गरीबीचं दृश्य, एक नवऱ्याने सोडलेली स्त्री आणि तिच्या पदरी असलेली गरीबी, मुलं, पैशाची अडचण, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य काढण्यासाठी करावी लागणारी मेहनत, शरीरावर, मनावर, होणारे आघात, हालअपेष्टा यात काढावे लागणारे दिवस आणि काही गोष्टी मिळवण्यासाठी स्वतःचं शरीर एका पुरुषाला झोकून देणारी राधाक्का तिला होणाऱ्या वेदना याचं चित्रण आणि एका कमी वेळेत राधाअक्का आणि लेखक यांच्यामध्ये तयार झालेलं नातं त्याचबरोबर एका अनोळखी मुलाला आपलं मानणारी राधाअक्का आणि तिच्यामधील मातृत्व हे या चित्रपटाच्या माध्यमातून आपल्यासमोर येते . ७२ मैलाचा प्रवास त्यामध्ये येणारे खडतर अनुभव आणि एकंदरीत वातावरण निर्मिती, भाषा, निसर्ग, दाखवली जाणारी दृश्य ही खरंतर खूप अप्रतिमरीत्या दिग्दर्शकाने आपल्यासमोर मांडलेली आहे. रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नाती आपल्या आयुष्यात एक वेगळच

वळण देऊन जातात याचं उत्तम उदाहरण या चित्रपटाच्या माध्यमातून स्वतः लेखकांनी लिहिलं आणि दिग्दर्शकाने हे प्रेक्षकांसमोर उत्तम रित्या मांडलं आहे.

३.२.२५ दशक्रिया  कादंबरी

बाबा भांड लिखीत 'दशक्रिया' ही भानुदास नावाच्या एका शाळकरी मुलाच्या आयुष्याची कहाणी आहे. बुद्धीचातुर्य व साहस पणाला लावून पोटाची खळगी भरून काढणारा तसेच दारिद्र्याने ढासळून गेलेल्या आपल्या कुटुंबाला आधार देऊन त्यांचा भार हलका व्हावा याची स्वप्न पाहणाऱ्या भानुदासची ही कथा आहे. कथानक पुढे हळूहळू विस्तारत जातं आणि रोगट रूढीं परंपरेमुळे  धर्माला आलेली अवकळा झालेली विदारक जातिव्यवस्था तसेच अर्थार्जनाचे एकाच वेळी संतापजनक आणि करुणाजनक वाटणारे पर्याय व त्याचप्रमाणे कोलमडलेली कुटुंबव्यवस्था त्याचबरोबर उच्च-नीचता यांसारख्या अनेक वर्णांना व वर्गांना पोटासाठी एकाच पातळीवर आणणारी विचित्र  समाजकस्थिती, आधुनिकीकरणाकडे पाठ फिरवणाऱ्या समूहांची तसेच लोकांच्या मानवी नात्यांचे पैशांमुळे बदलत राहणारे रंग, मृत्यू आणि धर्माबाबतचे  विचार, सोनेरी इतिहासाचे सडून गेलेले कातडे अंगावर ओढून सुस्त पडलेले नगर या सारख्या अनेक गोष्टींना कवेत घेऊन सत्य स्थितीचा  क्लेशदायक दस्तऐवज लेखकाने आपल्या या वेगळ्या विषयाच्या कादंबरीतून मांडला आहे . तसेच समकालिन साहित्यापेक्षा वेगळ्या ढंगाची आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी ही दशक्रिया ही कादंबरी.

३.२. २६ दशक्रिया चित्रपट

प्रसिद्ध लेखक बाबा भांड यांची 'दशक्रिया' या कादंबरीवर आधारित दशक्रिया हा चित्रपट. माणसाच्या मृत्यूनंतर दहाव्या दिवशी करणारे विधी या घटनेवर आधारित हा चित्रपट आहे ज्यात पौरोहित्य करणाऱ्या माणसाची अवस्था धार्मिक रुढीपरंपरा यांचा समावेश येणाऱ्या कथानकावर आधारित एका मुलाची ही कथा आहे जी दिग्दर्शकाने उत्तमरीत्या आपल्या चित्रपटातून मांडली आहे.

अंगावर काटा येणारी अशी ही जाती व्यवस्था. महत्त्वाचे म्हणजे 'मेलेल्या मडयावरचं लोणी खाणं' अशा प्रकारची भूमिका या चित्रपटाच्या माध्यमातून उत्तेजित केली आहे. मेलेल्या माणसाचे कर्म करण्याऐवजी त्यातून

मिळणारा पैसा याला फार महत्त्व आताच्या जगात कसे आहे याचे दर्शन या माध्यमातून केले गेले आहे. त्याचबरोबर आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्याला भोगावे लागणारे कबाडकष्ट त्याच्यावर आलेल्या जबाबदाऱ्या आणि त्यामधून तो कशा पद्धतीने आपली पोटाची खळगी भरतो याचे उत्तम चित्रण दिग्दर्शकाने या चित्रपटाच्या माध्यमातून केलेले आहे.

३.२.२७ कादंबरी आनंदी गोपाळ

आनंदी गोपाळ कादंबरी पुण्यातील ३१ मार्च १८६५ साली बाळशास्त्री माटे यांच्या घरी यमुनबाईं माटे यांचा जन्म होतो. त्या गणपतरावांची मुलगी असून आजीच्या लाडाने वाढलेल्या असतात. अवघ्या बारा वर्षाच्या वयात यमुनाबाईंचा विवाह गोपाळराव जोशी यांच्याशी केला जातो. गोपाळराव हे तऱ्हेवाईक स्वभावाचे असतात पण स्त्री शिक्षणाला महत्त्व देणारेदेखील असतात. त्यांनी आपल्या बायकोला शिकवायचंच ही जिद्द मनात बाळगली होती आणि त्यामुळेच लग्नानंतर गोपाळराव आनंदीबाईंना पुस्तके आणून देत असत व अभ्यास करायला देखील लावत असतं त्या बालवयातील निरागस आनंदीबाई जोशी खेळण्यात आणि घरकामे करण्यात आपला वेळ घालवत असत.

शेवटी एकेवर्षी वर्तमान परिस्थितीला समजून घेऊन सासरचे वातावरण पाहून आनंदीबाईंना ऋतुप्राप्ती झाल्यानंतर गोपाळराव जोशी त्यांना आलिबागला घेऊन जातात आणि तिथून आनंदीबाईंच्या शिक्षणाची खरी सुरुवात होते. १८८० दशकाचा तो काळ होता त्याकाळी स्त्री शिक्षण हे समाजाला मान्य नसायचे पण गोपाळरावांच्या मनातील स्त्री शिक्षणाची जिद्द जागृत होती. आनंदीबाईंना ते सांगत असत की 'अभ्यास सोडून समाजातील इतर कोणतेही नियम पाळण्याची गरज नाही'. गोपाळराव रुढी परंपरांदेखील नाकारत आणि फक्त अभ्यास हेच आनंदीबाईंचे महत्त्वाचे ध्येय असले पाहिजे याची दक्षता घेत असत. आनंदबाईंच्या जीवनात अनेक वाईट प्रसंगांची झलक येते पण एक प्रसंग आनंदीबाईचे जीवनच बदलून टाकतो त्या गर्भवती होतात आणि त्यांचे नुकतेच जन्मलेले मूल काही दिवसात वारते.

या घटनेनंतर त्या खूप हादरतात तसेच अतिशय दुःखी पण होतात एवढे होऊन देखील त्यांचा अभ्यास मात्र थांबत नाही. आणि दुसरे म्हणजे समाजातील लोक त्यांना भरपूर त्रास देतात पण त्यांचा निश्चय एक

तिळमात्रही न ढळता उलट अधिकाधिक दृढ होत जातो. गोपाळराव आनंदीबाईंचा दाखला 'गर्ल्स मिशनरी स्कूल' मध्ये करतात आणि काही दिवसात तीथूनही त्यांना शाळेतून काढून टाकले जाते.

या सगळ्या गोष्टींचा विचार करून शेवटी गोपाळराव आनंदीबाईंना अमेरिकेला पाठवण्याचा निर्णय घेतात. चर्चमधील असणाऱ्या गुहीन नावाच्या पादऱ्याच्या सहायाने ते अमेरिकेतील वाईल्डरना पत्रसुधा पाठवतात आणि त्यांच्या सांगण्यानुसार धर्मांतर करण्याची तयारी करतात पण आनंदीबाई धर्मांतर करण्यास त्यांना नकार देतात. असाच एका वर्षाचा काळ निघून जातो आणि त्या काळातच त्यांना मिसेस् कार्पेन्टरांचे पत्र येते आणि अनेक संघर्षांना सामोरे जात शेवटी आनंदीबाईंचे अमेरिकेस जाण्याचे ठरते. गोपाळरावांची नोकरी जाते पण ते हिम्मत हारत नाहीत. ते आनंदीबाईंना एकट्याने अमेरिकेला पाठवतात आणि मुख्य म्हणजे आनंदीबाई एकट्या जायला तयारदेखील होतात.

पुढे सुरू होतो तो आनंदीबाईंचा अमेरीकेतील एकटीचा खडतर प्रवास. तीन वर्ष अमेरीकेतील शिक्षण घेताना आनंदीबाईंना अनेक त्रास, दुःख सहन करावे लागते. तरीही त्यांचा निश्चय, साहस आणि धैर्य काही कमी होत नाही.

भारतात गोपाळरावही अनेक अडचणींना सामोरे जात असतात. आनंदीबाईंचा संघर्ष शेवटी सफल होतोच. त्यांना ११ मार्च १८८६ या दिवशी डॉक्टरकीची पदवी मिळते आणि १९ व्या शतकात अवघ्या २२ वर्षांची आयुत त्या भारतातील पहिली महिला डॉक्टर बनतात.

तो पदवीप्रदान सोहळा आनंदीबाई आणि गोपाळराव यांच्या जीवनातील खूप आनंदाचा प्रसंग असतो आणि भारतातील किमान १३० वर्षापूर्वी घडलेल्या इतिहासाचे सुवर्णपान बनते. आनंदीबाईंचा काही महिन्यांनी लगेच मृत्यू होतो पण तरी त्यांच्या साहसाची ही कहाणी अनेकांना प्रोत्साहन देणारी ठरते. अशी ही आनंदीबाई गोपाळराव जोशी यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक कादंबरी.

### ३.२.२८ आनंदी गोपाळ चित्रपट

पहिल्या महिला डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी यांच्यावर आधारित ऐतिहासिक कादंबरी आनंदी गोपाळ यावरून हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटाच्या माध्यमातून आनंदीबाईंचा जन्म त्यांचे बालपण त्यांचे

बाल वयातील केलेले लग्न आणि त्यानंतर गोपाळरावांनी त्यांना शिक्षणासाठी केलेली मदत त्यांचं शिक्षण व्हावं यासाठीची त्यांची धडपड, धर्मांतर करणे आणि स्त्री शिक्षणाचे महत्त्व हे त्याकाळी किती संकटांना सामोरे जाऊन गोपाळरावांनी पूर्ण केलं यावर आधारित या चित्रपटाचे कथानक आहे.

या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शकाने त्याकाळचं वातावरण एकंदरीत त्या काळाच्या लोकांची वृत्ती-प्रवृत्ती किंवा त्याकाळचा पेहराव त्याकाळची बोलणारी मराठी भाषा विध्वा स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःख आणि त्यांना भोगावे लागणारे त्रास त्यांच्या नशिबी येणार दुःख यांचा देखील तसेच त्याकाळची संस्कृती याची मांडणी दिग्दर्शकाने चित्रपटाच्या माध्यमातून उत्तमरीत्या निभावलेली आहे. या चित्रपटातील 'वाटा वाटा वाटा ग', 'मम पाऊली', 'तू आहेस ना' यासारखी गीते प्रत्येक प्रेक्षकाच्या मनाचा वेध घेतातच.

अवघ्या लहान वयात आनंदीबाईंना डॉक्टर होण्यासाठी प्रवृत्त केलेले गोपाळराव आणि स्वतःच्या जिद्दीवर हिम्मतीवर आणि गोपाळरावांच्या प्रेमाखातर आनंदीबाई जोशी यांनी या २२व्या वर्षी अमेरिकेत जाऊन शिक्षण घेऊन डॉक्टरची पदवी मिळवतात आणि आपल्या पुढच्या पिढीतील स्त्रियांना एक आदर्श निर्माण करतात या गोष्टीचा एक उत्तम उदाहरण माध्यमांतराच्या रूपाने प्रेक्षकांसमोर प्रत्यक्षात आलेला आहे. अशा पद्धतीने ऐतिहासिक कादंबरीवर आधारित आनंदी गोपाळ हा पहिल्या महिला डॉक्टर यांच्यावर आधारित चित्रपट दिग्दर्शक समीर विद्वांस यांनी उत्तमरीत्या प्रेक्षकांसमोर मांडला आहे.

३.२.२९ समांतर कांदबरी

सुहास शिरवळकर लिखित समांतर ही रहस्यमय गुढ अशी कादंबरी. या कादंबरीचे कथानक हे वाचता वाचता आश्चर्यचकित करणारे आणि पुढे काय घडणार आहे याची उत्सुकता निर्माण करणारे आहे. उत्तम अशा रीतीने संवादांच्या माध्यमातून वातावरण निर्मितीच्या माध्यमातून व पात्रांच्या माध्यमातून लेखकाने उभारलेली ही साहित्यकृती आहे.

आपलं भविष्य जाणून घेण्यासाठीची 'कुमार महाजन' ची धडपड या कादंबरीतून लेखकाने उत्तमरीत्या साकारली आहे 'सुदर्शन चक्रपाणी' हा त्याचा भूतकाळ असून कुमार महाजन हा वर्तमान काळ आणि पुढचं भविष्य काय आहे हे हातांच्या रेषांवर ठरवणारी अशी वेगळ्या विषयाची ही कादंबरी. भविष्य किंवा साधू महाराज यांच्यावर

विश्वास न ठेवणारा 'कुमार महाजन' मित्राच्या सल्ल्याने साधूकडे जातो व हातांच्या रेषांवरून आपलं भविष्य काय आहे हे जाणून घेण्यासाठी. त्यानंतर त्याला समजलेला सत्य की याच हातांच्या रेषांवर जगणारा एक माणूस म्हणजेच 'किरण चक्रपाणी' हा भूतकाळात जगून गेला आहे त्याला शोधण्याची धडपड, त्याला शोधताना आलेले अडथळे, खडतर प्रवास आणि त्याला भेटल्यानंतर समजलेले सत्य हे या कादंबरीतून उत्तमरित्या लेखकाने मांडलेले आहे. समांतर या शीर्षकावरून कुमार महाजन आणि किरण चक्रपाणी यांचं आयुष्य एका समान रेषेवर चालणार कथानक त्यामध्ये येणारे वातावरण किंवा त्यातील संवाद एकंदरीत भाषाशैली व पुढे काय होणार आहे ही असणारी उत्सुकता या सगळ्यांमध्ये दडलेली कादंबरी.

भविष्य जाणून घेण्यासाठी गेलेला 'कुमार महाजनला' 'चक्रपाणीने' सांगितलेल्या गोष्टी आणि त्याला दिलेली डायरी व ती वाचण्यासाठी घातलेली अट यावरून आपल्याला एवढंच समजतं की जरी भविष्य आपल्याला माहित असलं तरी ते कधीही बदलता येत नाही पण निदान आपण सावध होऊ शकतो व किरण चक्रपाणीचं एक महत्त्वाचं वाक्य म्हणजे "काहीही केलं तरी काळ हा जिंकतोच." अशा या वेगळ्या ढंगाच्या कादंबरीवर आधारित पुढे समांतर ही वेब सिरीज सुद्धा आपल्या भेटीला आलेली दिसून येते.

### ३.२.३० समांतर वेब मालिका

'समांतर' या कादंबरीवर आधारित समांतर ही वेब मालिका 'कुमार महाजन' या पात्राभोवती फिरणारी आहे. स्वतःचं भविष्य जाणून घेऊन त्या आधारे वर्तमान काळात जगणं यावर कुमार महाजनचा विश्वास नव्हता पण त्याच्या मित्राच्या आग्रहाखातर त्याने आपलं भविष्य जाणून घेण्यासाठी स्वामींकडे जायचं ठरवलं व स्वामींच्या अभ्यासातून त्याला जाणवलेलं स्वतःच्याच आयुष्याबद्दल एक गुपीत यावर आधारीत ही वेब मालिका आहे.

पुनर्जन्म भूतकाळात घडलेल्या घटना वर्तमान आणि भविष्यात होणाऱ्या गोष्टी या तिन्हीचा संगम या वेब मालिकेच्या माध्यमातून दिग्दर्शकाने उत्तमरीत्या मांडलेला आहे. ही वेब सिरीज दोन भागांमध्ये विभागली गेलेली आहे व प्रत्येक भागामध्ये दहा ते अकरा भाग करून ही वेब मालिका प्रेक्षकांसमोर प्रस्तूत केली आहे. या वेब मालिकेमधील प्रत्येक पात्र हे उत्तमरीत्या साकारला गेलेला आहे मग ते कुमार महाजन, त्याची बायको, त्याचा मित्र, स्वामी, भूतकाळातला चक्रपाणी या सर्वांनीच आपापल्या पात्राला योग्यरीत्या न्याय दिलेला आहे.

सुरुवातीपासून शेवटपर्यंत या कथानकामध्ये पुढे काय घडणार आहे याची उत्सुकता वेब मालिका बघताना नक्कीच होते जसे-जसे एक-एक भाग पुढे जातात तस तशी उत्कंठा व उत्सुकता वाढते व प्रत्येक भागाच्या शेवटी काहीतरी नवीन इशारा मिळतो पुढे असं घडू शकतं अशी कल्पना मनात यायला सुरुवात होते. प्रत्येक माणसाला आपलं भविष्य काय असेल याची उत्सुकता तर लागलेलीच असते पण कुमार महाजन हा स्वतःच भविष्य स्वतः घडवतो असं त्याचं व्यक्तिमत्व.

पण त्याच्या मित्राच्यासांगण्यावरून स्वामींकडे जाऊन स्वतःच्या भविष्याची माहिती मिळवण्यासाठी गेलेला कुमार महाजन हा त्याच्या भूतकाळाची कथा जाणून घेण्यासाठी जीवाचं रान करतो आणि शेवटी चक्रपाणीला भेटून आपलं भविष्य काय असेल याबद्दल ची माहिती देण्यास सांगतो. या चक्रपाणीकडे पोहोचेपर्यंत त्याला अक्षरशः नाकीनऊ येतात व तिथे जाताना घडलेल्या घडामोडींचे काही अवशेष स्वामींनी त्याला आधीच सांगितलेले असतात. चक्रपाणीला भेटल्यानंतर आपण जो काही वर्तमानकाळ जगतो आहे तो याआधी या चक्रपाणीने जगलेला आहे व आपलं भविष्य देखील चक्रपाणी प्रमाणेच आहे आणि याची नोंद चक्रपाणीने डायरीमधे लिहून ठेवलेला आहे याची उत्सुकता ही कुमार महाजनला होती पण हे सत्य कुमार महाजनला लवकरात लवकर कळू नये यासाठी चक्रपाणी त्याला अट घालतो "तुझं भविष्य तुझ्या हातात" मी तुला एकाच अटीवर देईन ते म्हणजे मी माझ्या आयुष्यात घडलेल्या घडामोडींचा उल्लेख या डायरीमध्ये केलेला आहे.

पण या डायरीतलं रोज केवळ एकच पान वाचून तू उद्या काय घडेल याची तयारी करू शकतोस पण कधीही एकाहून जास्त पान वाचण्याची हिंमत करू नकोस यामुळे तुझा भविष्य धोक्यात येईल. चक्रपाणीच्या सांगण्यावरून कुमार रोज एक-एक पान वाचतो व चक्रपाणीच्या आयुष्यात घडलेल्या प्रत्येक घडामोडी त्याच्याही आयुष्यात घडतात उद्या काय होणार आहे याची जाणीव त्याला आधीच झाली असली तरी तो काही गोष्टी बदलू शकत नव्हता पण काय घडू शकतं याची त्याला कल्पना होती.

कथानक जेव्हा संपत आणि चक्रपाणी प्रमाणेच त्याचाही अपघाती मृत्यू होतो आणि ज्यावेळी तो चक्रपाणीकडे जातो त्यावेळी त्याला वेगळंच सत्य कळतं ते म्हणजे चक्रपाणी हा जिवंत नसतो ज्याने त्याला आपल्या भविष्याबद्दलच्या डायऱ्या दिलेल्या असतात त्याबद्दलची माहिती दिलेली असते ते चक्रपाणीच भूत असतं आणि त्याची सुटका होण्यासाठी आपला जन्म झाला आपल्या आयुष्यात एवढ्या सगळ्या घडामोडी होऊन गेल्या व आपण इथपर्यंत पोहोचलो आपलं आयुष्य जगलो व चक्रपाणीला मुक्त केलं याची जाणीव कुमारला होते आणि

मुक्त होऊन निघताना कुमार महाजनला एवढेच सांगतो की दुसरा कुमार महाजन जन्माला येईपर्यंत तुला या वाड्यातच राहायचं आहे. असं सांगून सगळ्या वाड्याचे दरवाजे बंद करून चक्रपाणी मुक्तपणे तिथून निघून जातो.

३.२.३१ चंद्रमुखी कादंबरी

विश्वास पाटील यांची राजकारण व तमाशा कला यांची उत्तमरित्या सांगड घालणारी 'चंद्रमुखी' ही एक विलक्षण कादंबरी. आपल्या सुंदर रूपाने आणि घुंगराच्या ठेक्याने अनेकांना मोहीत करणारी रूपवती चंद्रा आणि एका ध्येयधुरंधर राजकारण्याची ही एक श्रृंगारिक कथा पाटलांनी अत्यंत प्रभावीपणे रेखाटलेली आहे. खासदार दौलतराव देशमाने एक यशस्वी मराठा राजकारणी होते. पंतप्रधान मॅडम सुचेता पंडित यांच्या खास मर्जीतले ते  एक नेता होते. अत्यंत बुद्धिमान आणि चाणाक्ष नेता. चौफुल्यामधील चंद्रमुखीच्या रूपावर तसेच तिच्या सौंदर्यावर आणि तिच्या कलेवर ते फिदा होतो. चंद्रमुखीही त्यांना दिलाचा दरबार मानत होती.

तमाशा जीवनात अडकलेली चंद्रा ही लावणीसम्राज्ञी आणि राजकारणाच्या चौकटीत उभा असलेला एक महत्त्वाकांक्षी नेता अशी या दोहोंच्या मिलनाची एक श्रृंगारिक कहाणी अनेक सामाजिक, राजकीय आणि कौटुंबिक प्रश्नांची समीक्षा करताना दिसून येते. कथानकामध्ये लेखकाने फ्लॅशबॅक तंत्राचा यथेच्छ वापर केलेला आहे. खासदार दौलतराव, त्याचा सासरा दादासाहेब, साडू नानासाहेब व बायको डॉली ही पात्रे एका बाजूला तर चंद्रमुखी, तिची आई व त्यांचा साथीदार हे दुस-या बाजूला आहेत.

एकमेकांविरोधी असणा-या या ठेवणीमुळे नात्याची एक घट्ट वीण कथानकामध्ये गुंफली आहे. सर्वस्वी भिन्न प्रकृतीच्या या दोन दुनिया अशा जवळजवळ आल्यामुळे वाढीस लागलेले प्रेम, वैर, हे या कादंबरीतून साकार होते. कादंबरीतील सर्व शहरी पात्रांची भाषा तर फारच कृत्रिम वाटते, व मूळ इंग्रजी वाक्यांचे शब्दश: भाषांतर केले असावे असे वाटते.

३.२.३२ चंद्रमुखी चित्रपट

विश्वास पाटील यांच्या चंद्रमुखी या कादंबरीवर आधारित २०२२ साली प्रसाद ओक दिग्दर्शित चंद्रमुखी हा चित्रपट प्रदर्शित झाला ज्यामध्ये आदिनाथ कोठारे, मृण्मयी देशपांडे ,समीर चौगुले ,अमृता खानविलकर, मोहन

आगाशे, या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारल्या अत्यंत सुपरहिट व यशस्वी असा हा चित्रपट चंद्रमुखी व दौलतराव या मूळ पात्रांना केंद्रस्थानी ठेवून या चित्रपटाच्या कथानकाची निर्मिती केली आहे.

दौलतराव हे खासदार असतात उद्योग मंत्रांच्या अचानक झालेल्या निधनानंतर उद्योग मंत्र्यांच्या पदासाठी दौलतरावाचे नाव पुढे केले जाते त्यांना ते पद मिळते देखील पण त्यांचे सासरे ही त्यासाठी प्रयत्नशील असतात दौलतरावांना त्या पदाची तेवढीच खात्री असते पण वर्तमानपत्रात दौलतरावांचे चंद्रमुखी बरोबर छायाचित्र त्यावेळीच छापून येते ही बातमी सर्वत्र पसरते जेव्हा पुन:प्रत्य पद्धतीचा वापर करून आधी काय घडलं होतं यावर प्रकाश टाकला जातो. त्यावेळी हे समजून येते की दौलतराव हे सारंग फाटावर कसे पोहोचले चंद्रमुखीची आणि त्यांची भेट कशी झाली चंद्रमुखी मध्ये त्यांचा जीव कसा गुंतला आणि परत सारंग फाट्यावर जाण्याची त्यांची ओढ अशा सर्व गोष्टी आपल्याला दिसून येतात त्याचप्रमाणे पुढे दौलतरावांच्या बायकोला चंद्रमुखी विषयी कसे समजते, चंद्रमुखीला हाकलवून लावणं, त्याचबरोबर नानाने दौलतरावांना फसवण्यासाठीचा सापळा रचणं, दौलतरावांचा चंद्रमुखी वरील छायाचित्र काढायला सांगणं छायाचित्रे चंद्रमुखीचे मनातून नसणं व शेवटी पत्रकार परिषदेत दौलतरावाच्या बायकोने त्या छायाचित्रातील बाई मीच आहे असं सांगणं त्याचबरोबर त्या चंद्रमुखीला मी ओळखत “ मी ना तीचा नाच ना तीचा गाणं मी कधीही कुठेही पाहिलेला आठवत नाही” असे विधान दौलतराव करतो त्यानंतर चंद्रमुखीचं आगमन होतं आणि आपल्यावर झालेल्या अन्यायाचा खुलासा करत ती ते ध्वनीमुद्रक नानांच्या आवाजात ध्वनीमुद्रण करते अशा स्वरूपाचा एकंदरीत हे कथनक आहे. यामध्ये अनपेक्षित शेवट हे या चित्रपटाचा आपण एक मुख्य स्थान म्हणू शकतो.

समाजाच्या तमाशा कलावंताकडे पाहण्याची जी दृष्टी आहे किंवा एक वेगळ्या प्रकारचा जो दृष्टिकोन आहे त्याला वाचा फोडणारा हा चित्रपट आपण म्हणू शकतो ज्यामध्ये राजकीय कारकीर्द आणि वैयक्तिक जीवन यांची सरमिसळ हा या चित्रपटाचा एक महत्त्वाचा भाग आहे. महाराष्ट्रातील लोककलेचा गंध या चित्रपटाला लाभलेला आपल्याला दिसून येतो. या चित्रपटांमधील "बाई ग ", "चंद्रा" अशी सुपरहिट झालेली गीते. तसेच या चित्रपटांमधील जी मुख्य पात्र आहेत त्यांची भूमिका या सगळ्यांमुळे सुद्धा या चित्रपट सुपरहिट झालेला आपल्याला दिसून येतं चंद्रमुखी या चित्रपटाची मांडणी घटना प्रसंग आणि वातावरण हे दिग्दर्शकाने फार छान पद्धतीने मांडले आहे पात्रांच्या तोंडची भाषा, तमाशाच्या फडावर असणारी भाषा, पात्रांचे त्यांचे स्वभाव किंवा त्यांचं एकंदरीत वागणं हे त्या प्रत्येक पात्राच्या हावभावांवरून किंवा राहणीमानावरून त्यांच्या पेहेरावावरून मनाला भावणार आहे.

## ३.३ समारोप

प्रकरण ३ मधे निवडलेल्या कादंबऱ्या आणि त्यांची झालेली माध्यमांतरे यांचा सविस्तर आढावा घेतला गेला आहे. ज्यात सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, ग्रामीण, आत्मकथनात्मक अशा विविध विषयांच्या कादंबऱ्या आल्या आहेत. त्या कादंबऱ्यांचे विश्लेषण करत असताना कादंबऱ्यांचे कथानक, भाषाशैली, वातावरण, आलेली पात्रे, एकंदरीत कथानक, संवाद, चित्रपटाचे दिग्ददर्शन आणि चित्रपटात आलेली गीते यांचा सविस्तर आढावा घेतला आहे.

## ३.४ निष्कर्ष

१. वेगवेगळ्या कादंबऱ्या आणि त्यांची झालेली मध्यमांतरे यांची चित्रपट प्रदर्शनानुसार विभागणी केली आहे.

२. काही कादंबऱ्या वाचताना रटाळवाण्या  वाटतात.

३. काही चित्रपटांची मांडणी उत्तम प्रकारे झालेली आहे.

४. मूळ साहित्यकृती आणि त्यावर आधारीत चित्रपट यात थोडी तफावत जाणवते.

५. कादंबरीपेक्षा चित्रपट उठावदारपणे  मांडला आहे.

६. प्रत्येक कथेत विषयांचे वेगळेपण आढळते.

७. काही कादंऱ्यांची माध्यमांतरे प्रकाशनानंतर खूप  वर्षानी माध्यमांतरीत झालेले आढळून येतात.

८. चित्रपटापेक्षा मूळ साहित्यकृतीतून विषय उत्तमरित्या मांडला गेला आहे.

## ३.५ संदर्भ सूची

1. पंचधारा विशेशांक: माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक (जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३)
2. माध्यमांतराच्या अध्यापन-संशोधनातील अडचणी: प्रा. चिन्मय मधू घैसास डॉ. योगेश शेळके.
3. मराठी कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर : डॉ. राजेंद्र थोरात

4. पेशवाईवर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर : डॉ. विनय मडगांवकर
5. ग्रामीण कादंबऱ्यांचे माध्यमांतर : (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात): प्रा. विनायक ल. बापट
6. लोककला आणि लोकसमजुतींवर आधारित कादंबऱ्यांचे माध्यमांतर ; (चंद्रमुखी आणि जोगवा चित्रपट यांच्या विशेष संदर्भात) : प्रा. जयेश गावकर.
7. माध्यमांतरातील आधुनिक आयाम; कादंबरी ते वेयसेरिज : तन्वी चाफाडकर
8. साहित्यकृतीचे माध्यमांतर,थोरात राजेंद्र, संपा,
9. [साहित्यकृतीचे सिनेमारूप: १. नंटरंग- कादंबरी ते सिनेमा- कीर्ती मुळीक
   २. सिंहासन- भारतीय भाषेतील राजकीय चित्रपट- भास्कर धोके
   ३. संजय जाधव यांची ‘दुनियादारी’- महादेव वाळूंज
   ४. राजीव पाटील यांचा जोगवा- विजय बालघरे
   ५. बनगरवाडी कादंबरी ते सिनेमा -किरण पिंगळे
   ६. ७२ मैल- एक प्रवास - सुमन जाधव ]

# प्रकरण ४ : निवडलेल्या कादंबऱ्याचे झालेले चित्रपटातील माध्यमांतार यांचा तुलनात्मक

४.१ प्रस्तावना ........................................................................................63

४.२ जैत रे जैत कादंबरी जैत रे जैत चित्रपट .........................................................63

४.३ सिंहासन कादंबरी सिंहासन चित्रपट ...........................................................64

४.४ गारंबीचा बापू कादंबरी व त्यावर आधारित चित्रपट..........................................64-65

४.५ बनगरवाडी कादंबरी बनगरवाडी चित्रपट ....................................................65-66

४.६ रिटा कादंबरी रिटा वेलिणकर चित्रपट .........................................................66-67

४.७ चौंडक भंडारभोग कादंबरी दर्शन कथा जोगवा चित्रपट .....................................67-69

४.८ निशाणी डावा अंगठा कादंबरी निशाणी डावा अंगठा चित्रपट ................................69-70

४.९ नटरंग कादंबरी नटरंग चित्रपट ...............................................................70

४.१० पार्टनर कादंबरी श्री पार्टनर चित्रपट .........................................................70-71

४.११ शाळा कादंबरी शाळा चित्रपट ...............................................................71-72

४.१२ दुनियादारी कादंबरी दुनियादारी चित्रपट .......................................................72

४.१३ ७२ मैल कादंबरी व त्यावर आधारित चित्रपट ....................................................73

४.१४ दशक्रिया कादंबरी दशक्रिया चित्रपट ……………………………………………73-74

४.१५ आनंदी गोपाळ कादंबरी आनंदी गोपाळ चित्रपट ……………………………………74

४.१६ समांतर कांदबरी ते समांतर वेब मालिका…………………………………………75

४.१७ चंद्रमुखी कादंबरी चंद्रमुखी चित्रपट ……………………………………………76

४.१८ समारोप ………………………………………………………………………77

४.१९ निष्कर्ष ………………………………………………………………………77

४.२० संदर्भ ……………………………………………………………………77-78

## प्रकरण ४: निवडलेल्या कादंबयऱ्यांचे झालेले चित्रपटातील माध्यमांतर यांचा तुलनात्मक अभ्यास

### ४.१ प्रस्तावन

निवडलेल्या कादंबयऱ्यांचे झालेले चित्रपटातील माध्यमांतर यांचा तुलनात्मक अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे. ज्यात चित्रपटाच्या प्रदर्शनापासून त्यांची कालानूक्रमे मांडणी करून प्रत्येक कादंबरी व त्याचे झालेले माध्यमांतर यांच्यातील साम्यभेद, केलेले नवीन बदल यांची तुलना करून सविस्तर मांडणी केली आहे.

### ४.२ जैत रे जैत कादंबरी जैत रे जैत चित्रपट

जैत रे जैत या कादंबरीवर आधारित जैत रे जैत हा चिंगी आणि नाग्या या पात्रांच्या भोवती फिरणाऱ्या कथानकावरील चित्रपट आहे. आदिवासी परंपरेवर आधारित आणि जुन्या वळणाचा व त्या गावातील प्रथा परंपरा एकंदरीत एक वेगळ्या दृष्टिकोनातून लिहिलेल्या या कादंबरीवर आधारित जैत रे जैत हा चित्रपट दिग्दर्शकांनी फार उत्तम पद्धतीने आपल्यासमोर मांडलेला आहे. या चित्रपटांमधील येणारे सूत्रधार आणि या चित्रपटांमधील सर्वच गाणी तेवढ्यात ताकदीने दिग्दर्शकाने मांडलेली आहेत त्या प्रत्येक गाण्याचा अर्थ आणि ते प्रत्येक गाणं कथानक पुढे नेतच त्याचबरोबर त्यातून आपल्याला काही ना काहीतरी संदेश देऊन जातात. त्याकाळची भाषा, कादंबरीत आलेले संवाद, एकंदरीत वातावरण, आणि कथानकाला धरून दिग्दर्शकाने चित्रपट फार छान पद्धतीने दिग्दर्शित करून प्रेक्षकांसमोर पोहोचवला. केवळ संवाद आणि भाषेच्या माध्यमातून हा चित्रपट तेवढासा प्रदर्शित झाला नसता पण त्या चित्रपटातील प्रत्येक गीत हे त्या कथेला साजेसे कथानकाला पुढे नेणरे आणि त्यामधून काहीतरी बोध देणारे नक्कीच आहे.

जैत रे जैत या शीर्षकावरूनच जिंकणं आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी चा संघर्ष या भोवती फिरणारे हे कथानक आपल्याला पाहायला मिळते. कादंबरी वाचताना ती भाषा आपल्याला माहीत नसल्यामुळे संवाद वाचताना थोड्याफार अडचणी येतात पण एकंदरीत कादंबरी वाचल्यानंतर त्याची रूपरेषेवर समजते आणि आधारित तशाच धाटणीचा चित्रपट दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेला आहे. शब्द माध्यमातून जी गोष्ट आपल्यापर्यंत सोप्या पद्धतीने किंवा लवकर पोहोचू शकत नाही ती दृश्य माध्यमातून दिग्दर्शक आणि प्रेक्षकांपर्यंत अत्यंत चांगल्या रीतीने पोहोचवलेली आहे असं म्हणायला हरकत नाही.

## ४.३ सिंहासन कादंबरी सिंहासन चित्रपट

अरुण साधू यांच्या सिंहासन या कादंबरीवर आधारित जब्बार पटेल दिग्दर्शित सिंहासन हा राजकीय विषयावरील चित्रपट प्रेक्षकांसमोर आला. या चित्रपटाच्या माध्यमातून कादंबरीवर आधारित कथानकावरून सत्तरच्या दशकात महाराष्ट्रात सुरू असलेल्या सत्ता संघर्षातील त्याचबरोबर मुंबई महानगरातील संघटित गुन्हेगारींचे चित्र चित्रित करण्याचा प्रयत्न दिग्दर्शकाने केला आहे. राजकीय विषयावरील या कादंबरीचे चित्रपटात माध्यमांतर करत असताना राजकीय घडामोडी मधील एकंदरीत वातावरण त्यांच्या तोंडी असणारी भाषा व कथानक यामध्ये काहीसे बदल केलेले आपल्याला दिसून येतात.

माध्यमांतर करत असताना कथेमध्ये काही घटना या गाळल्या गेलेल्या आहेत पण त्यामुळे माध्यमांतरीत साहित्यकृतीमध्ये काही फारसा फरक पडलेला दिसून येत नाही चित्रपट आणि कादंबरी यांचा माध्यमांतराच्या पार्श्वभूमीचा विचार करायचा झाला तर कादंबरीपेक्षा चित्रपट जास्ती आशयसंपन्न झाला आहे कारण कादंबरी वाचताना केवळ राजकीय घटनांचे प्रसंग आहेत त्यामधले वाद असतील किंवा त्यामधील संवाद असतील ते आपल्याला केवळ वाचून आपण समजून घेऊ शकतो पण ते जेव्हा प्रत्यक्षात आपल्याला पडद्यावर दिसतात त्यावेळेला त्यांचे हावभाव एकंदरीत त्यांचे भावमुद्र या सगळ्या गोष्टींमुळे तो अजून उठावदारपणे आपल्यापर्यंत विषय पोहोचवला जातो तर राजकीय विषयावरील हा चित्रपट खरंतर दिग्दर्शकाने उत्तमरीत्या दिग्दर्शित केलेला आहेच यामधील प्रत्येक पात्र हे उठावदारपणे प्रेक्षकांसमोर पोहोचते राजकीय गोष्टीबाबतचा हा चित्रपट हा सिंहासन कादंबरीपेक्षा थोडा वरचढ ठरला आहे.

## ४.४ गारंबीचा बापू कादंबरी व त्यावर आधारित चित्रपट

श्री.ना.पेंडसे लिखित गारंबीचा बापू या कादंबरीवर आधारित गारंबीचा बापू हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. गारंबी या छोट्याशा खेडेगावात राहणारा बापू त्याचे आई-वडील त्याची मावशी आणि त्या गावातील अण्णा खोत याचा असलेला दरारा बापूचा एकंदरीत त्या गावातील प्रवास त्याची जिद्द मेहनत कबाड कष्ट करून पैसे कमावण्याची इच्छा आणि वडिलांवरचे प्रेम गावकऱ्यांवरची माया आणि सतत सगळ्यांना मदत करण्याची इच्छा या कादंबरीवर आधारित गारंबीचा बापू हा चित्रपट आणि याच्या माध्यमातून एका विशिष्ट गावात राहणाऱ्या मुलाला

स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आलेले अडथळे त्याच्या वाटेला आलेलं दुःख स्वतःची जात सोडून दुसऱ्या जातींबद्दलची त्याची ओढ त्यामुळे त्याला गावकऱ्यांकडून ऐकावे लागणारे टोमणे आणि त्यांच्या गावात होणारा इतरांवर अन्याय आणि अण्णा खोत  बरोबर अनैतिक संबंध ठेवलेली आपली आई या सगळ्यांबरोबरच त्याच्यावर प्रेम करणारी राधा या सर्वाचे चित्रण चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शकाने उत्तमरीत्या प्रेक्षकांसमोर मांडलेला आहे.

बापू या नावाने प्रसिद्ध असलेला हा मुलगा गावकऱ्यांच्या भल्यासाठी झटतो आणि ज्या बापूला गावातील लोक वाईट साईट बोलत असतात. धर्माचा अनादर करणाऱ्या बापूलाच शेवटी गावकरी सरपंच बनवून गारंबीचा बापू ही पदवी देतात अशी लहानशा कथेची कादंबरी ही दिग्दर्शकाने वातावरण निर्मिती, भाषाशैली, संवाद, पात्र, यांच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर अगदी उत्तमरीत्या मांडलेले आहे. गारंबीचा बापू या कादंबरी इतकाच गारंबीचा बापू हा चित्रपट देखील प्रेक्षकांच्या पसंतीस पडलेला दिसून येतो.

४.५  बनगरवाडी कादंबरी बनगरवाडी  चित्रपट

व्यंकटेश माडगूळकर लिखित बनगरवाडी या प्रसिद्ध कादंबरीवर आधारित बनगरवाडी हा चित्रपट यामध्ये ग्रामीण जीवनाचे दर्शन उत्तमरीत्या लेखकानेही आणि दिग्दर्शकांनीही मांडलेले आहे. कादंबरीचा विचार करता शब्दमाध्यमातून कादंबरी ही वाचकांपर्यंत अत्यंत उत्तमरीत्या व्यंकटेश माडगूळकरांनी पोहोचवली आहे ज्यामधील भाषा, वातावरण, एकंदरीत त्या कादंबरीतील पात्रे, शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षकाची शिकवण्याची धडपड, त्यांचे स्वभाव, कथानक या सगळ्यांच्या दृष्टीने आणि वाचण्याच्या दृष्टीने बनगरवाडी कादंबरी ही अत्यंत उत्कृष्ट आहेच पण या अशा वेगळ्या विषयाच्या म्हणजेच ग्रामीण विषयावर शिक्षण व्यवस्था शिक्षणाचे महत्त्व आणि एक धाडसी शिक्षक यावर आधारित एक चित्रपट काढावा ही खरंतर एक वेगळी बाजू म्हणायला हरकत नाही.

कादंबरीचे माध्यमांतर करत असताना त्या गावातील वातावरण किंवा एकंदरीत तिकडची भाषाशैली या सगळ्या गोष्टी दिग्दर्शकाला दिग्दर्शित करणे थोडेफार कठीण गेले असावे  आणि त्याचबरोबर त्या प्रत्येक पात्राला न्याय देण्यासाठी त्या प्रकारची भाषा एकंदरीत तिकडचा परिसर किंवा कथानकामध्ये आलेला कथनाचा भाग उत्तमरीत्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा दिग्दर्शकाने उत्कृष्टरित्या प्रयत्न केलेला आहे. कादंबरी म्हटली की ती थोडी लांबतेच त्याचप्रमाणे व्यंकटेश माडगूळकरांनी लिहिलेल्या बनगरवाडी मध्ये खूप सखोलरीत्या ते कथानक मांडलेला

आहे पण जेव्हा आपण माध्यमांतर करतो त्यावेळेला दिग्दर्शकाला काही गोष्टी या गाळाव्याच लागतात त्याचप्रमाणे या चित्रपटातही तसंच झालेले आहे पण त्याचा जास्त प्रभाव या चित्रपटावर झालेला दिसत नाही. अशा वेगळ्या विषयाची वेगळ्या आशयाची कादंबरी लिहिलेले व्यंकटेश माडगूळकर आणि त्याच्यावर चित्रित चित्रपट हा एक यशस्वी चित्रपट म्हणायला हरकत नाही पण जास्त उठावदारपणे प्रेक्षकांपर्यंत किंवा वाचकांपर्यंत पोहोचवलेली गोष्ट म्हणजे बनगरवाडी ही कादंबरी आहे.

४.६ रिटा कादंबरी रिटा वेलिणकर चित्रपट

रिटा ह्या कादंबरीवर आधारित एका वेगळ्या विषयाचा चित्रपट प्रेक्षकांसमोर आला या चित्रपटातील नायिका रिटा हिची ही कथा चित्रपटाच्या माध्यमातून उत्कृष्टरित्या दिग्दर्शकाने मांडलेली आहे. रिटा या कादंबरीतून लेखकाने एका मुलीची कथा, म्हणजे एक मुलगी असून तिला भोगावे लागणारे त्रास, थोरली मुलगी असल्याने तिच्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्या, आणि आपल्या आवडत्या माणसाबरोबर केवळ त्याचं लग्न झाल्यामुळे न राहता येणे आणि जर ते संबंध निर्माण झाले तर समाजाचा त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि त्यासाठीचा समजाचा विरोध तसेच  कशाप्रकारे माणसं त्या गोष्टीकडे एका वेगळ्या दृष्टीने बघतात अशा वेगळ्या विषयाची ही कादंबरी आहे.

खरंतर हा विषय चित्रपटाच्या माध्यमातून मांडणे ही मोठीच गोष्ट होती कारण त्यामध्ये काही घटना या खरं तर चित्रपटाच्या माध्यमातून दाखवण्यास थोडे कष्ट दिग्दर्शकाला पडले असतील यात निश्चितच तक्रार नाही पण एका स्त्रीच्या आयुष्यावर आधारित आणि या सगळ्या त्रासातून ती स्वतःला कशी प्रोत्साहित करते किंवा स्वतःहून या सगळ्या मधून कशी बाहेर पडते आणि याचे उत्तम उदाहरण या चित्रपटाच्या मध्यमातून दिग्दर्शकाने स्त्री समोर ठेवलेल आहे लेखकाने त्याची मांडणी शब्द माध्यमातून केलीच पण ते दृश्यमाध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे काम हे दिग्दर्शकाने केल आहे. आपल्या समाजात असलेल्या रुढीपरंपरा किंवा अनैतिक संबंध याबद्दलचं/ चे भाष्य करणारे ही खरंतर वेगळ्या विषयाची कादंबरी आणि त्यावर आधारित हा रिटा वेलिणकर हा चित्रपट. खरंतर हा चित्रपट करणं हे दिग्दर्शकाने घेतलेलं आव्हान आहे आणि ते आव्हान उत्कृष्टरित्या दिग्दर्शकाने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले आहे. हा एक वेगळा विषय असल्यामुळे रिटा वेलिणकर हा चित्रपट देखील तेवढाच उत्तम आहे.

४.७ चौंडक भंडारभोग  कादंबरी दर्शन कथा जोगवा चित्रपट

चारुता सागर यांचा दर्शन कथासंग्रह व राजन गवस यांच्या चौंडक आणि भंडाभोग या दोन कादंबऱ्यांवर आधारित २००९ साली प्रदर्शित झालेला जोगवा हा चित्रपट. वरती नमूद केल्याप्रमाणे तिन्ही कलाकृतींची सरमिसळ करून या चित्रपटांची मांडणी केली गेली आहे. भंडारभोग कादंबरीतील तायाप्पा चौंडक  कादंबरीतील चुली ही या चित्रपटातील मुख्य पात्र आहे तसंच दर्शन या कथासंग्रहातील शब्दरूपी प्रसंगांनाही या चित्रपटांमध्ये फार महत्त्वाचे स्थान आहे तसंच मेळा उभारणे त्या मेळ्यात नाचणे असे कितीतरी प्रसंग दर्शन या कथेमधून घेतलेले आपल्याला दिसून येतात.

चित्रपटाची पठकथा बघत असताना एक गोष्ट महत्त्वाची आहे ती म्हणजे तीन कलाकृतींना एकत्र आणून एक दर्जेदार चित्रपट बनवणे ही खरंतर खूप आव्हानात्मक गोष्ट आहे ते करत असताना त्यांचे योग्य दिग्दर्शन आणि कलाकारांना उत्कृष्टपणे निवडून त्यांच्याकडून ते काम करून घेणे ही खरंतर फार जबाबदारीची आणि मोठी गोष्ट आहे. मराठी मधील अत्यंत प्रभावी साहित्यिक राजन गवस यांनी स्वतः अनुभवलेल्या अनुभवातून या कादंबऱ्यांची रचना केलेली आहे आणि त्यामुळे भंडारभोग आणि चौंडक या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये जिवंतपणा आढळतो स्वतःच्या निरीक्षणातून आणि समाज सुधारणेच्या प्रयोजनातून या कादंबऱ्या जन्माला आलेल्या आहेत. सध्याच्या काळात सामाजिक प्रथांवर भाष्य करणारे लेखन आणि त्या समाजातील प्रचलित प्रश्नांना जोगत्या आणि जोगतींचे प्रश्न हे वाचकांपर्यंत पोहोचवणं याची मांडणी या कादंबऱ्यातून केलेली आहे त्याचबरोबर परंपरागत लोक जीवनात चालत आलेल्या लोक समजुतींचा इथे विशेष उल्लेख केला जातो पण त्यामधल्या काही समजुतींना सर्वसामान्य लोकांना बळी जावं लागतं अशाच लोक समजुतींना बळी पडणाऱ्या सुली आणि तायाप्पा यांची चौंडक भंडारभोग आणि दर्शन या तीन कलाकृतींवर आधारित ही कहाणी जोगताजोगतीण या पात्रांच्या अनुषंगातून जोगवा या चित्रपटाच्या माध्यमातून मांडली गेलेली आहे.

माध्यमांतर करत असताना आपल्याला अनेक बदल करावे लागतात प्रसंगानुरूप काही गोष्टीची काठछाड देखील करावी लागते तर काही प्रसंग तसेच्या तसे न दाखवता त्यामध्ये काही बदल करून दाखवावे लागतात त्याचप्रमाणे चौंडक या कादंबरीतून काही प्रसंग काटछाट करून चित्रपटात दाखवलेले आहेत उदाहरणार्थ चौंडक कादंबरीमध्ये सुरुवातीलाच सुलीला जट येण्यामागचे कारण सांगितलेले आहे कारण की ती रोज अंघोळ करत

नसते तिला आई कधी कधी जबरदस्तीने आंघोळ घालते रोज आंघोळ न केल्यामुळे तिला जट येते व ती जट आल्यामुळेच पुढे तिला जोगतीण म्हणून वावरावे लागते पण जोगवा या चित्रपटात मात्र सुली ही अंघोळ करत नाही पण तिला आंघोळ करायला आवडत नाही हे कादंबरीतील प्रसंग चित्रपटांमध्ये गाळलेले आहेत यावरून उगाच अनावश्यक गोष्टींना भर न देता नेमके प्रसंग दाखवण्यात दिग्दर्शकांनी भर दिलेली  दिसून येते.

त्याचबरोबर कादंबरी मध्ये काही प्रसंग दाखवलेले नाहीत उदाहरणार्थ सुली आणि तायाप्पा ची प्रेम कहाणी कारण दोन्ही कादंबऱ्या या स्वतंत्र आहेत पण दोन्ही पात्रांना जोडण्या साठी त्यांची प्रेम कहाणी या चित्रपटातून दाखवलेली आहे त्यांच्या प्रेमाचे प्रसंग ते मेळ्यात असताना दोघांचा एकमेकात गुंतून लग्न करण्याचा निर्णय घेणे इत्यादी.

दोन्ही कादंबऱ्या वाचत असताना प्रेक्षकाची उत्कंठा ही वाढवण्याचा सतत प्रयत्न केलेला दिसून येतो त्याच प्रकारचा प्रयत्न हा चित्रपटातही झालेला दिसून येतो वेगवेगळ्या घटना व प्रसंगांची निर्मिती करत प्रेक्षकांची उत्कंठा शेवटपर्यंत टिकवून ठेवलेली आहे. उदा. सुलीच आणि तायाप्पाच पुढे कसं होणार, कोणती नवीन संकटे त्यांच्या नशिबी येणार, त्याचबरोबर या चित्रपटाचा शेवट सुखद होणार की दुःखद होणार अशा अनेक उत्कंठा प्रेक्षकांना लागलेली आहेत पण शेवट सुखद झाल्यामुळे प्रेक्षक देखील सुखावतो.

दृकश्राव्य माध्यमात जेव्हा माध्यमांतर होतं त्यावेळेला केवळ कथानक व संवादांच्या द्वारे तो चित्रपट लोकांपर्यंत पोहोचतो असा नाही त्यामध्ये एक विविधता आणण्यासाठी किंवा एक त्याला उंची मिळवण्यासाठी त्यामध्ये गीतांची आवश्यकता ही गरजेची असते.

त्याचप्रमाणे त्या कथानकाला एक रंजक मिळण्यासाठी गीतांची मांडणी केली जाते या चित्रपटात देखील जीव दंगला गुंगला, मन रानात गेलं ग, किंवा नदीच्या पल्याड आईचा डोंगर, खेळ मांडला अशा वेगवेगळ्या गीतांचा समावेश केल्यामुळे त्या कथानकाला एक वेगळं वळण आणि एक वेगळी उंची देण्याचा काम या गीतकारांनी व संगीतकारांनी केलेले दिसून येते.

या चित्रपटांमधील प्रत्येक गीत हे प्रेक्षकांच्या मनात कोरल गेलेले आहे मग तो जोगवा असेल किंवा भाऊ होणार जीव रंगला दंगला ते असेल किंवा मन रानात गेलं ग हे सुली च्या मनातील ज्या काही आनंदाच्या भावना आहेत त्यावर संगीत असेल. माध्यमांतर करत असताना साहित्य मूळ साहित्य कृतीतील भाषा, त्यामधील संवाद,

वातावरण निर्मिती, या सगळ्यांचा विचार करतच चित्रपटाची मांडणी करणे आवश्यक आहे कारण चित्रपटाची मांडणी करत असताना ही त्या कथानकाला साजेशी आणि कथानकात वापरलेलीच भाषा आपल्याला वापरावी लागते ज्यामुळे तो चित्रपट अजून प्रभावी होतो.

चित्रपटाच्या माध्यमातून लोकसमजुतींवर आणि लोककलांवर फार लक्ष गेलेलं आपल्याला दिसून येतं जोगता जोगतीणीच्या, प्रथा त्यांना भोगावे लागणारे त्रास आणि त्यांच्या वाटेला आलेलं दुःख ही परंपरागत चालत असणारी जी लोककला आहे त्याचं एक उदाहरण हे या चित्रपटाच्या माध्यमातून प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवण्याचा अगदी अतोनात प्रयत्न हा दिग्दर्शकाने केलेला आहे दोन कादंबऱ्या व एक कथासंग्रह या तीन साहित्य कृतींचा संगम मिळून हा एक उत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शकांनी तयार केलेला आहे ज्यातून आत्ताच्या काळातील लोकांना दिलेला संदेश किंवा आपल्या जगात चालू असणाऱ्या प्रथा परंपरांची माहिती आणि त्यांची जाण करून देण्याचा प्रयत्न हा या चित्रपटाच्या माध्यमातून केलेला आपल्याला नक्कीच दिसून येतो.

४.८ निशाणी डावा अंगठा कादंबरी निशाणी डावा अंगठा चित्रपट

रमेश इंगळे लिखित कादंबरीवर आधारित पुढे आलेला निशाणी डावा अंगठा हा चित्रपट प्रौढ साक्षरता या कार्यक्रमाचे आयोजन केलेल्या एका सामाजिक शैक्षणिक अशा वेगळ्या विषयावर आधारित आहे. प्रत्येक माणसाला शिक्षणाचा हक्क असतो प्रत्येक माणसाने शिकावे आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे अशी प्रत्येकाचीच इच्छा असते पण सरकारी कामावर असलेले लोक स्वतःच्या कामापेक्षा पैशांना जास्त महत्त्व देतात याचे उत्तम उदाहरण या चित्रपटाच्या माध्यमातून दाखवलेले आहे ज्यांना शिक्षण मिळालं नाही त्यांना त्यांचे शिक्षण मिळावं यासाठी एक अभियान सरकारने काढले होते त्या अंतर्गत सरकारी शिक्षकांना त्या लोकांना जाऊन शिकवावे लागणार होते पण ते न करता केवळ तिथे जाऊन टवाळक्या करणे आणि बुद्धीचे आदान प्रदान न करता केवळ सरकारच्या पैशांवर मजा मारणे याचं एक विदारक चित्रण या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शकांनी उत्तमरीत्या दाखवलेले आहे. तर अशा पद्धतीने एका वेगळ्या विषयाची मांडणी साहित्य कृती व कलाकृतीच्या माध्यमातून दोघांनी उत्तमरीत्या मांडलेली आहे.

४.९ नटरंग कादंबरी नंटरंग चित्रपट

आनंद यादव लिखित नटरंग या कादंबरीवर आधारित रवी जाधव दिग्दर्शित नटरंग हा चित्रपट एका कलावंताच्या आयुष्यातील घटना आहे. ही घटना आनंद यादव यांनी उत्कृष्टरित्या नटरंग या कादंबरीतून मांडली. एका कलावंताला त्याचे स्थान मिळवून देण्यासाठीचा त्याचा स्वतःचा संघर्ष, एकंदरीत समाजाचा त्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन, आणि त्याच्या ध्येयापर्यंत पोहोचण्याची धडपड ही आनंद यादव यांनी आपल्या कादंबरीतून मांडली होती आणि तोच विषय प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवण्यासाठीचा प्रयत्न संघर्ष हा दिग्दर्शक रवी जाधव यांनी नटरंग या चित्रपटाच्या माध्यमातून केला. नटरंग मधील प्रत्येक गाणं हे प्रेक्षकांच्या तोंडी असतंच मग ती लावणी असेल किंवा नायकाच्या आयुष्यावर घडलेल्या घडामोडींचा प्रसंग दाखवताना आलेली "कागल गावचा गुना ऐका त्याची काणी" हे गीत असेल तसेच संवाद, भाषाशैली, वातावरण निर्मिती, एकंदरीत कथानक यामधूनच चित्रपट लोकांपर्यंत पोहोचतो.

एवढंच नाही तर महत्त्वाचा घटक म्हणजे त्या चित्रपटाला एक वेगळे रूप देण्याचे काम हे त्या चित्रपटातील गीतं करत असतात आणि उत्कृष्ट पद्धतीची संगीतरचना गीत रचना आणि उत्कृष्ट पद्धतीने गायलेली या चित्रपटातली गाणी आणि त्यामुळे प्रसिद्ध झालेला हा नटरंग चित्रपट आनंद यादव यांच्या लेखनातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचला.त्या कलावंताच्या भावना किंवा त्यांची मांडण्याची पद्धत जरी ही उत्कृष्ट असली तरी नटरंग हा चित्रपट देखील तेवढाच तोडीस तोड आहे तर नटरंग कादंबरी बरोबरच चित्रपट देखील तेवढ्याच ताकदीचा दिग्दर्शकाने दिग्दर्शित केलेला आहे असं म्हणायला हरकत नाही.

४.१० पार्टनर कादंबरी श्री पार्टनर चित्रपट

श्री पार्टनर या कादंबरीवर आधारित श्री पार्टनर हा चित्रपट. मूळ नायकाच्या कौटुंबिक जीवनावर आधारित ही कथा. पार्टनर हा प्रत्येकाच्या आयुष्यात किती महत्त्वाचा असतो याचे उत्तम उदाहरण असलेली ही कादंबरी. भलेही प्रत्येकाकडे आपले आई-वडील भाऊ-बहीण काका काकू इतर सर्व नाती असली तरी आपला असा हक्काचा माणूस पार्टनर असणं सुद्धा/ देखील तेवढंच महत्त्वाच आहे. आपल्या सुखदुःखात साथ देणारा माणसाच्या

काही गरजा पूर्ण करण्यासाठी एका पार्टनर ची गरज असते आणि या नायकाच्या भोवती फिरणारी ही वेगळ्या विषयाची कथा.

यामध्ये येणारे काही संबंध काही दृश्य ही वाचताना आपल्याला एक वेगळा अनुभव देते पण मात्र ही कथा दिग्दर्शकाने फार चांगल्या पद्धतीने चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर ठेवली आहे. नायकाला त्याच्या कुटुंबात असणारे  स्थान आणि त्याला हवाहवासा असणारा पार्टनर या विषयावर ही कथा दिग्दर्शकाने हुबेहूब पद्धतीने चित्रपटाच्या माध्यमातून मांडलेली आहे. नायक आणि  नायीकेमधील  संवाद असतील वा एकंदरीत त्या चित्रपटातील वातावरण निर्मिती भाषाशैली, दिग्दर्शन आणि त्यातून प्रेक्षकांना देणारा संकेत यासाठी हा चित्रपट खरंतर खूप छान आहे. कौटुंबिक जीवनात करावे लागणारे संघर्ष आणि आपल्या माणसाबरोबर घालवता येणारा वेळ यांचं मिश्रण या कादंबरीच्या माध्यमातून लेखकानेही उत्कृष्टरित्या मांडले आहे आणि दिग्दर्शकाने देखील फार छान पद्धतीने हा चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा नक्कीच प्रयत्न केला आहे.

४.११ शाळा कादंबरी शाळा चित्रपट

आनंद बोकील यांच्या शाळा ही कादंबरीवर ज्या मधून एक सामाजिक विषय शिक्षण संस्कृती आणि विचारात्मक कथा या सगळ्यांवर आधारित या कथानकावरून शाळा हा चित्रपट प्रदर्शित झाला. ज्यामध्ये शालेय जीवनात येणाऱ्या घडामोडी, शिक्षण घेताना येणारे प्रसंग, ज्यात एकंदरीत शाळा, तिकडचा परिसर शाळेत बोलल्या जाणाऱ्या भाषा शिकवले जाणारे विषय एक सकारात्मक दृष्टिकोन आणि प्रत्येक ठिकाणी येणारा संघर्ष याचे उत्तम उदाहरण देणाऱ्या कादंबरीवरील हा चित्रपट ज्यामध्ये समाज, प्रेम ,विद्यार्थी शिक्षकाचे नाते हे कादंबरी मधून उत्तमरीत्या लेखकाने मांडलेले आहेच पण ते प्रत्यक्षात दृश्य माध्यमातून दिग्दर्शकाने देखील फार चांगल्या पद्धतीने मांडलेले आहे यामध्ये कौटुंबिक वातावरण एकंदरीत गावातील संस्कृती, गावातील भाषा, तिकडचा परिसर आणि एकंदरीत शिक्षण घेताना येणारे प्रसंग या सगळ्यांवर आधारित ही साहित्यकृती व त्यावरील आलेला चित्रपट आहे.

शाळा कादंबरी बरोबरच चित्रपटही त्याच बरोबरीचा आहे. दिग्दर्शकाने हा चित्रपट उत्तमरित्या दिग्दर्शित केला आहे. दिग्दर्शनात फारसे बदल केलेले आपल्याला दिसून येत नाहीत पण काही भाग आपल्याला वाचताना जसा आपण समजतो तसा दिग्दर्शकाला दिग्दर्शित करता न आल्यामुळे काही प्रसंग गाळलेलीही

आपल्याला दिसून येतात. पण एकंदरीत माध्यमांतर म्हणत असताना ज्या काही मूलभूत  गोष्टींमध्ये बदल घडवावे लागतात तेवढे बदल करून एक छान पद्धतीचा शिक्षण संस्थेवर आधारित चित्रपट शाळा या कादंबरीवरून घेतलेल्या कथानकातून दिग्दर्शकाने आपल्यासमोर  उत्तमरित्या प्रस्तुत केलेला आहे.

४.१२ दुनियादारी कादंबरी दुनियादारी चित्रपट

सुहास शिरवळकर लिखित दुनियादारी कॉलेज लाईफ मध्ये जगणाऱ्या आणि तरुण वयात घडणाऱ्या घडामोडींवर आधारित प्रेम, मैत्री, कुटुंब आणि भविष्य यांचा संगम असणारी ही कादंबरी आणि या कादंबरीवर आधारित दिग्दर्शक संजय जाधव यांनी दिग्दर्शित केलेला दुनियादारी हा चित्रपट. प्रत्येकाच्या आयुष्यातला अवघड खडतर आनंद, उत्साह, दुःख, त्रास या सगळ्यांची सरमिसळ असलेला हा कॉलेजमधला काळ त्यामध्ये अनुभवलेले क्षण आणि भविष्य याबद्दलचे उत्तम लेखन कादंबरीत आले आहेच तसेच दिग्दर्शकाने चित्रपटाच्या माध्यमातून उत्कृष्टरित्या मांडलेली आहे. या चित्रपटांमध्ये असलेले प्रत्येक पात्र हे प्रेक्षकांना हवेहवेसे आणि आपलेसे वाटते प्रत्येक पात्राला प्रेक्षक स्वतःची जुळवण्याचा नक्कीच प्रयत्न करतो. चित्रपट बघताना तरुण वयातील मुलांना आपल्या कॉलेजचे दिवस अनुभवायला मिळाले. दृश्य माध्यमातून दिसतं त्यापेक्षा प्रौढ वयाच्या लोकांना आपण अनुभवलेले क्षण आठवतात आणि लहान मुलांनी कॉलेजमध्ये गेल्यानंतर काय करावे किंवा कशा घडामोडी घडतात याचा उत्तम उदाहरण हे या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शकाने खरंतर फारच चांगल्या रित्या मांडलेला आहे. श्रेयस या पात्रा भोवती फिरणार हे कथानक त्याला मिळालेले मित्र त्यांच्याबरोबरची त्यांची घट्ट मैत्री ही गोष्ट दिग्दर्शकाने कादंबरीच्या आशयातून फार चांगल्यापद्धतीने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली आहे या चित्रपटातील प्रत्येक गाणं हे सुपरहिट झालेला आहे.  दुनियादारी हा चित्रपट पाहिल्यानंतर प्रेक्षकांना कादंबरी वाचण्याचा मोह आवरूच शकत नाही तर दुनियादारी या कादंबरीपेक्षा माध्यमांतरीत दुनियादारी चित्रपट हा श्रेष्ठ आहे असं म्हणायला हरकत नाही.

४.१३ ७२ मैल कादंबरी व त्यावर आधारित चित्रपट

अशोक व्हटकर लिखित ७२ मैल एक प्रवास या आत्मकथनात्मक कादंबरीवर आधारित ७२ मैल एक प्रवास हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. स्वतःच्या आयुष्यातील घडलेल्या सत्य घटनेवर आधारित लिहिलेल्या

कादंबरीचा चित्रपटात रूपांतर करत असताना दिग्दर्शकाने चित्रपटातील प्रत्येक पात्र उदा. लेखक, त्याला भेटलेली राधाक्का, तिची मुलं, त्याचबरोबर ते कसे भेटतात हे कादंबरीत आहे. तसेच कादंबरीमध्ये सांगितलेले वातावरण निर्मिती त्यांच्या आयुष्यात घडलेले प्रसंग एकंदरीत भाषा, गरिबी दुःख भोगावे लागणारे त्रास याचं अगदी उत्तमरीत्या चित्रपटातून माध्यमांतर केलेला आहे.

रक्ताच्या नात्यांपेक्षा जोडलेली नाती आपल्यावर किती माया लावू शकतात आणि स्वतःच्या पोटच्या पोरापेक्षा जोडलेल्या नात्याला आपलंसं करणारी राधाक्का  तिच्या वाटेला आलेलं दुःख तिची गरीबी तिच्या पदरी असलेली तीन-चार मुलं आणि या सगळ्यांमध्ये सुद्धा स्वतःच्या मुलांबरोबरच लेखकाची तिची नाळ जोडली जाते आणि चित्रपटाच्या शेवटी जेव्हा लेखक आपल्या वाटेने निघतो आणि ती स्वतःच्या मुलांना घेऊन आपल्या दिशेने जाते तो प्रसंग अगदी मनाला भावणाराप्रसंग दिग्दर्शकाने उत्तमरीत्या प्रस्तुत केलेला आहे. तर ७२ मैल या कादंबरी मध्ये देखील लेखकाने उत्तमरीत्या त्या घटनेची मांडणी केलेली आहे पण चित्रपट आणि साहित्य कृती यामध्ये जास्त प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचलेला चित्रपटच म्हणायला हरकत नाही.

### ४.१४  दशक्रिया कादंबरी दशक्रिया चित्रपट

बाबा भांड लिखित दशक्रिया या कादंबरीच्या कथानकावर आधारित दशक्रिया हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. भानुदास या शाळकरी मुलाच्या आयुष्यातील ही कहाणी मनाला हुरळून टाकणारी रोकड रुढीपरंपरेमुळे धर्माला आलेली अवकळा आणि विदारक जातीव्यवस्था यांचा समावेश असणारी कादंबरी आणि त्यावरून आधारित आलेला हा चित्रपट यामधून कुटुंब व्यवस्थेतील उच्चनीचता समाज स्थिती आधुनिकीकरणाकडे पाठ फिरवून समूहांची तसेच लोकांच्या मानवी नात्यांचे पैशामुळे बदलते रंग तसेच मृत्यू आणि धर्माबाबतचे विचार या सगळ्यांची सरमिसळ असणारा आणि मनाला भावणारी अशा विषयाची ही कथा लेखकाने आपल्या कादंबरीच्या माध्यमातून उत्तमपद्धतीने मांडलेली आहेच् पण ती प्रत्यक्षात दिग्दर्शकाने फार छान रित्या प्रेक्षकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ४.१५ आनंदी गोपाळ कादंबरी आनंदी गोपाळ चित्रपट

आनंदी गोपाळ या पहिला महिला डॉक्टर यांच्यावर आधारित ऐतिहासिक कादंबरी याच कादंबरीवर आधारित आनंदी गोपाळ हा चित्रपट २०१९ साली प्रद्रार्शित झाला. एका महिलेच्या शिक्षणावर आधारित आणि आपल्यासमोर एक आदर्श ठेवणाऱ्या अशा इतिहासातील घटनेवर तब्बल खूप वर्षांनी एका वेगळ्या माध्यमातून आपल्यापर्यंत कथा पोहोचली.

आपल्या डोळ्यासमोर असलेल्या आनंदी गोपाळ चे चित्र हे दिग्दर्शकाने उत्तमरीत्या चित्रपटातून मांडलेला आहे यामध्ये साकारलेली आनंदी गोपाळ, गोपाळराव जोशी आणि इतर पात्र ही अत्यंत उत्तमरीत्या दिग्दर्शकाने प्रेक्षकांसमोर मांडलेली आहेत. त्या काळचं वातावरण त्या काळचा पेहराव त्याकाळची भाषा संवाद एकंदरीत चित्रपटाचे चित्रीकरण हे खरंतर कौतुकास्पद आहे.

त्याचप्रमाणे या चित्रपटांमधील गीते ही काहीकडे कथानकाला पुढे नेतात आणि काहीकडे एका विशिष्ट गोष्टीचा उलघडा अगदी थोडक्या शब्दात पण आकर्षक रित्या मांडतात. या चित्रपटातील प्रत्येक गीते 'वाटा वाटा वाटा ग ', 'मम पाऊली तव चाहुली' , 'तू आहेस ना' ही गीते अतिशय लोकप्रिय झालेली आहेत. या चित्रपटाचे माध्यमांतर करत असताना दिग्दर्शकाने काही गोष्टी गाळलेल्या आपल्याला दिसून येतात.

पण मनाला भावणारी आणि लोकांपर्यंत एका वेगळ्या माध्यमातून पोहोचणारी एक उत्कृष्ट कलाकृती आहे असं म्हणायला हरकत नाही. कादंबरीतून सुद्धा आपल्याला काही गोष्टींची जाणीव होते किंवा माहिती मिळते पण जेव्हा आपण दृकश्राव्य माध्यमातून ती गोष्ट पाहतो त्या वेळेला एक वेगळा अनुभव आणि एक वेगळी दृष्टी आपल्यासमोर निर्माण होते तर एक साहित्यकृती म्हणून आनंदी गोपाळ ही कादंबरी उत्कृष्ट आहेच पण जर चित्रपट व कादंबरी यांच्यातील सर्वात श्रेष्ठ जर म्हणायच झाल तर "आनंदी गोपाळ" हा चित्रपट आहे कारण कादंबरी ही काही ठिकाणी वाचताना रटाळवाणी वाटते पण चित्रपट पाहताना कुठेही असं वाटत नाही.

### ४.१६ समांतर कांदबरी ते समांतर वेब मालिका.

सुहास शिरवळकर लिखित समांतर ही कादंबरी आणि त्यावर आलेली वेब मालिका समांतर या शीर्षकावरूनच एका समांतर धाग्यामधून चालणारी ही कथा याचा बोध होतो कुमार महाजन व सुदर्शन चक्रपाणी यांच्या आयुष्यात घडलेल्या समांतर घटनांची ही कादंबरी दिग्दर्शकाने समांतर या वेब मालिकेच्या माध्यमातून

प्रेक्षकांसमोर ठेवली. समांतर कादंबरीचा विचार करायला गेला तर समांतर ही कादंबरी एक छोटेखानी कादंबरी आहे.

हातावरच्या रेषांवरून भूतकाळात अनुभवलेला माणूस आणि वर्तमान काळात जगणारा माणूस यांच्या समांतर भागांमधून जाणारा प्रवास याचं चित्रण लेखकाने उत्तमरीत्या कादंबरी मधून मांडलेले आहे तेच चित्र वेब सिरीज मधून दोन भागांमधून दिग्दर्शकाने उत्तमरीत्या मांडलेला आहे प्रत्येक भागात दहा ते अकरा असे भाग करून या वेब मालिकेची मांडणी केलेली आहे. भविष्य जाणून घेण्याची आस आणि त्याकडे जाण्याचा मार्ग तिथे गेल्यानंतर समजलेलं सत्य आणि त्या सत्याच्या शोधात घडलेलं कथानक असं वेगळ्या रंगाचे कथानक कादंबरीतून सुहास शिरवळकरांनी मांडलेला आहे आणि त्या कथानकाला योग्य न्याय दिग्दर्शकाने वेब मालिकेच्या माध्यमातून दिलेला दिसून येतो.

कादंबरी मधील चक्रपाणीच्या प्रेयसीचा उल्लेख आलेला आहे पण त्याच्या बायकोचा मृत्यू कसा झाला याची नोंद नाही पण वेब मालिकामध्ये चक्रपाणीच्या बायकोचा मृत्यू कसा झाला याची नोंद दिग्दर्शकाने केलेली आहे. आणि एक आगळ्यावेगळ्या ढंगाचं आणि विचार करायला लावणार असं हे कथानक कादंबरी व वेब सिरीज च्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर पोहोचलेला आहे कादंबरी वाचताना केवळ उत्कंठा निर्माण होते पण ती उत्कंठा वेब मालिकेच्या माध्यमातून प्रत्यक्षात डोळ्यांसमोर दिसते त्यामधील एकंदरीत ध्वनी चित्र नसेल किंवा एकंदरीत प्रत्येक पात्राने निभावलेली भूमिका आणि दाखवलेले प्रसंग घटना या सगळ्यांचा मेळ हा चित्रपटाच्या माध्यमातून उत्तमरीत्या दिग्दर्शक आणि मांडलेला आहे तर कादंबरी आणि त्यावरून तयार झालेली ही वेब मालिका हे माध्यमांतराचा एक उत्तम उदाहरण आहे असं म्हणायला हरकत नाही.

### ४.१७ चंद्रमुखी कादंबरी चंद्रमुखी चित्रपट

२०२२ मध्ये प्रदर्शित झालेला चंद्रमुखी हा चित्रपट विश्वास पाटील यांच्या चंद्रमुखी या कादंबरीवर आधारित आहे. राजकीय कारगीर्ती वरील दौलतराव यांच्या आयुष्यावर आधारित हा चंद्रमुखी चित्रपट तमाशाचा

कलावंत आणि नायिका यांच्यावर आधारित आहे. या चित्रपटाची मांडणी करत असताना कादंबरी मधील काही अनावश्यक भाग गाळून केवळ महत्त्वाचे भाग चित्रित करून योग्य त्या प्रसंगांची निवड करून या चित्रपटांमध्ये त्यांची मांडणी केलेली आपल्याला दिसून येते.

चंद्रमुखी या चित्रपटासाठी गुरु ठाकूर यांनी लिहिलेल्या अनेक गीतांचा समावेश येथे आहे उदाहरणार्थ ' तू चांद राती', 'चंद्रा', 'बाई ग' जी प्रेक्षकांची मन वेधून घेणारी होती या गीतांना संगीतबद्ध केलेले अजय अतुल यांची ही लोकप्रिय गाणी होती. मध्यामांतर करताना या चित्रपटात कादंबरी मधील एक गोष्ट गाळलेली दिसून येते ती म्हणजे पंतप्रधानांच्या खाजगी काही गोष्टी कादंबरीत सांगितलेल्या आपल्याला दिसून येतात पण जेव्हा त्याचे चित्रपटात माध्यमांतर होते त्या वेळेला त्यांचा जास्तीचा उल्लेख आपल्याला दिसून येत नाही. पण फक्त एक दोन ठिकाणी पंतप्रधानांच्या नावाची पाटी दिसून येते यालाच तर एका प्रकारची प्रतिकात्मक भाषा असे म्हटले जाते.

कलाकृतीचे माध्यमांतर म्हणत असताना केवळ तो चित्रपट दाखवताना केवळ संवादांच्या माध्यमातून किंवा घटना प्रसंगांच्या माध्यमातून तो चित्रपट दाखवणे कंटाळवाणे वाटू शकते त्यासाठी निदान दोन ते तीन गीते ही चित्रपटात येणे गरजेचे असते काही वेळेला काही घटना प्रसंगांच्या मांडणीसाठी त्यांची गरज असते किंवा कथानकाला पुढे नेण्यासाठी सुद्धा गीतांची मांडणी फार महत्त्वाची असतेतसेच चंद्रमुखी या कादंबरीतील शेवट व चित्रपटातील शेवट याबद्दल बोलायचे झाले तर चित्रपटांमधील शेवट हा प्रेक्षकांची नजर चुकवणार आहे म्हणजे चित्रपटांमधील जो शेवट आहे त्यामध्ये त्याच्या बायकोने त्या छायाचित्रातील स्त्री स्वतः मीच आहे असं सांगितलं व ते टेप रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड देखील केलं याच कारणांमुळे या चित्रपटाने एक वेगळाच प्रभाव टाकलेला दिसून येते. पुनः प्रत्यय हा या चित्रपटांमध्ये अनेक वेळेला दिसून येतो उदा. अगोदर काय घडलं होतं याचा खुलासा तसाच दौलतरावाचे छायाचित्र वर्तमानपत्रांमधून छापून आल्यानंतर पुनःप्रत्यय पद्धतीचा वापर केला गेला त्या सगळ्यांमध्ये कोण आहे चंद्रमुखी कोण आहे दौलतरावांची भेट कशी झाली ते तिच्यामध्ये का गुंतले अशा अनेक प्रश्नांची उत्तरे पुनःप्रत्यय पद्धतीच्या द्वारे देण्यात आलेली आहेत.तर अशा पद्धतीने चंद्रमुखी या कादंबरीवर आधारित चंद्रमुखी हा चित्रपट एका वेगळ्या उंचीवर नेलेला आहे हे म्हणणे वावगे ठरणार नाही.

## ४.१८ समारोप

तर या प्रकरणामध्ये निवडलेल्या कादंबऱ्याचे झालेले चित्रपटातील माध्यमांतर यांचा तुलनात्मक आढावा घेतला आहे. ज्यात कादंबबरितून माध्यमांतर करत असताना केलेले बदल, त्यामुळे चित्रपटाला आलेले नवे रूप या सर्व गोष्टींची उदा.सहित सविस्तर चर्चा केली गेली आहे.

४.१९ निष्कर्ष

1. कादंबरीच्या तुलनेत चित्रपटाची मांडणी उत्तम पद्धतीने झाली आहे.
2. चित्रपट हा साहित्यकृतीपेक्षा उंचावलेला दिसून नाही.
3. माध्यम बदलल्यामुळे नवीन गोष्टींचा समावेश करता आला एक वेगळ्या परिपरेक्षतून साहित्यकृतीचे माध्यमांतर केले गेले.
4. रटाळवणी कादंबरी ही  चित्रपटून उत्तम रित्या मंडली आहे.
5. वेगवेगळ्या विषयांच्या कादंबयऱ्यांची कालखंडानुरास विभागणी उत्तमरित्या केली आहे.
6. विषयांच्या वेगळेपण हा या प्रबंधाचा केंद्रबिंदू आहे.
7. शब्द माध्यमपेक्षा द्रुकश्राव्य माध्यमाकडे प्रेक्षकांचा कल जास्त असलेला दिसून येतो.

४.२० संदर्भ


1. पंचधारा विशेशांक: माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक (जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३)
2. माध्यमांतराच्या अध्यापन-संशोधनातील अडचणी: प्रा. चिन्मय मधू घैसास डॉ. योगेश शेळके.
3. मराठी कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर : डॉ. राजेंद्र थोरात
4. पेशवाईवर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर : डॉ. विनय मडगांवकर
5. ग्रामीण कादंबऱ्यांचे माध्यमांतर : (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात): प्रा. विनायक ल. बापट

6. लोककला आणि लोकसमजुतींवर आधारित कादंबऱ्यांचे माध्यमांतर ; (चंद्रमुखी आणि जोगवा चित्रपट यांच्या विशेष संदर्भात) : प्रा. जयेश गावकर.
7. माध्यमांतरातील आधुनिक आयाम; कादंबरी ते वेयसेरिज :  तन्वी चाफाडकर
8. साहित्यकृतीचे माध्यमांतर,थोरात राजेंद्र, संपा,
9. साहित्यकृतीचे सिनेमारूप:

१. नंटरंग- कादंबरी ते सिनेमा- कीर्ती मुळीक

२.. सिंहासन- भारतीय भाषेतील राजकीय चित्रपट- भास्कर धोके

३. संजय जाधव यांची ‘दुनियादारी’- महादेव वाळूंज

४. राजीव पाटील यांचा जोगवा- विजय बालघरे

५. बनगरवाडी कादंबरी ते सिनेमा -किरण पिंगळे

६. ७२ मैल- एक प्रवास - सुमन जाधव

## प्रकरण ५

# समारोप, निष्कर्ष, परिशिष्टे

५.१ समारोप.......................................................80-81

५.२ निष्कर्ष.........................................................82-85

५.३ आधार ग्रंथ.....................................................86-87

५.४ संदर्भ ग्रंथ.....................................................88-89

५.५ परिशिष्टे.......................................................90-91

## ५.१ समारोप

मराठी कादंबऱ्यांची माध्यमांतरे  १९६० ते २०२२ असा या प्रबंधिकेचा विषय आहे. या विषया अंतर्गत निवडलेल्या कालखंडात झालेली कादंबऱ्यांची माध्यमांतरे यांची यादी करून त्यांची सविस्तर मांडणी प्रकरणांच्या माध्यमातून केली गेली आहे. प्रकारांतर माध्यमांतर ही एक नवीन संकल्पना असून यामध्ये मराठी साहित्यातील कथा, कविता, कादंबरी, नाटक यांचे माध्यमांतर हे चित्रपट मालिका व वेब मालिकांमधे झालेले दिसून येते.

यात कादंबरी या साहित्य प्रकाराचे चित्रपटातील माध्यमांतर  हे जास्त प्रमाणात झालेले दिसून येते. १९६० ते २०२२  या कालखंडात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आत्मकथनात्मक, ग्रामीण, महानगरी अशा वेगवेगळ्या विषयांच्या कादंबऱ्या आणि त्यांची झालेली माध्यमांतरे आपल्याला दिसून येतात त्याचबरोबर समांतर या कादंबरीचे माध्यमांतर चित्रपटात न होता वेब मालिकेमध्ये एका वेगळ्या परिप्रेक्ष्यातून झालेले दिसून येते.

या प्रबंधिकेमध्ये ‘प्रकरण पहिले यात प्रकारांतर माध्यमांतर याची संकल्पना मांडली  गेली आहे.’ तसेच पुढे ‘प्रकरण दोन मध्ये कादंबरी या साहित्यप्रकाराचा आकृतीबंध व चित्रपट या कलाप्रकाराचा आकृतीबंध याची सविस्तर चर्चा केली आहे.’ त्याचप्रमाणे पुढे ‘प्रकरण तीन मध्ये निवडलेल्या कादंबऱ्या आणि त्यांचे झालेले माध्यमांतर यांची सविस्तर एक - एक करून मांडणी केली गेली आहे.’ त्याचप्रमाणे पुढे ‘प्रकरण चार मधे निवडलेल्या कादंबऱ्यांची झालेली माध्यमांतरे यांचा तुलनात्मक अभ्यास करत असताना कादंबरीतून चित्रपटात झालेले माध्यमांतर यातील बदल आणि केलेले नवीन प्रयोग यांचा सविस्तर विचार केला गेला आहे.

तर एकंदरीत कादंबरी हा साहित्यप्रकार आणि चित्रपट हा कलाप्रकार यांचे असलेले अतूट नातं प्रकारांतर माध्यमांतर या संकल्पनेचा आधार घेऊन आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यात एखादी कलाकृती शब्द माध्यमातून दृकश्राव्य माध्यमात जात असताना त्यामध्ये घडवले गेलेले बदल केले गेलेले फरक काही गोष्टींची अदलाबदल काही गोष्टी अजून नमूद करून त्या माध्यमातून दिलेले वेगळे स्वरूप यांचा सविस्तर विचार या प्रबंधाच्या द्वारे करण्यात आलेला आहे. एखादी गोष्ट केवळ शब्दाच्या माध्यमातून जेवढी वाचकांसमोर वा प्रेक्षकांसमोर पोहोचत नाही ती द्रुकश्राव्य माध्यमातून भले ते चित्रपट, मालिका किंवा वेब मालिका यांच्या माध्यमातून असेल पण ती एका वेगळ्या परीप्रेक्षाने एका वेगळ्या आयामातून प्रेक्षकांसमोर पोहोचते.

माध्यमांतर ही संकल्पना जेवढी दिसते तेवढी सोपी नाही कारण एखाद्या निवेदन पद्धतीच्या अनुषंगाने लिहिलेली साहित्यकृती हिचे संवादरूपी माध्यमांतर करत असताना दिग्दर्शकाला आलेल्या अडचणी, करावे लागणारे बदल आणि त्यामुळे साहित्य कृतीचा दर्जा सांभाळून केले जाणारे माध्यमांतर ही खरंतर एक मोठी जबाबदारी आहे असे म्हणायला हरकत नाही.

माध्यमांतर करत असताना मूळ साहित्य कृतीमध्ये मांडलेला आशय, लिहिले गेलेले कथानक, त्यात असलेली पात्रे, एकंदरीत वातावरणनिर्मिती, संवाद, भाषाशैली, यांचा विचार करून त्यांचे दृकश्राव्य माध्यमात रूपांतर करत असताना काय अडचणी येतात आणि ते करत असताना मूळ साहित्य कृतीचा दर्जा कमी होणार नाही याचीही काळजी घ्यावी लागते.

अशा पद्धतीने एका नवीन विषयाचा एका साहित्यकृतीचा आणि एका कलाकृतीचा समान धाग्यातून जाणाऱ्या विषयाची मांडणी आपल्यासमोर प्रस्तुत केली आहे.

# <u>निष्कर्ष</u>

1) प्रकारांतर माध्यमांतर स्वरूप व संकल्पना हा एक नवीन साहित्यप्रकार आहे.

2) या विषयाची नेमकेपणाने अचूक शब्दात मांडणी व त्याबद्दल अभ्यास करायला खूप वर्षांनी सुरुवात झाली.

3) प्रकारांतर माध्यमांतरामुळे चित्रपट सृष्टीचा दर्जा वाढलेला आहे.

4) माध्यमांतर केल्यामुळे साहित्यकृतीच्या आशयाचा दर्जा देखील उंचावला आहे.

5) केवळ एकाच प्रकारच्या साहित्यकृतीचे माध्यमांतर न होता वेगवेगळ्या प्रकारच्या साहित्यकृतींची माध्यमांतरे झालेली आहे.

6) साठोत्तरी कालखंड ते नव्वदोत्तरी काळखंड ते विसावे शतक अशा कालखंडामध्ये माध्यमांतरची विभागणी केली गेलेली आहे.

7) प्रत्येक कालखंडानुरूप विषयांचे वेगळेपण आढळून येते.

8) साठोत्तरी कालखंडात माध्यमांतर फार कमी प्रमाणात झालेली दिसून येतात तसेच नवोदत्तरी कालखंडात माध्यमांतराचा स्तर थोडा उंचावलेला दिसून येतो व पुढे एकविसाव्या शतकात माध्यमांतरे वेगवेगळ्या विषयांची आणि फार मोठ्या प्रमाणात झालेली आढळतात.

9) साहित्यकृतीचे प्रकारांतर हे केवळ कादंबरीतून नाटक कथेतून नाटक असे थोडक्यात स्वरूपात झालेले आहे पण माध्यमांतर म्हणत असताना कथेचा चित्रपट किंवा कादंबरीचा चित्रपट नाटकाचा चित्रपट चरित्र, आत्मचरित्र यांचा चित्रपट काही चरित्रांच्या मालिका देखील झालेल्या आहेत तसेच काही कादंबऱ्यांचे वेब मालिका मध्ये देखील रूपांतर झालेले आहे.

10) साहित्यप्रकाराचे माध्यम बदलल्यामुळे तोच विषय वेगळ्या पद्धतीने प्रकारांतर व माध्यमांतर या अंतर्गत मांडला जाऊ शकतो.

11) कादंबरीच्या आशयावरील चित्रपटात येणारे संवाद, पात्रांचा व्यक्तिमत्व आणि त्या माध्यमातून त्याला एक वेगळी उंची देणारे संगीत अशा गोष्टी दिसून येतात.

12) कादंबरी हा साहित्यप्रकार वेगवेगळ्या घटकांच्या माध्यमातून वाचकांसमोर येतो.

13) कादंबरीच्या वेगवेगळ्या प्रकारांमुळे कादंबरी या साहित्यप्रकाराला एक वेगळी उंची येते.

14) कादंबरीचा प्रत्येक घटक हा अतिशय महत्वाचा आहे.

15) थोडे लांबलचक पद्धतीने मांडणारे कथानक असा हा साहित्यप्रकार आहे.

16) या साहित्यप्रकारामध्ये आपण कथा विस्तृतपणे मांडू शकतो.

17) दीर्घकाळ चालणार हा साहित्य प्रकार आहे.

18) विस्तृत मांडणी सूत्रामुळे या साहित्यप्रकारचा अभ्यास हा खूप वेगवेगळ्या परिप्रेक्षातून आणि वेगवेगळ्या आयामातून उत्तम रित्या करता येतो.

19) काही प्रमाणात आधीपेक्षा आताच्या काळात कादंबरी लेखनाचा स्वरूपात बदल झालेले दिसून येतात.

20) कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये प्रतिमा प्रतीकांचा वापर, वेगळे आशयसूत्र, मांडणी स्वरूप व एकंदरीत निवेदन, वातावरण आणि भाषा यात नवीन पद्धती हातळलेल्या दिसून येतात जेणेकरून वाचकांचे लक्ष्य वेधून घेता येईल.

21) चित्रपट हा शब्द माध्यमातून व्यक्त होत असतो.

22) चित्रपटाचा महत्त्वाचा गाभा हा चित्रपटाचे कथानक पात्र व दिग्दर्शन असते.

23) चित्रपटातील गीते ही चित्रपटाला एक वेगळीच उंची देऊन जातात.

24) माध्यमांतरीत चित्रपट करत असताना मूळ साहित्यकृतीचा आशय तसाच ठेवून त्याचे माध्यम बदलून प्रेक्षकांसमोर प्रस्तुत करणे हे मोठे कार्य आहे.

25) चित्रपटातील प्रत्येक पात्र हे तेवढेच महत्त्वाचे असते भले तो नायक नायिका वा इतर गौण पात्रही तेवढेच महत्त्वाचे असतात.

26) चित्रपट हे माध्यम फार जुन्या काळापासून जरी प्रसिद्ध असले तरी आताच्या काळात चित्रपटाचा दर्जा फार वाढलेला आहे. केवळ मराठी हिंदी इंग्रजीत नव्हे तर इतर भाषांमधील देखील चित्रपट तेवढेच लोकप्रिय होत आहेत.

27) चित्रपटाचे चित्रीकरण, दिग्दर्शन, संवाद लेखन व इतर बाबिंमुळे चित्रपटाला दर्जा मिळतो तसेच त्या चित्रपटासाठी निवडलेले योग्य कलाकार आणि त्यांनी केलेलं काम हे देखील तेवढेच महत्त्वाचं असते.

28) माध्यमांतर करत असताना दिग्दर्शकाला मूळ साहित्यकृतीतून काही गोष्टी गाळणे ग्राह्य आहे पण त्याचा एकंदरीत कथानकावर फारसा परिणाम होणार नाही याची देखील काळजी घ्यावी लागते.

29) चित्रपटासाठी निवडलेल्या जागा, त्यांचे योग्य रीतीने केलेले चित्रीकरण व तो चित्रपट बनवण्यासाठी गुंतवलेला पैसा व तो चित्रपट लोकांना आवडेल याचीही खबरदारी घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

30) आधीच्या काळापेक्षा आताच्या काळात चित्रपटांच्या विषयांची मांडणी फार बदललेली आहे. केवळ ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक किंवा एका विशिष्ट व्यक्तीसापेक्ष काही लोकांच्या जाणीवांवर आधारित उदा. दलीत, ग्रामीण, स्त्री, महानगरीय इत्यादी अशा वेगवेगळ्या विषयांवरील चित्रपट हे एकविसाव्या शतकापर्यंत झालेले आहेत त्यामुळे विषयांचे वेगळेपण हे चित्रपटाचा वाढता क्रम असे म्हणायला हरकत नाही.

31) वेगवेगळ्या कादंबऱ्या आणि त्यांची झालेली माध्यमांतरे यांची चित्रपट प्रदर्शनानुसार विभागणी केली आहे.

32) काही कादंबऱ्या वाचताना रटाळवाण्या वाटतात.

33) काही चित्रपटांची मांडणी उत्तम प्रकारे झालेली आहे.

34) मूळ साहित्यकृती आणि त्यावर आधारीत चित्रपट यात थोडी तफावत जाणवते.

35) कादंबरीपेक्षा चित्रपट उठावदरेपणे मांडला आहे.

36) प्रत्येक कथेत विषयांचे वेगळेपण आढळते.

37) काही कादंबऱ्यांची माध्यमांतरे प्रकाशनानंतर खूप वर्षांनी माध्यमांतरीत झालेले आढळून येते.

38) चित्रपटापेक्षा मूळ साहित्यकृतीतून विषय उत्तमरित्या मांडला गेला आहे.

39) कादंबरीच्या तुलनेत चित्रपटाची मांडणी उत्तम पद्धतीने झाली आहे.

40) चित्रपट हा साहित्यकृतीपेक्षा उंचावलेला दिसून नाही.

41) माध्यम बदळल्यामुळे नवीन गोष्टींचा समावेश करता आला आणि एक वेगळ्या परिप्रेक्षातून साहित्यकृतीचे माध्यमांतर केले गेले.

42) रटाळवणी कादंबरी ही चित्रपटून उत्तम रित्या मांडली आहे.

43) वेगवेगळ्या विषयांच्या कादंबऱ्यांची कालखंडानुरास विभागणी उत्तमरित्या केली आहे.

44) विषयांचे वेगळेपण हा या प्रबंधाचा केंद्रबिंदू आहे.

45) शब्दमाध्यमपेक्षा द्रुकश्राव्य माध्यमाकडे प्रेक्षकांचा कल जास्त असलेला दिसून येतो.

# <u>आधार ग्रंथ</u>

## <u>कादंबऱ्यांची यादी</u>

१. जैत रे जैत,दांडेकर गो.नी ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथम आवत्ती १९६५ .

२.सिंहासन,साधू अरुण , ग्रंथाली प्रकाशक, प्रथम आवृत्ती १९७७.

३.गारंबीचा बापू,पेंडसे श्री.ना., कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९५२.

४.बनगरवाडी, माडगूळकर व्यंकटेश , मंजू प्रकाशक, प्रथम आवृत्ती १९५५.

५.रिटा वेलिणकर,गोखले शांता, संगम प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९९०.

६.चौंडक,गवस राजन, प्रथम आवृत्ती १९८५

भंडारभोग गवस राजन, मेहेता पब्लिशिंग हाऊस,

दर्शन कथा, सागर चारुता,

७.निशाणी डावा अंगठा, इंगळे रमेश, प्रथम आवृत्ती २००५.

८.नटरंग, यादव आनंद, मेहेता पुब्लिकेशन हाऊस, प्रथम आवृत्ती १९८०.

९.पार्टनर, काळे व.पु., मेहेता पब्लिशिंग हाऊस

१०.शाळा, बोकिल मिलिंद, मुंज प्रकाशन, प्रथम आवृत्ती २००४.

११. दूनियादारी, शिरवळकर सुहास, दिलीपराज प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९८२.

१२. ७२ मैल एक प्रवास, व्हटकर अशोक, पॉप्युलर प्रकाशन प्रथम आवृत्ती १९८९.

१३. दशक्रिया, भांड बाबा, मेहेता पब्लिशिंग हाऊस

१४. आनंदी गोपाळ, जोशी श्री.ज., मेजेस्टिक पब्लिशिंग हाऊस प्रथम आवृत्ती १९९२

१५. समांतर, शिरवळकर सुहास, दिलीपराज प्रकाशन प्रथम आवृत्ती १९६७

१६. चंद्रमुखी, पाटील विश्वास, राजहंस प्रकाशन, प्रथम आवृत्ती

# चित्रपटांची यादी

१. जैत रे जैत, डॉक्टर पटेल जब्बार, १९७७

२. सिंहासन,डॉक्टर पटेल जब्बार,१९७९

३. गारंबीचा बापू,माजगांवकर बाबा,१९८०

४. बनगरवाडी,पालेकर अमोल,१९९५

५. रिटा वेलिंगकर ,शहाणे रेणूका ,२००९

६. जोगवा, पाटील राजीव,२००९

७. निशाणी डावा अंगठा, बेर्डे पुरुषोत्तम,२००९

८. नटरंग, जाधव रवी,२०१०

९. श्री पार्टनर, सुर्वे समीर रमेश,२०१२

१०. शाळा,डहाके सुजय,२०११

११. दुनियादारी,जाधव संजय,२०१३

१२. ७२ मैल एक प्रवास,पाटील राजीव,२०१३

१३. दशक्रिया, पाटील संदीप,२०१७

१४. आनंदी गोपाळ,विव्दांस समीर,२०१९

१५. समांतर ( मालिका वेब) , २०१३

१६. चंद्रमुखी, ओक प्रसाद,२०२२

# संदर्भ सूची


1. साहित्य प्रकारांतर,समीक्षा आणि सिद्धांत ,तेवडे शेरयु,वाटाणे राजेंद्र,ठाकरे कोमल ,संपा, विजय प्रकाशन,प्रथम आवृत्ती २०१८ {१,२,३,४}
2. साहित्यकृतीचे माध्यमांतर, संपा. थोरात राजेंद्र, संस्कृती प्रकाशन, पुणे.{५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१}
3. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड ,संशोधन विषय: " मराठी कादंबरीवर आधारित मराठी चित्रपटांचा तौलणित अभ्यास" (१९७०-२०१५)
4. साहित्य प्रकारानंतर समीक्षा आणि सिद्धांत: संपा तायवाडे शरायू , वाटाणे राजेंद्र आणि ठाकरे कोमल, सचिन जगदीश उपाध्याय, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी, नागपूर.
5. https://marathivishwakosh.org/2689/
6. https://www.aksharnama.com/client/kala_sanskruti_detail/17
7. अभ्यासक्रमातील नोट्स
8. गोमंतकीय मराठी वाङमयचा इतिहास [खंड १ ],संपादक ; डॉ. वि. बा . प्रभुदेसाई , प्रकाशक गोमंतक मराठी अकादमी ,पणजी गोवा ,प्रथम आवृत्ती २००३
9. गोमंतकीय मराठी वाङमयचा इतिहास [खंड २ ],संपादक ; डॉ. नाडकर्णी सोमनाथ कोमरपंथ , प्रकाशक गोमंतक मराठी अकादमी ,पणजी गोवा ,प्रथम २०आवृत्ती
10. मराठी वाङमय प्रकार स्वरूप, संकल्पना व वाटचाल , संपादक ; डॉ. द. के. गंधार , प्रकाशक ; सुमती लांडे ,शब्दालय प्रकाशन ; प्रथम जा आवृत्ती २०१७
11. https://vishwakosh.marathi.gov.in/20441/
12. https://brainly.in/question/7925324
13. FINAL-CHITRAPAT-PRAVAHACHA-ITIHS-JAGTIK-ANI-BHARATIY.Pdf

14. पंचधारा विशेशांक: माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक (जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३)

15. माध्यमांतराच्या अध्यापन-संशोधनातील अडचणी: प्रा. चिन्मय मधू घैसास डॉ. योगेश शेळके.

16. मराठी कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर : डॉ. राजेंद्र थोरात

17. पेशवाईवर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्यांचे प्रकारांतर आणि माध्यमांतर : डॉ. विनय मडगांवकर

18. ग्रामीण कादंबऱ्यांचे माध्यमांतर : (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात): प्रा. विनायक ल. बापट

19. लोककला आणि लोकसमजुतींवर आधारित कादंबऱ्यांचे माध्यमांतर ; (चंद्रमुखी आणि जोगवा चित्रपट यांच्या विशेष संदर्भात) : प्रा. जयेश गावकर.

20. माध्यमांतरातील आधुनिक आयाम; कादंबरी ते वेयसेरिज : तन्वी चाफाडकर

21. साहित्यकृतीचे माध्यमांतर,थोरात राजेंद्र, संपा,

22. [साहित्यकृतीचे सिनेमारूप: १. नंटरंग- कादंबरी ते सिनेमा- कीर्ती मुळीक

२. सिंहासन- भारतीय भाषेतील राजकीय चित्रपट- भास्कर धोके

23. ३. संजय जाधव यांची ‘दुनियादारी’- महादेव वाळूंज

24. ४. राजीव पाटील यांचा जोगवा- विजय बालघरे

25. ५. बनगरवाडी कादंबरी ते सिनेमा -किरण पिंगळे

26. ६. ७२ मैल- एक प्रवास - सुमन जाधव ]

# <u>परिशिष्टे</u>

- प्रस्तुत आराखडा हा प्रबंधीकेच्या संदर्भातील कादंबऱ्या आणि त्यांची झालेली माध्यमांतरे यांची यादी सविस्तररीत्या दिला जाणार आहे.
- मराठी कादंबऱ्या आणि मध्यमांतरीत चित्रपट निर्मितीचा काळखंडानुसार सूची.

| *अ. क्र* | *कादंबरीचे नाव* | *कादंबरीचे लेखक* | *कादंबरचा कालखंड* | *चित्रपट* | *चित्रपट निर्मितीचा कालखंड* | *दिग्दर्शक /निर्माता* |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जैत रे जैत | गो. नी. दांडेकर | १९६५ | जैत रे जैत | १९७५ | डॉक्टर जब्बार पटेल, |
| २. | सिंहासन | अरुण साधू | १९७७ | सिंहासन | १९७९ | डॉक्टर जब्बार पटेल, |
| ३. | गारंबिचा बापू | श्री. ना. पेंडसे | १९५२ | गारंबीचा बापू | १९८० | बाबा मांजगावकर |
| ४. | बनगरवाडी | व्यंकटेश माडगूळकर | १९५५ | बगरवाडी | १९९५ | अमोल पालेकर |
| ५. | रिटा वेलिणर | शांता गोखले | १९९० | रिटा वेलिणर | २००९ | रेणुका शहाणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | चौंडक,भंडारभो दर्शन गथा) | चारुता सागर ,रंजन गावस ,चारुता सागर | १९८८,१ ९८४ | जोगव | २००९ | राजीव पाटील |
| ७. | निशाणी डावा अंगठा | रमेश इंगळे | २००५ | निशाणी डावा अंगठा | २०१० | पुरूषोतम बर्डे |
| ८. | नटरंग | आनंद यादव | १९८० | नटरंग | २०१० | रवी जाधव |
| ९. | पार्टनर | व. पू. काळे | १९७६ | श्री पार्टनर | २०१२ | समीर सुर्वे |
| १०. | शाळा | मिलिंद बोकिल | १९७० | शाळा | २०१२ | सुजय डहाके |
| ११. | दुनियादारी | सुहास शिरवाळकर | १९८२ | दुनियादारी | २०१३ | संजय जाधव |
| १२. | ७२ मैल एक प्रवास | अशोक व्हाटकर | १९७९ | ७२ मैल एक प्रवास | २०१३ | राजीव पाटील |
| १३. | दशक्रिया | बाबा भांड | १९९५ | दशक्रिया | २०१७ | संदीप पाटील |
| १४. | आनंदी गोपाळ | रा.ग. जोशी | १९९२ | आनंदी गोपाळ | २०१९ | समीर विद्वांस् |
| १५. | समांतर | सुहास शिरवळकर | २०११ | समांतर | २०२० | सतीश राजवाडे |
| १६. | चंद्रमुखी | विश्वास पाटील | २००४ | चंद्रमुखी | २०२२ | प्रसाद ओके \ |